CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

लातूर | बुधवार, २८ जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३२८ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भारताने जागतिक नेतृत्व करण्यासाठी केवळ आर्थिक नव्हे, तर सांस्कृतिक आणि सामाजिकदृष्ट्याही एकसंघ उभे राहिले पाहिजे. यासाठी कठोर आणि अखंड परिश्रम आवश्यक आहेत.

- **हस्तीमल**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. संपर्क प्रमुख

## विनम्र अभिवादन



'सायमन गो बॅक'चा नारा देऊन ब्रिटिश सरकारची झोप उडविणारे पंजाबकेसरी लाला लजपतराय यांचा आज जन्मदिन

# भारत-युरोपियन युनियनमध्ये ऐतिहासिक व्यापार करार

**● ९० टक्के उत्पादनांवरील शुल्कात कपात ● वाहने स्वस्त, मोठी गुंतवणूक आणि लाखो नोकऱ्यांची संधी**

**◆ नवी दिल्ली, २७ जानेवारी**

जवळपास १८ वर्षांपासून प्रलंबित आणि वाटाघाटी सुरू असलेला भारत आणि युरोपियन युनियनमधील ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर मंगळवारी पंतप्रधान सहमती झाली. करारांतर्गत, दोन्ही देशांनी एकमेकांसाठी त्यांच्या बाजारपेठा खुल्या करण्यास सहमती दर्शविली. ९० टक्के उत्पादनांवरील शुल्क कमी केले जाईल किंवा काढून टाकले जाणार आहे. या करारामुळे युरोपियन देशातील गाड्या भारतात स्वस्त होईल, शिवाय गुंतवणूक आणि लाखो नोकऱ्यांची संधी उपलब्ध होणार आहे.



हैदराबाद हाऊसमध्ये झालेल्या बैठकीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी, युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला फॉन डेर लेयन यांनी असे हस्तांदोलन केले

राजधानी दिल्लीतील हैद्राबाद हाऊस येथे १६ व्या भारत-युरोपियन युनियन शिखर परिषदेत नरेंद्र मोदी यांच्यासह युरोपियन आयोगाच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयेन आणि युरोपियन परिषदेचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा यांच्यासह ८५ प्रतिनिधींचे शिष्टमंडळ उपस्थित होते. यावेळी झालेल्या बैठकीत दोन्ही बाजूने चर्चा झाली, त्यानंतर मुक्त व्यापार करारावर सहमती देण्यात आली.

या करारात सुरक्षा आणि संरक्षण क्षेत्रातील भागीदारीचाही समावेश आहे. अन्नपदार्थांसह विविध उत्पादनांवरील शुल्क काढून टाकण्यात आले. या करारामुळे भारत आणि युरोपियन युनियनमधील निर्यातीत झपाट्याने वाढ होईल. कापड, चामडे, दागिने, औषधनिर्माण आणि अभियांत्रिकी वस्तूंवरील शुल्क कमी होईल. मुक्त व्यापार करारामुळे २०३१ पर्यंत भारताची निर्यात ५० अब्ज डॉलर्सने वाढणार असल्याचे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. या करारामुळे भारतीय उत्पादने युरोपमध्ये स्वस्त दरात उपलब्ध होतील. त्यामुळे चीन, बांगलादेश आणि व्हिएतनाम यासारख्या देशांसमोर आव्हान निर्माण होईल. ◀(वृत्तसंस्था)

> भारताची युरोपियन युनियनच्या २७ देशांसोबत मुक्त व्यापारावर सहमती झाली. हा करार सामायिक समृद्धीचा ब्लूप्रिंट आहे. द्विपक्षीय व्यापार करार 'मदर ऑफ ट्रेड डील अॅग्रीमेंट' अर्थात सर्व कराराची जननी आहे. शेतकरी आणि लघुउद्योगांचा युरोपियन बाजारपेठेतील प्रवेश सुलभ होईल. ही भागीदारी जगातील दोन सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थांमधील भागीदारीचे उदाहरण आहे.
>
> **- नरेंद्र मोदी**
> पंतप्रधान

> हा दिवस आमच्यासाठी ऐतिहासिक आहे. व्यापार, सुरक्षा आणि लोकांमधील संबंधांमध्ये एक नवीन अध्याय सुरू होत आहे. करारामुळे दोन अब्ज लोकांसाठी एक समान बाजारपेठ निर्माण होईल. दोन्ही बाजूंने लाखो नोकऱ्या निर्माण होतील आणि गुंतवणुकीचा मार्गही मोकळा होईल. जागतिक अस्थिरतेच्या वातावरणात भारतासोबतचा करार आशेची किरण आहे.''
>
> **- उर्सुला वॉन डेर लेयन**
> युरोपियन युनियनच्या अध्यक्ष

### भारतात वाढणार गुंतवणूक

» केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी पत्रपरिषदेत सांगितले की, जर्मनी, फ्रान्स आणि इटलीसारख्या देशातील कंपन्या भारतात गुंतवणूक वाढवेल यामुळे उत्पादन, हरित ऊर्जा, ऑटो आणि सेमीकंडक्टर क्षेत्रात भारताची लक्षणीय वाढ होईल. ■

### काय स्वस्त होईल?

- मर्सिडीझ, बीएमडब्ल्यू आणि पोर्शे सारख्या लक्झरी कारच्या किमती कमी होतील.
- १६.३ लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कारवर ४० टक्के कर आकारला जाईल.
- विमान, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, रसायने, प्रगत वैद्यकीय उपकरणे आणि धातूच्या किमती स्वस्त होईल
- भारतीय बाजारात युरोपियन देशांतील मद्याची किंमत कमी होईल
- भारतीयांना आयटी, अभियांत्रिकी, दूरसंचार आणि व्यवसाय यासारख्या सेवा क्षेत्रात संधी मिळेल
- स्पिरिट्सवरील कर ४० टक्क्यांपर्यंत घटेल तसेच ऑलिव्ह ऑईल, मार्जरीन आणि वनस्पती तेलावरील शुल्क काढून टाकले जाईल ■

### व्यापार, शुल्कातील सवलती

- **निर्यातीमध्ये बचत** : युरोपियन युनियनच्या निर्यातदारांना दरवर्षी शुल्कामध्ये सुमारे चार अब्ज युरोपर्यंत बचत होईल.
- कार आणि व्यावसायिक वाहनांवरील शुल्क ११० टक्क्यांवरून थेट १० टक्क्यांपर्यंत कमी.
- ऑलिव्ह ऑईल, मार्गारीन आणि वनस्पती तेलांवरील शुल्क, फळांचे रस आणि प्रोसेस्ड फूडवरील शुल्कही रद्द करण्यात आले.
- युरोपियन युनियनच्या सर्व रासायनिक उत्पादने, रसायनांवरील शुल्क रद्द करण्यात आले
- औषधी आणि वैद्यकीय उत्पादनांवरील ११ टक्के शुल्क रद्द करण्यात आले. ■

### इतर घोषणा काय?

**पर्यावरण मदत** : ग्रीनहाऊस गॅस उत्सर्जन कमी करण्यासाठी भारताला मदत म्हणून युरोपियन युनियन येत्या दोन वर्षांत ५०० दशलक्ष युरोची आर्थिक मदत देईल.

**बौद्धिक संपदा** : युरोपियन युनियनचे ट्रेडमार्क, डिझाईन, कॉपीराईट आणि व्यापार गोपनीयतेसाठी सुरक्षा प्रदान केली जाईल. ■

# संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू बैठकीला करणार संबोधित**



**नवी दिल्ली, २७ जानेवारी**

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन बुधवारपासून सुरू होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने या अधिवेशनाचा प्रारंभ होणार आहे. संसदेच्या नवीन इमारतीतील लोकसभेच्या सभागृहात सकाळी ११ वाजता राष्ट्रपती मुर्मू संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित करणार आहे. २९ जानेवारीला आर्थिक सर्वेक्षण सादर केले जाईल.

३० आणि ३१ जानेवारीला अधिवेशनाला सुटी आहे. रविवार १ फेब्रुवारीला अर्थमंत्री निर्मला सीतारामन् २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प संसदेत सादर करतील. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन दोन टप्प्यांत होणार आहे, २८ जानेवारीला सुरू होणाऱ्या अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारीला संपणार आहे.

दुसऱ्या टप्प्यातील अधिवेशन ९ मार्चला सुरू होत असून, २ एप्रिलपर्यंत चालणार आहे. पहिल्या टप्प्यात राष्ट्रपतीच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर संसदेत चर्चा होणार असून, या चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदी उत्तर देणार आहेत. अर्थसंकल्पावर दोन्ही सभागृहांत होणाऱ्या चर्चेला निर्मला सीतारामन् उत्तर देणार आहेत. सर्वपक्षीय बैठकीत विरोधकांना आवाहन संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पृष्ठभूमीवर संसदभवनात मंगळवारी सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले. अधिवेशनाचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी विरोधी पक्षांनी सहकार्य करण्याचे आवाहन सरकारतर्फे या बैठकीत करण्यात आले. या अधिवेशनात सरकारतर्फे मांडल्या जाणाऱ्या विधेयकांची माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली.

# सोलापूरच्या महापौराची निवड ६ फेब्रुवारीला

**पिठासीन अधिकारीपदी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ जानेवारी-**

सोलापूर महापालिकेच्या ३८ व्या महापौराची निवडणूक लांबणीवर गेली असून ३१ जानेवारी २०२६ ऐवजी ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सोलापूरला नवा महापौर मिळणार आहे. विभागीय आयुक्तांनी सोमवारी महापालिकेला एका पत्राद्वारे तसे आदेश दिले आहेत. दरम्यान, ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांची पिठासीन अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली.




महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज नगरसचिव प्रविण दंतकाळे यांच्याशी निवडणूक प्रक्रिया राबवण्यासंदर्भात सविस्तर चर्चा केली. निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी खबरदारीचे उपाय योजण्याबाबतही यावेळी चर्चा झाली. २९ जानेवारी रोजी भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांची पुण्यातील विभागीय आयुक्त कार्यालयात नोंदणी होणार आहे. त्यासाठी सर्व ८६ नगरसेवक पुण्याला जाणार आहेत.

शहर अध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्यावर ही संपूर्ण जबाबदारी देण्यात आली आहे. प्रभाग दोनमधून निवडून आलेल्या नगरसेविका शालन शिंदे तुरुंगात असल्याचे त्या हजर राहू शकत नाहीत. महापौर पदासाठी विनायक कोंड्याल, नरेंद्र काळे, अनंत जाधव, डॉ. किरण देशमुख, रंजीता चाकोते, राजकुमार पाटील यांची नावे चर्चेत आहेत.

भारतीय जनता पक्षाने महापालिकेत सत्ता स्थापन करण्याच्या हालचाली सुरु केल्या आहेत. महापौर पदाबाबत पक्षात मोठी चुरस आहे. विनायक कोंड्याल यांच्यासाठी आमदार देवेंद्र कोठे यांनी राजकीय शक्ती पणाला लावली आहे. तर इकडे आ. विजयकुमार देशमुख हे चिरंजीवाला महापौर पदावर बसवण्यासाठी अधीर झाले आहेत. काळे यांना पक्षातील वरिष्ठ नेत्यांचा आशीर्वाद आहे. जाधव यांनी मराठा समाजाला न्याय मिळावा ही मागणी घेऊन मुंबई गाठली आहे.

## महत्त्वाचे

### 'सातारा गॅझेटियर' लवकरच लागू होणार

**मुंबई** : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर काही महिन्यांपूर्वी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मोठ्या प्रमाणात आंदोलन केले होते. याचा परिणाम म्हणून आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. त्यानंतर मराठवाड्यातील अनेक मराठा बांधवांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळण्यास सुरुवात झाली. उपोषण सुरू असताना हैदराबादसह सातारा गॅझेट देखील लागू करण्याचे मान्य करण्यात आले होते. परंतु, अद्याप सातारा गॅझेट लागू झाले नसल्याने मराठा समाजात संभ्रम निर्माण झाला होता. याच संदर्भात मंत्रालयात पार पडलेल्या मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

### आयटीआयचे आधुनिकीकरण

**मुंबई** : राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय) आधुनिकीकरण करण्यासाठी केंद्र सरकारच्या पीएम सेतू योजनेंतर्गत व्यापक उपक्रम राबविण्यास मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. राज्यात कुशल मनुष्यबळाची वाढती मागणी आणि उपलब्ध कौशल्यांमधील तफावत दूर करण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत आयटीआयचे आधुनिकीकरण करून उद्योगाभिमुख, आधुनिक आणि रोजगारक्षम प्रशिक्षण देण्यावर भर दिला जाणार आहे. पीएम सेतू योजनेच्या पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथील आयटीआयचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

### यूजीसी नियमांविरुद्ध सुप्रीम कोर्टात याचिका

**मुंबई** : यूजीसी नियमांविरुद्ध वाढत्या निषेधाच्या दरम्यान, हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत असे नियम चुकीचे आहेत आणि उच्च जातीच्या विद्यार्थ्यांशी भेदभाव करणारे असल्याचा आरोप केला आहे. सामान्य श्रेणीतील विद्यार्थ्यांना पीडिताच्या व्याख्येत का समाविष्ट केले जात नाही, असा प्रश्न याचिकेत उपस्थित केला आहे. त्यांना कोणत्याही प्रकारचा भेदभाव किंवा गैरवापराचा सामना करावा लागला तर, ते तिथे तक्रार करू शकतात. विद्यापीठ अनुदान आयोगाने १३ जानेवारी रोजी उच्च शिक्षण संस्थांमध्ये समानतेचे प्रोत्साहन नियम २०२६ लागू केले. नवीन नियमांमुळे एससी, एसटी श्रेणीत नसलेल्या समुदायातील विद्यार्थ्यांना गैरवापराबद्दल तक्रार करण्याचा अधिकार वंचित ठेवला आहे. कोणीही कायद्याचा गैरवापर करणार नाही. जे काही होईल ते घटनेच्या कक्षेतच होईल.

# क्रुझर-कंटेनरची समोरासमोर धडक; चार जणांचा मृत्यू

**▸▸ पंढरपूर-सोलापूर महामार्गावरील मल्लेवाडी येथील घटना**

**सहाजण जखमी, कंटेनर चालकाविरुध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२७ जानेवारी-**

पंढरपूर-सोलापूर महामार्गावरील मल्लेवाडी येथील शरदनगर येथे क्रुझर व कंटेनरची समोरासमोर धडक बसून झालेल्या अपघातात एका अल्पवयीन मुलासह चार जणांचा मृत्यू झाला. यात सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातप्रकरणी कंटेनरचालक युवराज यशवंत गळवे (रा.हाजापूर, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) याच्याविरोधात मंगळवेढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत राजश्री उमेश कदम (रा.न्यू हायस्कूलच्या मागे, दिवा पूर्व, ठाणे) यांनी मंगळवार, दि.२७ जानेवारी रोजी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ठाणे व मुंबई येथील कुटुंबीय पंढरपूर येथे 'श्रीं'च्या दर्शनार्थ आले होते. सोमवार, दि.२६ जानेवारी रोजी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. यात योगिनी केकाणे (वय-३८), सोनम अहिरे (वय-२५), आदित्य गुप्ता (वय-१४), सविता गुप्ता (वय-३८) यांचा मृत्यू झाला

कविता तुलसकर (वय-५०), सोनल गुप्ता (वय-३५), गणेश गुप्ता (वय-९), आरती गुप्ता (वय ४०), वेद गुप्ता (वय-९), अंजली यादव (वय-२६), सोहम घुगे (वय-



१५) आणि नागनाथ होलीकट्टी (वय-३३, रा.अक्कलकोट, जि.सोलापूर) हे जखमी झाले आहेत. जखमींवर सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, पंढरपूर-सोलापूर महामार्ग हा विठ्ठल भक्तांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. गेल्या वर्षी या मार्गावर १५ हून अधिक अपघात घडले, ज्यात २० हून अधिक जणांचा मृत्यू झाला. भरधाव वेग, राँग साइड ड्रायव्हिंग आणि खराब रस्ते यामुळे अपघात होत आहेत. मल्लेवाडी-शरदनगर भागात स्पीड ब्रेकर नसल्याने चालक हयगयीते वाहने चालवतात, असे नागरिकांतून सांगण्यात आले.

**मृतामध्ये नववधूचा समावेश**

ठाणे येथील गुप्ता कुटुंबातील दोन अल्पवयीन मुले गंभीर जखमी असून, त्यांचे वडील म्हणाले, 'पंढरपूर दर्शनासाठी निघालो होतो, चालकाची लापरवाईमुळे आमचे कुटुंब उद्ध्वस्त झाले. योगिनी केकाणे ह्या खासगी कंपनीत नोकरी करीत होत्या. सोनम अहिरे नववधू होत्या. आदित्य गुप्ता हा १० वीला शिकत होता.

**सीसीटीव्ही, पेट्रोलिंग वाढवावे**

येथील महामार्गावर रात्रंदिवस वाहतूक असते. चालकांना ड्रायव्हिंग प्रशिक्षण आणि रस्त्याची देखभाल आवश्यक आहे. राँग साइड ड्रायव्हिंग रोखण्यासाठी सीसीटीव्ही आणि पेट्रोलिंग वाढवावे, अशी मागणी होत आहे.

**महामार्ग सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर**

या अपघाताने पुन्हा एकदा महामार्ग सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. पंढरपूर यात्रा हंगामात विशेष वाहतूक व्यवस्था करण्यात येईल. चालकांना अल्कोहोल टेस्ट आणि ओव्हरलोडिंग तपासणी केली जाईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**अन्यथा मोर्चा काढू**

मल्लेवाडी गावकऱ्यांनी सांगितले, पोलिस तपासाअंती चालकावर कठोर कारवाई होईल. मुळात या भागात वारंवार अपघात घडत आहेत. रस्ता दुरुस्त करा, नाहीतर मोर्चा काढू. दरम्यान, विठ्ठल भक्तांसाठी सुरक्षित मार्गाची मागणी जोर धरली आहे.

# जि.प.निवडणूक : जिल्ह्यात तीन ठिकाणी महायुती

- **इतर ठिकाणी भाजपा विरोधात आघाड्या स्थापन**
- **सत्ताधारी अन् विरोधकांच्या अस्तित्वाची लढाई सुरु बंडखोरी टाळण्यासाठी विनवण्या**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा परिषद आणि ११ पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया सुरु असून, अर्ज काढून घेण्याच्या शेवटच्या दिवशी अनेक उमेदवारांनी आपापले अर्ज काढून घेतले. दरम्यान, भाजपाने जिल्ह्यातील ३ ठिकाणी महायुती केली. इतर तालुक्यात मात्र भाजपा विरोधात सर्व विरोधक एकवटले असून, प्रत्येक पक्षाच्या अस्तित्वाची लढाई सुरु झाली आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी आज शेवटचा दिवस असल्याने त्या-त्या ठिकाणच्या निवडणूक कार्यालयात मोठी गर्दी व धावपळ दिसून आली. दरम्यान, गेली दोन दिवस शासकिय कार्यालये सुट्टीमुळे बंद होती. त्यामुळे उमेदवारी अर्ज मागे घेता आले नाहीत. जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ६८ गटांसाठी ९४५ तर पंचायत समितीच्या १३६ गणांसाठी १६५९ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. छाननीत जि.प.चे ५३ अर्ज तर पं.स.चे ५५ अर्ज बाद झाले होते. बंडखोरी टाळण्यासाठी व अपक्षांना माघारीसाठी गेली दोन दिवस विनवण्या करण्यात येत असल्याचे दिसून आले.

सोलापूर जिल्ह्यात भाजपाने सांगोला येथे शहाजीबापूंच्या गटाबरोबर (शिंदेसेना) तर करमाळा, माढा या दोन ठिकाणी अजितदादांच्या राष्ट्रवादीबरोबर महायुती केली आहे.

(उर्वरित वृत्त पान २ वर)






## महत्वाचे...



### तामलवाडी सनराईज स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**सोलापूर, दि. २६ जानेवारी-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील सनराईज स्कुलमध्ये भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त माजी सैनिक दिलीप बोबडे आणि दै. तरूण भारतचे वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यवाह ज्ञानेश्वर बोबडे, रूपाली बोबडे, सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण सावंत यांची उपस्थिती होती. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी सामुहिक कवायती सादर केल्या. यावेळी विविध स्पर्धेमध्ये गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. सूत्रसंचालन शीतल कदम, रक्षिता पतंगे यांनी तर आभार प्रदर्शन शीतल कदम यांनी केले.



### 'आयएमएस'च्या जिजा पाटकर हिचा सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी पुरस्काराने गौरव

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार पाटकर यांची मुलगी जिजा ज्योतिर्लिंग पाटकर (इयत्ता नववी) हिला इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलकडून सन २०२५ - २६ करिता सर्वोत्कृष्ट विद्यार्थी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जिजा ही अभ्यास ,खेळ, विविध स्पर्धात्मक परीक्षा यामध्ये अग्रेसर असल्यामुळे शाळेकडून तिला सन्मानित करण्यात आले. वडील ज्योतिर्लिंग हे उप अभियंता म्हणून जलसंपदा विभागामध्ये कार्यरत आहेत. इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलचे संचालक अमोल जोशी यांच्या हस्ते तिला गौरविण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, स्कूलच्या संस्थापिका सायली जोशी , मानसी जोशी, मुख्याध्यापिका व श्रीमती वळसे टीचर, श्रीमती जोशी टीचर, प्रीती स्वामी, हॉकी प्रशिक्षक अजय चाबुकस्वार आदी उपस्थित होते.



### कुरुहिनशेट्टी शिक्षण संकुलात प्रजासत्ताक दिन साजरा

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेच्या शिक्षण संकुलात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. संस्थेचे सहसेक्रेटरी श्रीनिवास गडगी यांच्या हस्ते व संस्थेचे सेक्रेटरी प्रा संजय बुगडे यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे खजिनदार श्रीनिवास जोगी, शालेय समिती अध्यक्ष प्रभाकर गोरंटी शालेय समिती सदस्य अंबादास कनकी, राजू काकी संस्थेचे विश्वस्त देवस्थान कमिटी चेअरमन गिरीश कामूर्ती, व्यंकटेश बुगडे, प्रकाश बुट्टा, गिरीश काकी, अमरनाथ मासा, अरुण गणपा उपस्थित होते.

### तीन ठिकाणी महायुती...

**पान १ वरून**

इतर ठिकाणी मात्र सर्वत्र स्वबळावर लढत असून भाजपा विरोधात काही तालुक्यात दोन्ही राष्ट्रवादीचे गट एकत्र येवून लढत आहेत. काही तालुक्यात महाविकास आघाडी झाल्याने सर्व विरोधक एकत्रित आहेत. या कांही तालुक्यात स्थानिक आघाड्या मैदानात उतरल्या आहेत. यामुळे बहुतांशी मतदारसंघात तिरंगी, चौरंगी लढती होतील. वैध ठरलेल्या सर्वपक्षीय उमेदवारांनी प्रचाराचा शुभारंभ जोरात सुरु केला आहे. डोअर टु डोअर प्रचारावर भर देण्यात येत आहे. दरम्यान, त्या-त्या पक्षाचे राज्यस्तरावरील नेते, पदाधिकारी प्रचारासाठी सोलापूर जिल्ह्यात येणार असल्याने या सभा चांगलेच गाजणार असल्याचे सांगण्यात येते. या निवडणुकीत काँग्रेसला सर्व जागांवर उमेदवारच मिळाले नसल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादी, भाजप अन् शिंदे सेनेच्याच तगड्या लढती राहणार आहेत. मागील जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी-२५, भाजप+आघाड्या-१९, शिवसेना +आघाड्या-१०, शेकाप-३, भीमा परिवार-३, काँग्रेस-७ आणि अपक्ष १ असे बलाबल होते.

# सासुरे गटात राजकीय रणधुमाळी!

## सोपलांच्या चक्रव्युहात भाजपचा रॉकेट स्पीड रोखला जाणार?

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २७ जानेवारी-**

बार्शी तालुक्यातील सासुरे पंचायत समिती गटाच्या निवडणुकीने आता उत्कंठावर्धक वळण घेतले आहे. सुरुवातीला चर्चेत असलेली निंबाळकर कुटुंबातील भाऊबंदकी माजी सभापती मकरंद निंबाळकर यांच्या माघारीमुळे संपुष्टात आली असली, तरी खरी लढाई अधिक तीव्र झाली आहे. आमदार दिलीप सोपल यांनी आखलेली सर्वपक्षीय मोट आणि माजी आमदार राजेंद्र राऊत यांची प्रतिष्ठा यामुळे सासुरे गटात महायुती विरुध्द महाविकास आघाडी असा काट्याचा संघर्ष पाहायला मिळत आहे.

**राजेंद्र राऊत यांच्या सूक्ष्म नियोजनावर भाजपाची भिस्त**

भारतीय जनता पक्षाने संतोष निंबाळकर यांना मैदानात उतरवून आपली रणनीती स्पष्ट केली आहे. माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी ही निवडणूक वैयक्तिक प्रतिष्ठेची केली असून, नगर परिषद आणि बाजार समितीमधील विजयाची परंपरा सासुरे गटातही कायम ठेवण्याचा विडा उचलला आहे. माजी आमदार चंद्रकांत निंबाळकर यांचा राजकीय वारसा आणि भाजपची भक्कम संघटनात्मक बांधणी ही संतोष निंबाळकर यांची जमेची बाजू मानली जात आहे. मात्र, विरोधकांनी रचलेले जाळे भेदण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असेल.

**कोण ठरणार सासुरे गटाचा किंग?**

कागदावर जरी भाजप सध्या वरचढ दिसत असली, तरी मकरंद निंबाळकर यांच्या समर्थकांची मते कोणाच्या पारड्यात जाणार? यावर बरेच काही अवलंबून आहे. त्यातच आमदार दिलीप सोपल शेवटच्या क्षणी कोणता आदेश देतात, यावर सासुरे गटाचा निकाल ठरणार आहे. काँग्रेस आणि रासपच्या उमेदवारांनी घेतलेली मते कोणाचे गणित बिघडवतात? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. सासुरे गटात विकासाचा मुद्दा गाजणार की प्रस्थापित नेत्यांची प्रतिष्ठा? हे येणारा काळच ठरवेल.

**मैदानात कोण? प्रमुख लढतीचे चित्र**

* मकरंद निंबाळकरांच्या माघारीनंतर आता ही लढत प्रामुख्याने चौरंगी होत असल्याचे दिसत आहे.
* संतोष निंबाळकर (भाजप) : माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या ताकदीवर आणि पक्षाच्या नेटवर्कवर विसंबून.
* रामकृष्ण लोखंडे (राष्ट्रवादी अजित पवार गट) : तांत्रिकदृष्ट्या महायुतीचा घटक असूनही, स्थानिक पातळीवर सोपल यांच्या रणनीतीचा भाग म्हणून ते प्रबळ आव्हान उभे करत आहेत.
* विजयसिंह देशमुख (काँग्रेस) : काँग्रेसच्या पारंपरिक मतांची मोट बांधण्यासाठी आणि महाविकास आघाडीचा प्रभाव टिकवण्यासाठी सक्रिय.
* नितीन बनसुडे (रासप) : धनगर समाज आणि वंचित घटकांच्या मतांचे ध्रुवीकरण करण्यावर भर.

**आमदार दिलीप सोपलांचे गुप्त अस्त्र: विरोधकांची तगडी तटबंदी**

बार्शीचे विद्यमान आमदार दिलीप सोपल (शिवसेना उबाठा) यांनी अत्यंत शांतपणे पण चतुरस्त्र रणनीती आखली आहे. केवळ स्वतःचा गटच नव्हे तर शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट) अशा विविध विचारधारेच्या कार्यकर्त्यांना एकाच धाग्यात गुंफून भाजपविरोधात एक अदृश्य तटबंदी उभी केली आहे. सोपलांची ही सर्वपक्षीय फिल्डिंग भाजपाच्या विजयाचा मार्ग खडतर ठरु शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

**सासुरे गटातील राजकारण**

* **मुख्य लढत** - भाजपचे संतोष निंबाळकर विरुद्ध सोपल गट पुरस्कृत रामकृष्ण लोखंडे.
* **निर्णायक गावे** - सासुरे, दहिटणे, मुंगशी, तडवळे, ढोराळे, उंडेगाव, काळेगाव, इर्ले, इलेवाडी, तुळशीदास नगर, यावली.
* **सोपलांचा गेम प्लॅन** - सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची मोट बांधून भाजपच्या रॉकेट स्पीडला ब्रेक लावणे.
* **राऊतांची रणनीती** - सूक्ष्म नियोजन आणि बूथ लेव्हल मॅनेजमेंटच्या जोरावर क्लीन स्वीपचा प्रयत्न.

## भावसार व्हिजन क्लबच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

भावसार व्हिजन सोलापूर क्लबचे नूतन अध्यक्ष आशिष जवळकर, सचिव हर्षल माळवदकर आणि नूतन पदाधिकारी यांचा पदग्रहण सोहळा इंडियन मेडिकल असोसिएशनच्या हॉलमध्ये उत्साहात पार पडला. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय अध्यक्ष मनीष सुत्रावे, एरिया गव्हर्नर श्रीराज निकते, समाज अध्यक्ष राजकुमार हंचाटे, नॅशनल प्रेसिडेंट २०२७ शिवाजी उपरे, नॅशनल सेक्रेटरी २०२७ गिरीश पुकाळे उपस्थित होते.



सोहळ्याची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते श्री हिंगलाज माता पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. प्रारंभी माजी अध्यक्ष विशाल खमितकर यांनी सोहळ्याची प्रस्तावना केली आणि सर्व उपस्थितांचे स्वागत केले. सर्वप्रथम नॅशनल प्रेसिडेंट मनीष सुत्रावे यांनी एरिया गव्हर्नर श्रीराज निकते यांना गव्हर्नर पदाची व गोपनीयतेची शपथ दिली. एरिया गव्हर्नर श्रीराज निकते यांनी नूतन अध्यक्ष आशिष जवळकर, सचिव हर्षल माळवदकर आणि नूतन पदाधिकाऱ्यांना पदाची व गोपनीयतेची शपथ दिली. तदनंतर मावळते अध्यक्ष विशाल खमितकर यांनी नूतन अध्यक्ष आशिष जवळकर यांना संस्थेचे चार्टर आणि अध्यक्ष पदाचे कॉलर सुपूर्द केले. त्यानंतर नॅशनल प्रेसिडेंट २०२७ श्री. शिवाजी उपरे यांनी क्लब मध्ये नव्याने सामील झालेल्या १८ नूतन सदस्यांना शपथ दिली. मावळते अध्यक्ष विशाल खमितकर यांनी मागील वर्षाचा आढावा सादर केला. क्लबच्या कार्याची माहितीने परिपूर्ण क्लबच्या झेप या बुलेटिनचे पहिल्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. संतोष पुकाळे यांनी सूत्रसंचालन केले. हर्षल माळवदकर यांनी आभार मानले.

## मंत्री गिरीष महाजन यांच्या विरोधात आक्रोश

### डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाची पोस्टरला जोडे, भीमसैनिकांनी महाजनांचे पोस्टर जाळले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**



नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे मंत्री गिरीष महाजन यांनी नाशिक येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित केलेल्या ध्वजारोहण कार्यक्रमात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख टाळल्यानंतर सोलापुरात या घटनेचे पडसाद उमटले. आंबेडकरी चळवळीच्या नेत्यांनी महाजन यांच्या विरोधात सोलापुरात एकच आक्रोश केला.

डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून जोरदार घोषणाबाजी करत मंत्री महाजन यांच्या पोस्टला जोडे मारले. तसेच त्यांच्या प्रतिमेला चपलांचा हार घातला. तर दुसरीकडे सोलापुरात कडवट भीमसैनिकांनी बाबासाहेबांच्या घोषणा देत मंत्री महाजन यांच्या पोस्टरला जोडे मार आंदोलन करत पोस्टर जाळले. अशा मंत्र्यांना सोलापुरात फिरू देणार नाही. आमचा जीव गेला तरी बेहत्तर परंतु बाबासाहेबांचे नाव कायम ठेवण्यासाठी आंदोलन करत राहू असा इशारा डेमोक्रॅटिक पार्टीचे रोहित खिलारे आणि मिथुन लोखंडे यांनी दिला. यावेळी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या रोहित खिलारे,मिथुन लोखंडे,युवराज कांबळे, शंभू पवार, वैभव शिंदे, आदींसह कडवट भीमसैनिकांची उपस्थिती होती. शहरातील कडवट भीमसैनिकांनी मंत्री महाजन यांच्या पोस्टरवर भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत, त्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी मंत्री महाजनांचे पोस्टरला जोडेमार आंदोलन करत ते पोस्टर जाळून फाडले.

## ३० जानेवारीपासून क्रेडाई सोलापूरतर्फे प्रॉपर्टी एक्स्पो

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

क्रेडाई सोलापूर तर्फे प्लॉट, फ्लॅटस्, रो हाऊझेस्, बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स, वित्तीय संस्था आदींचे प्रदर्शन यंदा दि. ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान नॉर्थकोट हायस्कुल मैदानावर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती क्रेडाई सोलापूरचे अध्यक्ष अभिनव साळुंखे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार ३० जानेवारी रोजी माजी सनदी अधिकारी व मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांच्या हस्ते व सोलापूर जनता बँकेचे चेअरमन सुनील पेंडसे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी क्रेडाई नॅशनलचे सदस्य सुनिल फुरडे, क्रेडाई महाराष्ट्राचे उपाध्यक्ष शशिकांत जिद्दीमनी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सोमवार दि. २ फेब्रुवारी पर्यंत दररोज स. १० ते रात्रौ ८ दरम्यान सर्वांसाठी हे प्रदर्शन खुले असणार आहे. या प्रदर्शनाचे सोलापूर जनता सह बँक हे मुख्य प्रायोजक असून माऊली लँडमार्क व जेजेआरव्ही समर्थ प्रसाद हे सह प्रायोजक आहेत. प्रदर्शनात रविवार दि. १ फेब्रुवारी रोजी क्रेडाई वुमन्स विंग व युथ विंग च्यावतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आल्याची माहिती दिली. या पत्रकार परिषदेस दक्ष पटेल, संतोष सुरवसे, किशोर चंडक. गुरुराज येल्लटी, प्रदीप पिंपरकर, प्रियदर्शन शाह, समीर गांधी, नंदकिशोर मुंदडा, अभय सुराणा, सिध्देश्वर जोकारे, जनता बँकेचे विनायक दोनारके उपस्थित होते.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मोतीबाग कार्यालयात कीर्तनकार हभप मोरेश्वर बुवा जोशी चऱ्होलीकर यांचे हस्ते ध्वजारोहण

**पुणे, दि. २७ जानेवारी-**





भारतीय प्रजासत्ताकाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोतीबाग कार्यालयात उत्साहपूर्ण आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन भारतीय संस्कृती संवर्धक संस्था यांच्या वतीने करण्यात आले होते. राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प.मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली तसेच राष्ट्रगीत व वंदे मातरम् सादर करण्यात आले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त,या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे भव्य घोषवादन कार्यक्रम.घोषवादनात संपूर्ण पुणे महानगरातून ६८ वादकांनी सहभाग घेतला. शिस्त,तालबद्धता व राष्ट्रभक्ती याचे प्रभावी दर्शन या घोष वादन कार्यक्रमातून दिसत होते. संगीत सादरीकरण घोषवादन कार्यक्रमात विविध रचनांचे सादरीकरण करण्यात आले. घोष प्रमुख वैभव गाडगीळ हे होते. शंख रचनेत प्रतिध्वनी, जगन्नाथ, साकेत, आनक रचना-हंसध्वनी, देशकर तर शृंग रचनेत राष्ट्रगीत, जयोस्तुते, शिवरंजनी, तिलंग, शिवराज्य, वंदे मातरम् यांचा समावेश होता. ह.भ.प. मोरेश्वरबुवा जोशी यांनी वंदे मातरम या गीताच्या १५० वर्षांच्या इतिहासाचा सविस्तर आढावा घेतला व भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील या गीताचे महत्त्वपूर्ण योगदान स्पष्ट केले. या प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कसबा भागाचे संघचालक डव्होकेट प्रशांत यादव यांनी भारतीय संविधानावर मार्गदर्शन केले व नागरिक कर्तव्ये व घटनात्मक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. मोतीबाग येथील केशव सभागृहामध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे अध्यक्ष राजीव जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे विश्वस्त राजेंद्र वालेकर यांनी केले. जगदीश सोमण यांनी वैयक्तिक पद्य सादर केले. भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन देखील यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमास ज्येष्ठ विधिज्ञ शरद चंद्रचूड, महेश आठवले, कैलास सोनटक्के, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुहासराव हिरेमठ, रविंद्र किरकोळे, ज्येष्ठ प्रचारक श्रीधर पंत फडके,भाऊराव क्षीरसागर,शिरीष भेडसगांवकर,प्रांत प्रचारक यशोधन वाळिंबे,महानगर प्रचारक रोहित रिसबूड,प्रतिक परळीकर,डॉ मोरेश्वर गद्रे,अनिल देशपांडे,घोष प्रमुख वैभव गाडगीळ,तसेच भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे विश्वस्त प्रसाद खेडकर,बाजीराव मणेरे,प्रकाश आठवले,किरण गांधी,उदय पंचपोर यांची मुख्य उपस्थिती होती.

## बनावट देशी दारूचा कारखाना उद्ध्वस्त; दीड कोटींचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे मद्रे शिवारात सुरू असलेला विनापरवाना बनावट देशी दारूचा कारखाना उद्ध्वस्त करत वळसंग पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल १ कोटी ५४ लाख ९ हजार ६५० रुपयांचा बनावट दारू व साहित्याचा साठा जप्त करण्यात आला असून राजु उर्फ राजकुमार चंद्रकांत टिळेकर (रा. मद्रे, ता. दक्षिण सोलापूर) यास अटक केली आहे.



२४ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुथ पाहणी व पेट्रोलिंग करत असताना वळसंग पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे यांना मद्रे ते आहेरवाडी जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या पत्र्याच्या गोडाऊनची तपासणी केली असता तेथे मोठ्या प्रमाणावर विनापरवाना बनावट देशी दारू तयार करण्याचा कारखाना आढळून आला.

या ठिकाणी स्वयंचलित ४ मशिन्स, कच्च्या रसायनांचे २५० लिटर क्षमतेचे १२२ बॅरल, रिकाम्या बाटल्यांचे बॉक्स, झाकणांचे बॉक्स, तसेच टँगो पंच रॉकेट, भिंगरी देशी दारू, कोंकण प्रिमियम नं. १ (९० मि.ली.) या नावाने तयार बनावट देशी दारू सापडली.

हा कारखाना राजु उर्फ राजकुमार चंद्रकांत टिळेकर व त्याचा भागीदार दिनू शेठ उर्फ भुषण पाटील रा. धुळे यांच्या संगनमताने चालवला जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. उर्वरित आरोपींचा शोधासाठी तीन विशेष पथके तयार करण्यात आली आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, अक्कलकोट विभाग विलास यामावार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रविराज कांबळे, सपोफौ निंबाळे, पोह अमोल यादव, पोह जाधवर, पोह रामदास मालचे, चापोह विजय गायकवाड, पोकाँ प्रसाद मांढरे, पोकाँ शंकर पाटील यांनी केली.

## मोहोळ जिल्हा परिषदेच्या सहा गटासाठी २५ उमेदवार, पंचायत समितीच्या १२ जागांसाठी ४१ उमेदवार रिंगणात

**मोहोळ, दि. २७ जानेवारी-**

जिल्हा परिषदेसाठी उभे असलेल्या उमेदवारांपैकी ४९ उमेदवारांनी तर पंचायत समितीच्या ४७ जणांनी अर्ज माघार घेतले आहेत . त्यामुळे आता जिल्हा परिषदेच्या सहा गटासाठी २५ उमेदवार रिंगणात असून पंचायत समितीच्या १२ जागांसाठी ४१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. अर्जमाघारी घेणाऱ्या प्रमुख उमेदवारांमध्ये पोखरापूर (जिप) शंकरराव वाघमारे आणि विजयकुमार चौधरी, यशवंत नरुटे, नरखेड - राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील आणि भाजपचे -सोमेश क्षीरसागर, पेनुर जि.प - सुनील चव्हाण आणि माऊली भगरे, आष्टी जि प बाळासाहेब पाटील, जयराम गुंड आणि मदन पाटील आदी मान्यवरांचा समावेश आहे.

पंचायत समिती घोडेश्वर-अमरनाथ सरवळे संजय विभुते, कामती बुद्रुक-दिपाली कोरे, स. वरवडे-समाधान पाटील आणि मार्तंड काळे सुरेश शिवपुजे आदींचा समावेश आहे. तत्पूर्वी आपापल्या पक्षाच्या उमेदवारांनी अर्ज माघारी घ्यावे यासाठी पक्षश्रेष्ठींना अक्षरशः त्यांची मिनतवारी करण्याची पाळी आली. खास करून भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे आणि माजी तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण यांचा अर्ज काढण्यासाठीनवे जुने कार्यकर्ते एकत्र आल्याचे चित्र दिसून आले. माजी आमदार यशवंत माने यांनी आपण भाजपमध्ये नवीन आहोत आणि कुठल्याही परिस्थितीत शंकरराव वाघमारे यांच्यावर अन्याय होऊ दिला जाणार नाही असे सांगितले.तथापि आपण पक्षावर नाराज नसून कुठलाही शब्द न घेता पक्ष शिस्ती साठी आपण स्वखुशीने अर्ज माघारी घेत आहे अशी प्रतिक्रिया शंकरराव वाघमारे यांनी यावेळी दिली .तथापि त्यांच्या अर्ज माघारी घेण्याच्या प्रक्रियेनंतर तालुक्यातील भाजपाच्या जुन्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे.



ए. आर. रहमान यांच्या कामाचा जाती, धर्माशी संबंध लावण्याचा प्रकार मी ऐकला. पण, माझ्या मते, जेव्हा सारे काही नीट चालू असेल तेव्हा अशा छोट्या-मोठ्या गोष्टींकडे लक्ष देऊ नये. हा आपला देश आहे. फक्त आनंदाने जगावे.
**वहिदा रहमान,** ज्येष्ठ अभिनेत्री


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

बुधवार, २८ जानेवारी २०२६







स्वामी अविमुक्तेश्वरानंद आणि उत्तरप्रदेश सरकार यांच्या वादात नक्कीच तोडगा निघेल. मात्र, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी शंकराचार्य असल्याचा पुरावा मागणे चुकीचे आहे. हा अधिकार फक्त शंकराचार्य आणि विद्वत परिषदेचा आहे.
**उमा भारती,** ज्येष्ठ नेत्या

# भारताला हानी पोहोचविणे हाच पाकिस्तानचा अजेंडा

## • पार्वतनेनी हरीश यांनी सुरक्षा परिषदेत फटकारले • दहशतवादाला जगजाहीरपणे पाठिंबा

◆ **न्यू यॉर्क, २७ जानेवारी**

'ऑपरेशन सिंदूर'वेळी भारताने केवळ दहशतवादी अड्डे लक्ष्य केले, यात सामान्य नागरिकांचे नुकसान झालेले नाही. पाकिस्तान 'ऑपरेशन सिंदूर'वरून भारतासंदर्भात अफवा पसरवत आहे. भारताला हानी पोहोचविणे हाच त्यांचा एकमेव अजेंडा आहे. दहशतवादाला कोण पाठिंबा देतो, हे जगजाहीर असल्याचे नमूद करीत संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील भारताचे स्थायी प्रतिनिधी पार्वतानेनी हरीश यांनी सोमवारी पाकिस्तानची खरडपट्टी काढली.



सुरक्षा परिषदेतील चर्चासत्रात पी. हरीश म्हणाले, पाकिस्तानवर सुरू असलेले हल्ले भारताने १० मे रोजी कुणाच्याही दबावात थांबविलेले नाही. ९ मेपर्यंत पाकिस्तान भारतावर आणखी हल्ले करण्याची धमकी देत होता. पण, १० मे रोजी पाकिस्तानी सैन्याने थेट आमच्या सैन्याला फोन करून लढाई थांबवण्याची विनंती केली. त्यामुळे अटी-शर्तीवर आम्ही त्यांचा शांतता प्रस्ताव स्वीकारला. तिसऱ्या देशाच्या दबावात आम्ही माघार घेतल्याची अफवा पाकिस्तान पसरवत आहे. त्यांचा एकमेव अजेंडा भारतीय लोकांना हानी पोहोचवणे आहे.

पाकिस्तानचा दहशतवादाला पाठिंबा असल्याचे जगजाहीर आहे आणि दहशतवाद हेच त्यांचे धोरण आहे. परंतु, भारत आता सीमापार दहशतवाद खपवून घेणार नाही. यापुढे हल्ल्याचा प्रयत्न झाल्यास याची किंमत त्यांना चुकवावी लागेल. ◄(वृत्तसंस्था)

### अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेपाचा अधिकार नाही

» भारताच्या अंतर्गत प्रश्नावर भाष्य करण्याचा पाकिस्तानला अधिकार नाही. जम्मू- काश्मीर भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि नेहमीच राहील. भारताने ६५ वर्षांपूर्वी मैत्रीच्या भावनेतून सिंधू जलकरार केला. मात्र, गेल्या सात दशकांत, पाकिस्तानने भारतावर तीन युद्धे लादली आणि हजारो दहशतवादी हल्ले करून कराराच्या भावनेचे उल्लंघन केले, असे हरीश यांनी सांगितले. ■

### सिंधू जलकराराला स्थगिती कायम

» पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यांमध्ये हजारो भारतीयांना आपले प्राण गमवावे लागले. पाकिस्तान सीमापार दहशतवादाचा पाठिंबा काढून घेईपर्यंत सिंधू जल करार स्थगित राहणार आहे. २७ व्या घटनादुरुस्तीद्वारे पाकिस्तानने सशस्त्र दलांना दिलेले अधिकार हे देशाच्या अधोगतीचे कारण ठरू शकते आणि त्यांनी यावर आत्मपरीक्षण करायला हवे. ■



नवी दिल्लीत मंगळवारी झालेल्या एका कार्यक्रमात छात्रसेनेच्या कॅडेट्सने आकर्षक नृत्य सादर केले. या कार्यक्रमाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, केंद्रीय आदिवासी व्यवहार मंत्री जुएल ओराम प्रामुख्याने उपस्थित होते

# महाकाल मंदिरातील 'व्हीआयपी' दर्शनावर बंदीची याचिका फेटाळली

◆ **नवी दिल्ली, २७ जानेवारी**

सर्वोच्च न्यायालयाने उज्जैनमधील महाकाल मंदिरात भेदभावाचा आरोप करणारी याचिका फेटाळून लावली आहे. यात व्हीआयपी दर्शनावर बंदी घालण्याची आणि सर्वांना समान प्रवेश मिळावा, अशी मागणी करण्यात आली होती.

सरन्यायाधीश सूर्य कांत प्रमुख असलेल्या न्यायासनाने म्हटले की, अशा याचिका दाखल करणारे खरे भक्त नाहीत, तर त्यांचा हेतू वेगळा आहे. अशा कोणत्याही बाबींवर मार्गदर्शक तत्त्वे किंवा धोरणे तयार करणे हे आमचे काम नाही.

दर्पण अवस्थी यांनी दाखल केलेली याचिका फेटाळताना न्यायासनाने कठोर शब्दांत टिप्पणी केली. अशा प्रकारच्या याचिका दाखल करणारे खरे श्रद्धाळू नसतात, असे न्यायालयाने म्हटले. सरन्यायाधीश म्हणाले, हे लोक श्रद्धाळू नाहीत. यावर आम्हाला अधिक भाष्य करायचे नाही. त्यांचा उद्देश काहीतरी वेगळाच असतो. काय करावे आणि काय करू नये, हे ठरवणे न्यायालयाचे काम नाही. आम्ही न्यायिक प्रक्रियेसाठी आहोत.



याचिकाकर्त्याच्या वतीने सादर केलेला युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने ही याचिका नामंजूर केली. मात्र, संबंधित मुद्द्याबाबत सरकार व प्रशासनाकडे अर्ज करण्याची मुभा याचिकाकर्त्याला देण्यात आली आहे.

सामान्य लोकांना पाणी अर्पण करण्याची परवानगी नसताना, व्हीआयपी भाविकांना गर्भगृहात प्रवेश देणे भेदभावपूर्ण आहे, असा युक्तिवाद करीत अवस्थी यांनी यापूर्वी मध्यप्रदेश उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाकडून निराश झाल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. ◄(वृत्तसंस्था)

### गावकऱ्यांचा पळून जाणाऱ्या दाम्पत्यांवर सामाजिक बहिष्कार

◆ **रतलाम, २७ जानेवारी**

मध्यप्रदेशातील रतलाम जिल्ह्यातील एका गावातील रहिवाशांनी पळून जाऊन लग्न करणाऱ्या जोडप्यांवर सामाजिक बहिष्कार टाकण्याची घोषणा केली आहे. यामुळे अधिकाऱ्यांनी हा फतवा काढणाऱ्यांविरुद्ध कारवाईचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाशी संबंधित एक व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल झाला आहे.

जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या पंचेवा गावात २३ जानेवारी रोजी हा फतवा काढण्यात आला. मागील सहा महिन्यांत गावातील आठ जोडप्यांनी पळून जाऊन लग्न केल्यामुळे हा सामाजिक बहिष्काराचा निर्णय घेतल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. ◄(वृत्तसंस्था)

# यूजीसीच्या नव्या नियमामुळे वाद पेटला

## • खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे आंदोलन • भाजपाविरोधात संताप

◆ **नवी दिल्ली, २७ जानेवारी**

विद्यापीठ अनुदान आयोगाने २०२६ मध्ये बनवलेल्या नव्या नियमावरून मोठा वाद निर्माण झाला आहे.

या नियमाचे नाव 'प्रमोशन ऑफ इक्विटी इन हायर एज्यूकेशन इन्स्टिट्यूशन्स रेग्युलेशन-२०२६' असे आहे. विद्यापीठ आणि कॉलेजमधील जातीभेद रोखण्यासाठी हा नियम बनवण्यात आला आहे. या नियमानुसार प्रत्येक विद्यापीठ आणि कॉलेजमध्ये एक समता समिती बनवण्यात येईल. या समितीत एससी, एसटी आणि ओबीसी विद्यार्थ्यांच्या तक्रारीवर सुनावणी होईल आणि निश्चित कालावधीत या तक्रारीचा निपटारा केला जाईल.

या समितीत एससी-एसटी, ओबीसी, दिव्यांग आणि महिलांचा समावेश आवश्यक आहे. या समितीचे काम विद्यापीठ आणि कॉलेज परिसरात समानतेचे वातावरण तयार करणे आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या योजनांची योग्य अंमलबजावणी करणे हा आहे.




#### का बनवला नवीन नियम?

विद्यापीठ अनुदान आयोगाने हा नियम सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बनवला आहे. न्यायालयाने २०२५ मध्ये रोहित वेमुला आणि पायल तडवीसारख्या प्रकरणात सुनावणी करताना यूजीसीला आठ आठवड्यांत कठोर नियम बनवण्यास सांगितले होते. हैदराबाद विद्यापीठातील रोहित वेमुला आणि मुंबईत मेडिकल कॉलेजला शिकणारी पायल तडवी या प्रकरणातून जातीभेदानंतर आत्महत्या केल्याचे प्रकरण घडले होते. याबाबत दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने यूजीसीला २०१२ च्या जुन्या नियमांत सुधारणा करून जातीभेद संपवण्यासाठी मजबूत व्यवस्था बनवा, असे म्हटले होते.

यूजीसीने न्यायालयात एक अहवाल सादर करीत जातीभेदाची आकडेवारी दिली होती. उच्च शिक्षण संस्थेत २०१७-१८ या काळात जातीभेदाच्या १७३ तक्रारी प्राप्त झाल्या. २०२३-२४ या काळात हा आकडा वाढून ३७८ इतका झाला. गेल्या पाच वर्षांत जातीभेदाच्या तक्रारीत ११८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. हा डेटा यूजीसीने समोर आणला आहे. जो संसदीय समिती आणि सर्वोच्च न्यायालयात दिला. तक्रारीत ९० टक्क्यांपेक्षा अधिक निवारण झाले परंतु प्रलंबित तक्रारी वाढत गेल्या. ◄(वृत्तसंस्था)

### नव्या नियमांत काय आहे?

» नव्या नियमात जातीभेदाबाबत स्पष्ट व्याख्या दिली आहे. यात एससी, एसटी आणि ओबीसी विद्यार्थ्यांविरोधात कुठल्याही प्रकारे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष आणि अपमानजनक वर्तणूक ही भेदभाव मानली जाईल. जर एखाद्या विद्यार्थ्याची प्रतिमा किंवा शैक्षणिक असमानता आणत असेल तर, तोही भेदभाव मानला जाईल. या तक्रारी कमिटीकडे पाठवल्या जातील आणि दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. ■

### नव्या नियमाला विरोध का?

» यूजीसीच्या या नव्या नियमांविरोधात खुल्या वर्गातील विद्यार्थी आंदोलन करीत आहेत. हा नियम खुल्या वर्गाविरोधातील आहे. नियमांमध्ये फक्त एससी, एसटी आणि ओबीसीविरोधात भेदभावाचा उल्लेख आहे. खुल्या वर्गातील विद्यार्थ्यासोबत भेदभाव मानला जाणार नाही ज्यातून हा विरोध आहे. या नियमाचा वापर करून कुणीही विद्यार्थी सवर्ण समाजातील लोकांना फसवण्यासाठी खोटी तक्रार देऊ शकतो. ■

# गँगस्टर गोल्डी ब्रारच्या पालकांना अटक

### अमृतसरमधील हॉटेलमधून पकडले

◆ **अमृतसर, २७ जानेवारी**

पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला हत्याकांडाचा सूत्रधार गँगस्टर गोल्डी ब्रारच्या आई-वडिलांना पोलिसांनी अटक केली आहे. ही अटक श्री मुक्तसर साहिब पोलिस ठाण्याच्या पोलिसांनी दोन वर्षांपूर्वीच्या एका जुन्या प्रकरणात केली आहे. गँगस्टरचे आई-वडील अमृतसरमधील सुवर्ण मंदिराजवळच्या एका हॉटेलमध्ये थांबले होते.

त्यांची ओळख शमशेर सिंग आणि त्यांची पत्नी प्रीतपाल अशी झाली आहे. ज्या प्रकरणात अटक झाली, त्याची एफआयआर ३ डिसेंबर २०२४ रोजी नोंदवण्यात आली होती. हे प्रकरण उडेकरन गावातील एका व्यक्तीच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) अंतर्गत नोंदवण्यात आले. तक्रारदाराने सांगितले की, ते गेल्या ३३ वर्षांपासून शिक्षण विभागात कार्यरत आहेत. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ते शाळेत आपल्या कर्तव्यावर होते. ◄(वृत्तसंस्था)



जम्मू-काश्मिरात सुरू असलेल्या बर्फवृष्टीमुळे एकीकडे विमानांची उड्डाणे रद्द होत असली, तरी पर्यटकांमध्ये जोरदार उत्साह आहे. श्रीनगर येथे उत्साही पर्यटक बर्फात खेळताना

# बंगालमध्ये गोदामांना आग; आठ ठार

◆ **कोलकाता, २७ जानेवारी**

पश्चिम बंगालच्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात असलेल्या दोन गोदामांना आग लागली. यात आठ जणांचा मृत्यू झाला. या घटनेला २४ तास पूर्ण होऊनही आग विझलेली नाही, असे अधिकाऱ्यांनी मंगळवारी सांगितले.

कोलकाताच्या बाहेरील नाजिराबाद परिसरात असलेल्या या दोन्ही युनिट्समध्ये अनेक कामगार अडकल्याची शक्यता आहे. सोमवारी पहाटे तीन वाजताच्या सुमारास लागलेली आग विझवण्यासाठी घटनास्थळी अग्निशमन दलाच्या गाड्या तैनात आहेत. बारा अग्निशमन दलाच्या गाड्या आग विझवण्यासाठी लावण्यात आल्या होत्या. सुमारे सात तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. सोमवार रात्रीपासून अनेक जळालेले मृतदेह आणि मानवी सांगाड्यांचे अवशेष सापडले आहेत, परंतु आगीचे लोळ अजूनही काही ठिकाणी धुमसत असल्याने मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती आहे. मृत किंवा बेपत्ता असलेले सर्वजण पूर्व मेदिनीपूर, पश्चिम मेदिनीपूर आणि दक्षिण २४ परगणा जिल्ह्यांतील आहेत.

घटनास्थळावरून सापडलेले मृतदेह आणि मानवी सांगाड्यांचे अवशेष ओळखण्यासाठी कुटुंबीयांकडून डीएनए नमुने गोळा केले जातील, असे अग्निशमन दलाच्या सूत्रांनी सांगितले. आगीचे कारण आणि नुकसानीचे प्रमाण अद्याप निश्चित झालेले नाही. सोमवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास बचाव कार्यादरम्यान, लागून असलेल्या गोदामांमधून तीन पूर्णपणे जळालेले मृतदेह सापडले, तर नंतर आणखी पाच मृतदेह सापडले. यामुळे मृतांचा आकडा आठवर पोहोचला. मृतदेह पूर्णपणे जळल्यामुळे ओळख पटू शकली नाही, असे बारुईपूरचे पोलिस अधीक्षक शुभेंदू कुमार यांनी सांगितले. ◄(वृत्तसंस्था)





# मुख्यमंत्र्यांच्या पत्नीबाबत गायिका भारतीची विकृती!

## भाजपासह ठाकरे गटाचे पदाधिकारीही आक्रमक

**भंडारा, २७ जानेवारी-**

जिल्ह्यात आयोजित केलेल्या भीम मेळाव्यात गायिका अंजली भारती यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुविद्य पत्नी अमृता यांच्याबद्दल अत्यंत निंदनीय आणि आक्षेपार्ह भाषा वापरली. या विधानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर भाजपाने यावर तीव्र आक्षेप घेतला आहे.

विशेष म्हणजे, विरोध पक्ष नेत्यांनीही अंजली भारतीचा समाचार घेतला आहे. फुलमोगरा गावात १४ जानेवारी रोजी भीम मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात गायनाचा कार्यक्रम होता. कार्यक्रमात अंजली भारती यांचे गायन सुरू होते. यावेळी त्यांनी राज्यभरात वाढणाऱ्या बलात्काराच्या घटनांवर संताप व्यक्त केला. या गंभीर विषयावर मत मांडताना त्यांची जीभ घसरली. त्यांनी थेट अमृता फडणवीस यांच्याबद्दल अर्वाच्य वक्तव्य केले.

या विधानानंतर उपस्थित काही लोकांनी टाळ्या वाजवल्या आणि पैसेही उधळले, ज्यामुळे या प्रकरणाची तीव्रता अधिकच वाढली. अमृता फडणवीस यांच्याबद्दल बोलून त्या थांबल्या नाही, तर त्यांनी इतरही संतापजनक वक्तव्ये करून विकृतीचे दर्शन घडविले. ही चित्रफीत समाज माध्यमांवर व्हायरल झाली आणि अंजलीविरुद्ध प्रचंड संताप व्यक्त केला गेला. भंडारा जिल्हाच नव्हे तर, महाराष्ट्रात या घटनेचा निषेध होत असून, भाजपासह विविध पक्षांतील नेत्यांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला आहे.

महिला आयोगाचा कारवाईचा निर्देश या प्रकरणाची महिला आयोगाकडून गंभीर दखल घेण्यात आली आहे. त्यानुसार अंजली भारतीवर कायदेशीर कारवाई करण्याचा निर्देश महिला आयोगाने दिला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांना तसे पत्र आयोगाने पाठविले आहे.

#### पोलिसात तक्रार करणार : गोंडाने

गायिका अंजलीच्या आक्षेपार्ह विधानामुळे भाजपा कार्यकर्ते आक्रमक झाले असून, विविध पोलिस ठाण्यांमध्ये तक्रारी दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. भंडारा जिल्ह्यातही भाजपा कार्यकर्ते अंजलीच्या वक्तव्याचा निषेध करीत पोलिसात तक्रार दाखल करतील, असे भाजपाचे जिल्हाध्यक्ष आशू गोंडाने यांनी स्पष्ट केले.

#### कारवाईची प्रक्रिया सुरू

पोलिस अधीक्षक दाखल होत असलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने भारती यांच्यावर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे जिल्हा पोलिस अधीक्षक नुरूल हसन यांनी 'तभा'ला सांगितले.

### उधमपूरमध्ये बसचा अपघात; ४ ठार, २५ प्रवासी जखमी

◆ **उधमपूर, २७ जानेवारी**

जम्मू-काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यातील जम्मू-श्रीनगर महामार्गावर मंगळवारी भरधाव खाजगी बस दुचाकीला धडक देत रस्त्याच्या कडेला उलटली. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला, तर २५ प्रवासी जखमी आहे.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले, खाजगी बस उधमपूरकडे असताना समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यानंतर बस अनियंत्रित होऊन रस्त्याच्या बाजूला उलटली. घटनेची माहिती मिळताच, पोलिस अपघातस्थळी पोहोचले आणि जखमींना उधमपूर येथील रुग्णालयात पोहोचविण्यात आले. डॉक्टरांनी चार जणांना मृत घोषित केले, तर २५ जखमींवर उपचार सुरू आहे. मृतांची ओळख अद्याप अधिकृतपणे जाहीर झालेली नाही. पोलिसांनी अपघाताचा तपास सुरू केला आहे आणि पुढील कारवाई करीत आहेत. ◄(वृत्तसंस्था)

**जम्मूच्या कन्येने रचला इतिहास**

# कॅप्टन हंसजा ठरल्या रुद्र आर्मर्ड हेलिकॉप्टरच्या पहिल्या महिला वैमानिक

◆ **नवी दिल्ली, २७ जानेवारी**

जम्मूच्या सेंट झेवियर्स शाळेत मिळालेली एक शिकवण कॅप्टन हंसजा यांच्यासाठी भविष्याची दिशा ठरवणारी ठरली. त्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत गगनभरारी घेतली आहे. आज त्या भारताच्या पहिल्या महिला रुद्र आर्म्ड हेलिकॉप्टर पायलट आहेत.

२६ जानेवारी २०२६ च्या प्रजासत्ताक दिन संचलनात २५१ आर्मी एव्हिएशन स्क्वॉड्रनचे नेतृत्व केले आहे. कॅप्टन हंसजा यांची यशोगाथा आज भारतीय सैन्यात सामील होऊन देशसेवेचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक मुलीसाठी मोठी प्रेरणा आहे.

हंसजा यांचा जन्म ९ मार्च १९९८ रोजी जम्मूत झाला. त्यांच्या आई रश्मी शर्मा एक पत्रकार आहेत. हंसजा यांचे शालेय शिक्षण जम्मूच्या सेंट झेवियर कॉन्व्हेंट हायर सेकेंडरी स्कूलमधून झाले. त्यांच्या शाळेच्या भिंतीवर एक वाक्य लिहिले होते, स्वतःच्या बाबतीत कठोर बना. त्या दररोज हे वाक्य वाचत असत. या वाक्यामुळे त्यांना दररोज स्वतःच्या सीमा ओलांडून पुढे जाण्याची प्रेरणा मिळत राहिली. बारावीनंतर हंसजा यांनी गव्हर्नमेंट कॉलेज फॉर वुमन, जम्मू येथून पदवी पूर्ण केली. त्यानंतर त्यांनी भारतीय सैन्यात भरती होण्याचा निर्धार केला. त्यांनी नाशिक येथील कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूलमध्ये अत्यंत कठीण प्रशिक्षण घेतले.



### संकटांवर मात आणि जिद्द

» कॅप्टन हंसजा यांचा इथपर्यंतचा प्रवास जिद्द आणि धैर्याने भरलेला आहे. भारतीय सैन्यात सामील होण्याच्या त्यांच्या पहिल्या प्रयत्नात, वैद्यकीय चाचणीमध्ये एका कारणामुळे त्यांना तात्पुरते अपात्र ठरवण्यात आले होते. मात्र, त्यांनी हार मानली नाही. अवघ्या १५ दिवसांत नाकाची शस्त्रक्रिया करून घेतली, जी तीन तास चालली होती. या जिद्दीच्या जोरावर त्या अखेर भारतीय सैन्यात सामील झाल्या. ■

या प्रशिक्षणादरम्यान त्यांना हाय-स्पीड कॉम्बॅट मिशनसाठी तयार करण्यात आले. हा कोर्स लष्करी विमान वाहतूक क्षेत्रातील सर्वांत कठीण प्रोग्राम मानला जातो. या कोर्समध्ये त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला आणि बेस्ट कॉम्बॅट एव्हिएटरसाठी दिली जाणारी सिल्व्हर चिता ट्रॉफी जिंकणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या.

रुद्र हे भारतीय सेना आणि वायुसेनेचे एक महत्त्वाचे लढाऊ हेलिकॉप्टर असून, ते पूर्णपणे स्वदेशी आणि शस्त्रास्त्रांनी सज्ज आहे. रुद्र हे नाव भगवान शंकरावरून घेण्यात आले आहे. कॅप्टन हंसजा शर्मा यांच्यासाठी लढाऊ हेलिकॉप्टरचे सारथ्य करणे हा एक ऐतिहासिक क्षण असून, हे महिला सक्षमीकरणाचे एक मोठे उदाहरण आहे. ◄(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# जल दिवाळखोरीचा इशारा

जात, धर्म, पंथ, भाषा, पक्ष, वर्ण, वंश अशा अनेकानेक भेदाभेदांची चर्चा उच्चरवाने करणाऱ्यांच्या देशात आपली अनेक क्षेत्रातली दिवाळखोरी दुर्लक्षित होत असते. ताजे उदाहरण पाण्याच्या दिवाळखोरीचे! आत्ता-आत्ता आलेला एक अहवाल असे म्हणतो की, ८०० कोटींच्या दुनियेत चारशे कोटी लोकांवर फार मोठे जलदुर्भिक्षाचे संकट घोंघावते आहे आणि त्यात भारतातील अनेक शहरांचा, प्रदेशांचा समावेश आहे. मानवी उत्क्रांतीच्या इतिहासात पाहिले तर असे दिसते की, पाण्याच्या काठाने अर्थात समुद्र आणि नद्यांच्या काठी संस्कृती फुलली. पाण्यामुळेच शेती बहरली आणि उद्योग विस्तारले. त्यामुळेच जलदेवता ही संकल्पना अनेक संस्कृतींमध्ये जन्माला आली. मानवी समुदायाने पाण्याच्या भरवशावर फार मोठी प्रगती आतापर्यंत साधली खरी. पण, मानवी हव्यासाने निसर्गाचा सत्यानाश केला. २१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात प्रवेश करताना, याच मानवजातीने निसर्गाच्या सर्वांत मोठ्या दातृत्वाचा म्हणजे जलसंपदेचा 'चेक' बाऊन्स केला आहे. म्हणजे आपण ज्या संख्येने आहोत, त्या संख्येला पाणी देण्याची आपली क्षमता राहिलेली नाही. आपण 'जल टंचाई' या कल्पनेच्या पलीकडे गेलो आहोत आणि 'जल दिवाळखोरी'च्या टप्प्यावर पोहोचलो आहोत. हा टप्पा असा आहे की, जिथे निसर्गाची पाणी देण्याची क्षमता आणि आपली पाणी ओरबाडण्याची वृत्ती यांच्यातील ताळेबंद पूर्णपणे कोलमडला आहे. जल दिवाळखोरीसंबंधीचा अहवाल धक्कादायक आहे. जगातील सुमारे ४ अब्ज लोकांवरच्या संकटाचे वर्णन त्यात आहे. जगातील १८ टक्के लोक ज्या भारतात राहतात, तेथे केवळ ४ टक्के गोड्या पाण्याचे स्रोत आहेत. त्यामुळे दिवाळखोरांच्या यादीत आपण बरेच पुढे असू हे नक्की.

अर्थशास्त्राच्या भाषेत जेव्हा तुमचे देणे तुमच्या मालमत्तेपेक्षा जास्त होते, तेव्हा तुम्ही दिवाळखोर घोषित होत असता. पाण्याचेही तसेच आहे. असे समजा की, आपण निसर्गाकडून दरवर्षी जे पाणी आपण पावसाच्या रूपात मिळवतो, तो आपला वार्षिक 'पगार' आहे. खरे तर पगारावर भागले पाहिजे. पण, पगारावर भागविण्याची रीतच राहिलेली नाही. गेल्या अनेक दशकांपासून आपण आपल्या 'फिक्स्ड डिपॉझिट'वर, म्हणजेच भूगर्भातील पाण्यावर आणि हिमनद्यांवर जगत आहोत. एकप्रकारे संचित ओरबाडतो आहोत. दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन शहराने काही वर्षांपूर्वी 'डे झीरो' (ज्या दिवशी नळाला पाणी येणार नाही) अनुभवला होता. आज भारतातील बंगळुरू हे जागतिक कीर्तीचे शहर त्याच मार्गावर आहे. एकेकाळी हजारो तलावांचे शहर असलेले बंगळुरू आयटी हब बनले आहे. पण तिथल्या भूजलाची पातळी फार खाली गेली आहे. शहरात राहणारे लाखो लोक आज पूर्णपणे खाजगी टँकर माफियांच्या दयेवर जगत आहेत. नागपुरातही एके काळी बरेच तलाव होते. ते बारा महिने भरलेले असायचे. आता त्या तलावांची दशा पाहावत नाही. मुंबई आणि दिल्लीची परिस्थिती फार वेगळी नाही. दिल्लीत यमुनेचा प्रवाह इतका प्रदूषित झाला आहे की, ते पाणी शुद्ध करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे राहिलेले नाही. दिल्लीच्या अनेक भागांत पाणी उपसा करण्यासाठी आता जमिनीला 'छिद्र' पाडण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. पण त्या छिद्रांतून आता पाणी काढणे जवळपास अशक्यप्राय आहे. मुंबईत पावसाचे प्रमाण जास्त असले तरी, त्या शहराचे काँक्रिटीकरण इतके प्रचंड झाले आहे की, पावसाचे किंवा अन्य मार्गांनी येणारे पाणी जमिनीत न मुरता थेट समुद्रात वाहून जाते. नजीकच्या भविष्यात भारतातील अर्धी लोकसंख्या भीषण पाणीटंचाईमुळे त्रस्त होणार आहे. त्यात असंख्य शहरे असतील, गावेही असतील. भारतात ७० ते ८० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते. उद्योगांसाठीही प्रचंड प्रमाणात पाणी वापरले जाते. औद्योगिक सांडपाण्याने आपल्या नद्यांचा सत्यानाश केला आहेच. हरित क्रांतीनंतर आपण अन्नधान्यात स्वयंपूर्ण झालो, पण त्या बदल्यात आपण भूगर्भातील पाण्याचे प्रचंड शोषण केले. पंजाब आणि हरयाणा, जे भारताचे अन्नछत्र मानले जातात, तिथे इतके पाणी वापरले गेले आहे की, तिथे आता वाळवंटीकरणाची लक्षणे दिसू लागली आहेत. महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेश हे याचे उत्तम उदाहरण आहे. या कमी पावसाच्या प्रदेशात 'ऊस' या नगदी पिकाची लागवड केली गेली. उसाला प्रचंड पाणी लागते. एक किलो साखरेसाठी सुमारे १५०० ते २००० लिटर पाणी लागते. उसाचे अर्थकारण मराठवाड्याच्या तोंडचे पाणी पळविणारे ठरले आहे, हे दरवर्षी दिसतेच. ऊस पिकवणाऱ्या इतर भागांमध्येही हीच परिस्थिती उद्भवणार आहे. आपले औद्योगिकीकरणाचे हव्यास आणि प्रगतीच्या कल्पना एवढ्या चुकीच्या ठरत आहेत की माणसं राहतील तर या साऱ्या गोष्टींना अर्थ असेल, एवढेही आपल्याला कळेनासे झाले आहे. उदाहरण घ्या पाणथळाच्या जमिनींचे. पाणथळाच्या जागा या निसर्गासाठी 'किडनी' म्हणून काम करतात. त्या ठिकाणी पाणी शुद्ध होते आणि साठवले जाते. भारताने गेल्या ३० वर्षांत आपल्या ३० टक्के पाणथळ जागा नामशेष केल्या आहेत. ठाण्याची खाडी असो किंवा कोलकात्याची, पूर्वीच्या काळची पाणथळ जमीन, नव्या काळात रिअल इस्टेटच्या नावाखाली काळाच्या ओघात दिसेनाशी झाली आहे. परिणामी, पावसाचे पाणी साठवण्याची निसर्गाची क्षमता कमी झाली आणि जल दिवाळखोरीचा वेग वाढला. नद्यांची पात्रे आपण संकुचित केली. रेतीच्या उपशाने जो कहर केला आहे, त्याला तर मानवी हव्यास आणि भ्रष्टाचाराचा हिमालयच म्हटले पाहिजे. दुसरीकडे हिमालयातील हिमनद्या वेगाने वितळत आहेत. त्या भागातील बर्फाचे साठे संपले तर उत्तर भारतातील तब्बल ६० कोटी लोकांचे अस्तित्व धोक्यात येईल. पावसाचे चक्रही बदलले आहे. आता पाऊस कमी दिवसांत पण प्रचंड वेगाने पडतो. त्यामुळे जमिनीला पाणी शोषून घेण्यास वेळच मिळत नाही. शहरे व गावांमध्ये काँक्रिटमुळे जमीन झाकली गेली आहे. झाडांच्या मुळांच्या भोवताली श्वास घ्यायला जमीन नाही. अशात जलस्रोत संपणार किंवा कमी होणार नाहीत तर दुसरे काय होणार? जलस्रोत कोरडे पडतात, तेव्हा गावेच्या गावे रिकामी होतात. देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो कुटुंबे कामाच्या शोधात मुंबई-पुण्याकडे येतात तेव्हा त्यात हेही एक कारण असते. त्यांच्यामुळे या शहरांच्या पायाभूत सुविधांवर ताण पडतो. दुर्दैव असे की, निसर्गाचाही मुद्दा या स्थलांतरात आहे, हे साफ विसरले जाते. फक्त राजकारणाचा तेवढा पाऊस पडत राहतो. आर्थिक दिवाळखोरीतून बाहेर पडण्यासाठी जसे 'बेलआऊट पॅकेज' किंवा कठोर शिस्त लागते, तसेच आपल्याला जल क्षेत्रासाठी करावे लागेल. प्रत्येक ग्रामपंचायत, नगर पालिका-पंचायत आणि महानगरपालिकेने आपले 'वॉटर बजेट' जाहीर केले पाहिजे. आपल्याकडे किती पाणी येते आणि आपण किती खर्च करतो, याचा दरमहा हिशेब जनतेसमोर सादर केला जायला हवा. उद्योगांना आणि मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांना 'वॉटर ऑडिट' अनिवार्य केले पाहिजे. इस्रायलने जगाला दाखवून दिले आहे की, पाण्याचा वापर आणि पुनर्वापर कसा करावा. तिथे ९० टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते शेतीसाठी वापरले जाते. भारतालाही प्रत्येक शहरात सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभे करावे लागतील. मुंबईतील समुद्रात सोडले जाणारे सांडपाणी जर प्रक्रिया करून उद्योगांना दिले, तर धरणांमधील पाणी पिण्यासाठी शिल्लक राहील. शेतकऱ्यांना कमी पाण्यावर पिकणाऱ्या पिकांकडे वळवण्यासाठी 'सबसिडी' दिली पाहिजे. ठिबक किंवा तुषार सिंचन अनिवार्य केले पाहिजे. 'सॅटेलाइट इमेजरी' आणि 'आयओटी' सेन्सर्सच्या मदतीने भूगर्भातील पाणी पातळीवर लक्ष ठेवले पाहिजे. कुठे अवैध उपसा होतोय, हे रिअल-टाईममध्ये कळल्यास कारवाई करणे सोपे होईल. अर्थात, हे फक्त सरकारचे काम नाही. व्यक्तिगत पातळीवर पाणीबचतीसाठी प्रयत्न करून सरकारवर पाणीचोरांवर कारवाई करण्याचा दबाव आणणे हे नागरिकांचेही कर्तव्य आहे. पृथ्वीच्या पोटात असलेल्या मर्यादित संसाधनांचा अमर्याद वापर करून मानवजात तग धरू शकणार नाही. पाणी ही विकत घेण्याची वस्तू नाही. ते जपून वापरण्यासाठीचे नैसर्गिक संचित आहे. आपण आपली जीवनशैली, आपली शेती आणि आपली धोरणे बदलली नाहीत, तर येणारा काळ आपले घसे कोरडे करणारा असेल आणि तो कोणत्याही महामारीपेक्षा कमी नसेल. जल दिवाळखोरीच्या इशाऱ्याचा अर्थ हाच! ▮

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# पायाभूत, गृहोद्योगामध्ये गुंतवणूक

भारत २०२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाची तयारी करत असताना उद्योग जगतातले धुरीण आणि धोरणतज्ज्ञ पुढील काही वर्षांमध्ये देशाच्या विकासाचा मार्ग निश्चित करू शकतील, अशा उपाययोजनांवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. अर्थसंकल्पात 'रिअल इस्टेट'पासून पायाभूत सुविधांपर्यंत आणि रस्त्यांपासून हरित खरेदीपर्यंत पायाभूत सुविधा, वित्तपुरवठा आणि शाश्वतता यावर लक्ष केंद्रित केले जाईल, अशी व्यापक अपेक्षा आहे. 'रिअल इस्टेट' क्षेत्र उपभोग-नेतृत्वाखालील वाढ, गुंतवणूकदारांचा विश्वास आणि निवासी तसेच व्यावसायिक बाजारपेठांमध्ये वित्तपुरवठ्याची उपलब्धता वाढवण्यासाठी उपाययोजनांची अपेक्षा करत आहे. हे क्षेत्र पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देणाऱ्या, मंजुरी सुलभ करणाऱ्या आणि वेळेवर प्रकल्प अंमलबजावणीला समर्थन देणाऱ्या उपक्रमांची अपेक्षा करत आहे. शहरी पायाभूत सुविधांमध्ये सतत गुंतवणूक करणे, बाजारपेठेतील गती टिकवून ठेवण्यासाठी आणि दीर्घकालीन विकास सक्षम करण्यासाठी महत्त्वाचे ठरेल. कार्यक्षम वित्तपुरवठा, मजबूत पायाभूत सुविधा आणि सुव्यवस्थित प्रक्रिया सुलभ करून, २०२६ चा अर्थसंकल्प प्रकल्प अंमलबजावणीत लक्षणीय वाढ करू शकतो. अधिक गुंतवणूक आकर्षित करू शकतो आणि संपूर्ण भारतात आधुनिक, शाश्वत शहरी वातावरणाच्या विकासाला चालना देऊ शकतो. विश्वासार्ह वित्तपुरवठा आणि मजबूत मागणी समर्थन सक्षम करणारी धोरणे या क्षेत्राची गती टिकवून ठेवण्यासाठी आणि शहरी विकासाची क्षमता उघड करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतील. जागतिक व्यापार अनिश्चितता आणि समष्टी आर्थिक अडचणी गुंतवणूक भावनांवर परिणाम करत असताना, अर्थसंकल्प एका महत्त्वाच्या टप्प्यावर येत आहे.

येत्या काळात बांधकाम क्षेत्रात वाढत्या खाजगी भांडवली खर्चामुळे निर्यातीच्या संधींमध्ये वाढ, संरक्षण अनुप्रयोग आणि विमानतळ, रेल्वे आणि मालवाहतूक कॉरिडॉरमध्ये शाश्वत गुंतवणूक होईल, अशी अपेक्षा आहे. खाजगी गुंतवणुकीत वाढ आणि उद्योगाचा विश्वास बळकट करण्यासाठी जीएसटीचे तरलीकरण, व्याजदर कमी करणे आणि सुधारित तरलता यासारखे धोरणात्मक उपाय आवश्यक आहेत. ते रस्ते आणि महामार्ग गतिशीलता, मालवाहतूक कार्यक्षमता आणि प्रादेशिक एकात्मतेसाठी महत्त्वपूर्ण आहेत. ते दीर्घकालीन हवामान उद्दिष्टांनाही समर्थन देतात. भारताने शाश्वत सार्वजनिक गुंतवणुकीद्वारे ६.५ दशलक्ष किलोमीटरचे विस्तृत रस्ते नेटवर्क तयार केले आहे, तरीही देखभाल प्रणाली जुन्या पद्धतींवर अवलंबून आहे. त्यात सुधारणा आवश्यक आहे. खर्च ऑप्टिमाईझ करण्यासाठी, सुरक्षितता आणि मालमत्तेचे आयुष्य वाढवण्यासाठी कामगिरी-आधारित देखभाल करारांसह 'एकत्रित डिजिटल रोड असेट मॅनेजमेंट सिस्टिम' (रॅम्स) स्वीकारण्याची आवश्यकता आहे. कमीत कमी खर्चात कमी-कार्बन सामग्रीचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी 'एमओआरटीएच', रेल्वे आणि 'सीपीडब्ल्यूडी' यासारख्या प्रमुख सरकारी संस्थांमध्ये हरित सार्वजनिक खरेदी संस्थात्मक करण्याची गरज आहे. यातून शाश्वत पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एक व्यावहारिक मार्ग तयार होईल आणि भारताच्या डिकार्बोनायझेशन मोहिमेला पाठिंबा मिळेल.

देशाचा अर्थसंकल्प गुंतवणूक, कार्यक्षमता आणि लवचीकतेसाठी उत्प्रेरक म्हणून काम करू शकतो. येत्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा क्षेत्राला सर्वाधिक महत्त्व असेल. ग्रामीण पायाभूत सुविधांकडे विशेष लक्ष दिले जाईल. अर्थसंकल्पात याबद्दल काही घोषणा केल्या जाऊ शकतात. रखडलेले मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी काही योजना जाहीर होण्याची शक्यता आहे. या श्रेणीमध्ये १८ योजना असून जुलै २०२४ मध्ये शेवटच्या अर्थसंकल्पीय घोषणेपासून त्यामध्ये सरासरी १०.८९ टक्क्यांनी घट झाली आहे. पायाभूत सुविधा आणि भांडवली वस्तू क्षेत्रातील चांगल्या कंपन्यांमध्ये पोर्टफोलिओचा योग्य भाग गुंतवून, संभाव्य नफ्याचा फायदा घेता येतो. जोखीम कमी करण्यासाठी, हळूहळू गुंतवणूक करण्याची रणनीती स्वीकारता येईल. या अर्थसंकल्पात ऊर्जा, रेल्वे आणि संरक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले जाऊ शकते. याशिवाय प्रशासन सुधारणे, कर्जाचे पुनर्गठन करणे आणि हरित ऊर्जेकडे वाटचाल करणे यासारखी पावलेदेखील उचलली जाऊ शकतात. या श्रेणीमध्ये सुमारे सहा फंड आहेत, जे जुलै २०२४ मध्ये शेवटच्या अर्थसंकल्पीय घोषणेपासून सरासरी १५.५८ टक्क्यांनी कमी झाले आहेत. या अर्थसंकल्पात सरकारचे लक्ष जास्त खर्च (भांडवल खर्च) करण्याऐवजी वापर वाढवण्यावर असेल. शिवाय गेल्या दहा वर्षांमध्ये भारताचा संरक्षण खर्च जागतिक सरासरीपेक्षा खूप वेगाने वाढला आहे.

सरकारी खर्चात वाढ आणि धोरणात्मक उपक्रमांमुळे संरक्षण क्षेत्रासाठी दीर्घकालीन दृष्टिकोन सकारात्मक आहे. जगातील वाढत्या तणावामुळे आणि भारताच्या स्वावलंबी होण्याच्या प्रयत्नांमुळे देशांतर्गत संरक्षण कंपन्यांच्या ऑर्डर आणि महसुलामध्ये वाढ होत आहे. भारतातील रिअल इस्टेट क्षेत्र एका वळणावर आहे. परवडणाऱ्या घरांची पुनर्प्राप्ती होते की ही गरज पुन्हा दुर्लक्षित होते, हे २०२६ चा केंद्रीय अर्थसंकल्प ठरवेल. लक्झरी प्रकल्पांची भरभराट होत आहे आणि त्यांची विक्री चांगली होत आहे; परंतु परवडणाऱ्या घरांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. वाढत्या किमती आणि कमी नफ्यामुळे विकासक बजेट प्रकल्पांपासून दूर जात आहेत. हे क्षेत्र आता तातडीने धोरणात्मक बदलांसाठी बजेटकडे पाहात आहे. लक्झरी आणि परवडणाऱ्या घरांमधील तफावत चिंताजनक बनली आहे. प्रीमियम घरे भरपूर खरेदीदार आणि गुंतवणूक आकर्षित करतात. मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी मात्र परवडणारी घरे कमी होत चालली आहेत. विकासक म्हणतात, की जमिनीच्या किमती खूप जास्त आहेत. बांधकाम खर्च वाढतच आहे. बजेट प्रकल्पांवरील नफा खूप कमी आहे. म्हणून ते परवडणारी घरे बांधणे पूर्णपणे थांबवतात. तरुण कुटुंबे आता घरे घेऊ शकत नाहीत. बँका जास्त व्याजदर आकारतात. त्यापोटी करावयाच्या मासिक खर्चामुळे घरांच्या उत्पन्नावर खूप तणाव येतो. अनेक लोकांना घरे खरेदी करण्यास उशीर करावा लागतो, तर काही जण असे स्वप्न पूर्णपणे सोडून देतात. यामुळे भारताच्या शहरी विकास योजनांना धक्का बसतो.

परवडणाऱ्या घरांचा अर्थ ४५ लाख रुपयांपेक्षा कमी किमतीची घरे; पण ही किंमत मर्यादा आता मोठ्या शहरांमध्ये काम करत नाही. जमीन आणि बांधकाम खर्च या मर्यादेपेक्षा खूपच वाढला आहे. मुंबई, दिल्ली आणि बंगळुरूमध्ये अगदी मूलभूत घरांची किंमतही खूप जास्त आहे. सरकारची परवडणाऱ्या घरांची व्याख्या आता अवास्तव आणि जुनी झाली आहे. उद्योगक्षेत्रातील धुरीणांच्या मते या व्याख्येमध्ये संपूर्ण सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. शहरांनी स्थानिक खर्चाच्या आधारावर स्वतःची किंमत मर्यादा निश्चित करावी.

आणखी एक बाब म्हणजे उद्योग जीएसटीचे सुसूत्रीकरण करू इच्छितो. बांधकाम सुरू असलेल्या घरांवरील सध्याचा जीएसटी खूप जास्त आहे. तो कमी केल्याने खर्च कमी होईल. गृहकर्जांवरील उत्पन्न कपात मर्यादा वाढल्यानेही मदत होईल. 'रिअल इस्टेट'ला उद्योगाचा दर्जा देणे हे परिवर्तनकारी ठरेल. त्यामुळे चांगल्या निधी स्रोतांना प्रवेश मिळेल. बँका विकासकांना अधिक सहजपणे कर्ज देऊ शकतील. जोखीम मूल्यांकन अधिक अचूक होईल. या दर्जामुळे 'रिअल इस्टेट'ला दीर्घकालीन, भांडवल-केंद्रित क्षेत्र म्हणून कायदेशीर मान्यता मिळेल. शहरांना चांगले रस्ते, मेट्रो सिस्टिम आणि उपयुक्तता आवश्यक आहेत. पायाभूत सुविधांमध्ये होणारी गुंतवणूक रोजगार निर्माण करते आणि लोकांना आकर्षित करते. त्यामुळे घरांसाठी नवीन क्षेत्रे इष्ट बनतात. पायाभूत सुविधांशिवाय परवडणारी घरेदेखील विकली जाणार नाहीत. 'रिअल इस्टेट' क्षेत्राचा विश्वास आहे, की २०२६ चा अर्थसंकल्प हा एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# राष्ट्रसंतांचे पाईक जनार्दनपंत बोथे गुरुजी

अमरावती जिल्ह्यातल्या तिवसा तालुक्यातील गुरुकुंज मोझरी येथील अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दनपंत बोथे गुरुजी यांना केंद्र सरकारने प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्मश्री पुरस्कार जाहीर केला. त्यांना मिळालेला हा पुरस्कार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा आणि कार्याचा गौरव आहे. बोथे गुरुजी विद्यार्थिदशेपासूनच राष्ट्रसंतांच्या कार्याचे आणि विचारांचे पाईक आहेत. त्यांचा जन्म २५ नोव्हेंबर १९३९ रोजी गोगरी, ता. मंगरूळपीर, जि. वाशीम येथे झाला. १४ जुलै १९५४ पासून ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांकडे आले. पुढे ते राष्ट्रसंतांच्या सहवासातच राहिले. त्यांचे खाजगी सचिव म्हणून कार्यरत होते. राष्ट्रसंतांसोबत त्यांनी देशभर प्रवास केला. त्यांच्या आजारपणात त्यांची सेवा केली. विविध पदे त्यांनी भूषविली. आपल्या जीवनातील पाच दशकांहून अधिक काळ समाज उद्धारासाठी त्यांनी वाहिला. शिक्षण, ग्रामीण विकास, आध्यात्मिक प्रचार आणि मानवसेवा हे त्यांचे प्रमुख कार्य आहे. अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज आश्रम (स्थापना १९४२, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज) यांचे प्रमुख सचिव म्हणून त्यांनी आध्यात्मिक मूल्यांना समाजातील मूळ पातळीवर परिवर्तनकारी कृतीत रूपांतरित केले आहे. दलित, आदिवासी आणि वंचित घटकांसाठी शिक्षणाची तातडीची गरज ओळखून, त्यांनी १९७२ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शिक्षण संस्था स्थापन केली. या उपक्रमांतर्गत त्यांनी आदिवासी व दुर्गम भागांमध्ये ११ निवासी शाळा व वसतिगृहे सुरू करून हजारो विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. ग्रामीण भागात त्यांनी योगाचा प्रसार केला. त्यांचे नेतृत्व केवळ पुस्तकी शिक्षणापुरते मर्यादित न राहता शिस्त, मूल्य, आणि नेतृत्व गुणांचाही संस्कार करणारे ठरले. बोथे गुरुजी हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या वारशाचे निष्ठावान संवाहक आहेत. त्यांनी राज्यस्तरीय साहित्य संमेलने आयोजित केली, दुर्मिळ छायाचित्रे व दस्तावेजांचे संग्रहालय तयार केले आणि ग्रामगीतेच्या प्रती समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविल्या, जेणेकरून महाराजांचे आध्यात्मिक व तात्त्विक विचार सर्वदूर प्रसारित होतील. त्यांचे आरोग्य उपक्रमही तितकेच प्रभावी ठरले आहेत. गुरुदेव आयुर्वेदिक रुग्णालयात नियमित रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहीम व आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. राष्ट्रीय एकात्मता सप्ताहासारख्या उपक्रमांद्वारे त्यांनी शेकडो गावांना एकत्रित कृतीसाठी प्रेरित केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आज १० हजारांहून अधिक ग्रामीण शाखा व ८५० महिला मंडळे योग शिबिरे, भजन कार्यक्रम, व्यसनमुक्ती मोहिमा व महिला सक्षमीकरण कार्यक्रम आयोजित करतात. श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस (प्रशासक) म्हणून त्यांनी गुरुकुंज आश्रमाचे आधुनिकीकरण करताना त्याच्या आध्यात्मिक मूळ स्वरूपास जपले. शासनाच्या दलित मित्र व आदिवासी सेवा संस्था पुरस्कारासह विविध राज्य व राष्ट्रीय पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. आता त्यांना देशाचा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार राष्ट्रसंतांच्या कार्याचा गौरव असल्याचे त्यांनी नम्रपणे सांगितले. त्यांचे खूप अभिनंदन!



**अमरावती जिल्हा आठ पद्म रत्नांचा :** अमरावती जिल्हा आता आठ पद्म पुरस्कार्थींचा झाला आहे. जिल्ह्याला पहिला पद्मश्री पुरस्कार डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांना १९५९ साली कुष्ठरोग निवारण आणि सामाजिक कार्यातील योगदानासाठी देण्यात आला. १९७१ साली बॅ. रामराव देशमुख यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. ब्रिटिश सरकारच्या काळात त्यांनी विविध पदे भूषविली होती. दोनवेळा ते राज्यसभेचे सदस्य होते. त्यानंतर थेट २०१२ मध्ये श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव प्रभाकरराव वैद्य यांना क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी, २०१६ साली 'झीरो बजेट' संकल्पनेवरच्या नैसर्गिक शेतीचे पुरस्कर्ते सुभाष पाळेकर, मेळघाटातील बैरागढ येथून आदिवासी बांधवांसाठी सामाजिक कार्य करणाऱ्या डॉ. रवींद्र व डॉ. स्मिता कोल्हे या दाम्पत्याला २०१९ मध्ये, परतवाडा जवळच्या वझ्झर येथील स्व. अंबादापंत वैद्य बालगृहाचे संचालक, अनाथांचे नाथ शंकरबाबा पापळकर यांना अनाथ मतिमंदांच्या संगोपनासाठी २०२४ साली आणि यंदा जनार्दनपंत बोथे यांना पद्मश्री पुरस्कार मिळाला आहे. पहिल्या महिला राष्ट्रपती, सरन्यायाधीश व राज्यपालाचा आणि आतापर्यंत प्राप्त आठ पद्म पुरस्कारांचा मान अमरावतीला मिळाला आहे. देशपातळीवर अमरावतीच्या विभूतींचे योगदान त्यातून अधोरेखित झाले आहे आणि पुढेही होत राहील. ▮

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# नारद पुराण

देवर्षी नारदांच्या नावाने हे पुराण असले तरी या पुराणात देवर्षी नारद श्रोत्याच्या भूमिकेत असून पुराण प्रवक्ते सनकादी मुनी आहेत. नारदांनी प्रश्न आणि शंका विचारून सनतकुमारादी चार बंधूंना बोलके केले म्हणून हे नारद पुराण.

हे पुराण ज्योतिषज्ञ, गणितज्ञ, वैयाकरणी, वास्तू विशारदांनी जरूर वाचले पाहिजे. अनेक बाबी प्रकाशात येऊ शकतात. पाश्चिमात्यांच्या नावावर चालणारे अनेक सिद्धांत आणि प्रमेय त्यांनी नारद पुराणातून अक्षरशः चोरले असावेत हे स्पष्ट दिसते. हे पुराण ब्रह्मदेवाचे चार पुत्र सनक, सनंदन, सनातन आणि सनतकुमार यांनी देवर्षी नारदांना दिलेला उपदेश आहे. देवर्षी नारद देखील ब्रह्मपुत्र आहेत. त्यामुळे मोठ्या भावांनी लहान भावाला सांगितलेले भक्तिशास्त्र म्हणजे नारद पुराण आहे.

नारद पुराण, नावावरूनच लक्षात येते की ही नारदांनी उकल केलेली अमृतवाणी आहे. देवर्षी नारद आणि नारायण नारायण हा नामजप हे घट्ट सूत्र सर्वांना ज्ञात आहे. त्यामुळे साहजिकच हे वैष्णव पुराण असून यात भगवान विष्णूंचे गुणगान आहे. उपलब्ध प्रतीनुसार या पुराणाचे दोन भाग असून, पूर्वभागाचे एकूण ४ भाग केले आहेत त्यांना ४ पाद म्हटले आहे. उत्तर भागातही अनेक कथा आणि माहात्म्य आहे.

प्रारंभीच नारदांनी सनतकुमारादीकांना विष्णुभक्तीचे माहात्म्य विचारले तेव्हा त्यांनी सुरुवातीला ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या ब्रह्मांडाच्या उत्पत्ती बाबत सांगितले. त्यानंतर विष्णुभक्तीचे फळ म्हणून मृकुंडू महामुनींची कथा आणि विष्णुकृपेने त्यांना झालेला पुत्र मार्कंडेय याची कथा विशद करतात. त्यानंतर सनकादी ऋषी नारदांना सगर राजाची कथा, भगिरथ राजाची कथा, गंगेचे भूतलावर अवतरण सांगितले. जीव अविद्येच्या बंधनातून कसा मुक्त होतो? नारदांच्या या प्रश्नांचे उत्तर देताना जनक राजा आणि आचार्य पंचशिख आणि भरत राजा पुढे जडभरत यांचा कथाभाग सांगतात.

शुकदेवांची कथा, ग्रहशांति प्रयोग, ॐ नमो नारायणाय अष्टाक्षर मंत्र, ॐ नमो भगवते वासुदेवाय हा द्वादशाक्षर मंत्र, श्रीरामपंचायतन मंत्र विधी, श्रीकृष्ण मंत्र विधी, युगुलशरणागती मंत्र, युगुल सहस्रनाम या पुराणात आहेत. श्री. गणपती स्तोत्र, दत्तात्रेय स्तोत्रासारखी अनेक स्तोत्रे इथे सापडतात. बौद्ध कल्की अवतारासह



विविध पुराणांचा परिचय, विविध व्रत माहात्म्य, बारा मासाच्या विविध तिथी माहात्म्य इथे विदित आहेत. विवाहाचे आठ प्रकार, चार वर्ण आश्रम, परा आणि अपरा विद्या, उत्तम लोक प्राप्ती याबाबत चर्चा आहे. काशी, प्रयाग, कुरुक्षेत्र, पुष्कर, अवंतिका माहात्म्य शिवाय गया श्राद्धाचे महत्त्व, श्राद्ध प्रयोगात विविध तिथी प्रयोग नारद पुराणात आहेत. पुरुषोत्तम क्षेत्र, कामाक्ष्या, प्रभास क्षेत्र, पंचवटी, गौतमी तटीचे त्र्यंबक, गोकर्ण, मथुरा, वृंदावन, रामेश्वर क्षेत्राचे माहात्म्य या पुराणात आहे.

या पुराणातील पूर्वभागातील द्वितीय पाद अभ्यासनीय, सर्जन आणि सृजनासाठी महत्त्वपूर्ण आहे. द्वितीय पादात वेदांचे सहा अंग दिले आहेत.

१) शिक्षा : यामध्ये मुख्यतः उच्चारण शास्त्र, सारेगमप हे स्वर, स्वराघात, विविध राग, ४९ तान, २१ मूर्च्छना इत्यादीबाबत विचार आहेत. हे वेदांगातील नाक आहे.

२) कल्प : नक्षत्र कल्प, वेद कल्प, संहिता कल्प, अंगिरस कल्प आणि शांति कल्प असे पंच कल्प आणि विधिशास्त्र आहे. हे वेदांगातील हात आहेत.

३) व्याकरण : यामध्ये शब्दांचे रूप, शब्दांच्या शक्ती, शब्दांच्या सिद्धी तथा व्युत्पत्ती, विभक्ती दिल्या आहेत. पाणिनी, व्याडी अशा वैयाकरणींनी नारद पुराण अभ्यासले असावे. हे वेदाचे मुख आहे.

४) निरुक्त : यामध्ये शब्दांचे अर्थ, व्युत्पत्ती अर्थात शब्दांचे योगिक स्वरूप आणि योगारूढ स्वरूपाचा विचार आहे. हे वेदाचे कान आहेत.

५) ज्योतिष : यामध्ये गणितीय सिद्धांत, ग्रह, नक्षत्र, फल, ग्रहांची गती, संक्रमण याबाबत चर्चा आहे. खरं म्हणजे ज्योतिष शास्त्र वेगळे चार लाख श्लोकांचे आहे. त्याचे तीन स्कंदात विभाजन नारद पुराणात दिले आहे. गणित, जातक आणि संहिता. हे वेदाचे डोळे आहेत.

६) छंद - यामध्ये लौकिक आणि अलौकिक छंदाचे वर्णन आहे. छंदांना वेदांचे चरण म्हणतात. ज्ञानेश्वर माउलींनी ज्ञानेश्वरीत सर्व छंदांचा वापर केला आहे तो याच पुराणातील असावा. छंद वेदांगातील पाय आहेत.

वास्तू, ज्योतिष आणि गणित अभ्यासकांसाठी नारद पुराण पर्वणी आहे. ज्याला आपण पायथागोरसचे प्रमेय म्हणतो ते त्याचे नसून त्याने ते नारद पुराणातून चोरले आहे. परीघ, व्यास, त्रिज्या अशी भूमितीय संज्ञा आणि प्रमेय याच पुराणातील आहेत.

बीजगणितातील वर्ग, वर्गमूळ या संकल्पना या पुराणात आहेत.

**समांकघातो वर्गः स्यात् तमेवाहुः कृतिं बुधाः।**
**अन्त्यात्तु विषमात्त्यक्त्वा कृतिं मूलं न्यसेत्पृथक् ॥**
**द्विगुणेनामुना भक्ते फलं मूले न्यसेत् क्रमात्।**
**तत्कृतिं च त्यजेद्विप्र मूलेन विभजेत् पुनः ॥१७॥**
**एवं मुहुर्वर्गमूलं जायते च मुनीश्वर।**

एखाद्या संख्येचा वर्ग काढणे आणि वर्गमूळ काढणे याची सोपी पद्धत या पुराणात दिली आहे.

वास्तूपुरुषाचे वर्णनही या पुराणात दिले आहे.

**वास्तुपुरुष नमस्तेऽस्तु भूशय्यानिरत प्रभो।**
**मद्गृहं धनधान्यादिसमृद्धं कुरू सर्वदा॥**

सनकादीक मुनिजनांनी देवर्षी नारदांना या पुराणाच्या माध्यमातून भगवान विष्णूंचा कृपाप्रसाद प्राप्त होण्यासाठी सोपा उपासना मार्ग सांगितला आहे. मोक्षप्राप्तीसाठी काय केले पाहिजे तो मार्गसोपान विशद केला आहे. विष्णुभक्तीचे लाभ कोणते यावर चिंतन केले आहे. याशिवाय गोहत्या, मदिरापान, मांसभक्षण, परस्त्रीप्रति दुर्भावना, चोरी ही पापे असल्याबाबत आणि त्याची शिक्षा आणि प्रायश्चित्त यावरही मार्गदर्शन दिले आहे.

नारद पुराण हे समाजशास्त्र आणि भक्तिशास्त्राचा अनोखा संगम आहे. सकाम उपासनेकडून निष्काम उपासनेकडे नेणारा शास्त्रीय विचार म्हणजे नारद पुराण होय. ▮

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### भारताचे भविष्य तरुणांच्या हातात

शेकडो वर्षांच्या गुलामीतून मुक्त होऊन भारताने प्रजासत्ताक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. प्रजासत्ताक दिन हा केवळ ध्वजारोहण आणि समारंभांचा दिवस नसून, आपल्या हक्कांबरोबरच कर्तव्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. आज देश उद्योग, तंत्रज्ञान, शेती, आरोग्य आणि डिजिटल क्षेत्रात वेगाने प्रगती करत आहे, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. मात्र ही प्रगती केवळ भौतिक पातळीवरच मर्यादित राहिली, तर ती टिकाऊ ठरणार नाही. आज साधने वाढत असताना संयम, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारी याकडे दुर्लक्ष होताना दिसते. केवळ भोगाची तृष्णा वाढली आणि सद्गुणांचा विकास झाला नाही, तर उन्नतीचा खरा अर्थच हरवतो.

भारतीय संस्कृतीने नेहमीच संयम आणि परमार्थ यांचे महत्त्व सांगितले आहे. वाढलेली शक्ती, ज्ञान आणि सुविधा यांचा योग्य वापर आत्मसंयमामुळेच शक्य होतो. मनुष्य हा समाजाचा ऋणी आहे; समाजासाठी आपले कर्तव्य पार न पाडणे म्हणजे कर्तव्याकडे दुर्लक्ष होय. राष्ट्राच्या समृद्धीसाठी आर्थिक उन्नती आवश्यक आहेच; पण चरित्र विकास त्याहून अधिक महत्त्वाचा आहे. चरित्र बळकट नसेल, तर कोणतीही भौतिक यशस्विता टिकून राहत नाही. आजच्या तरुणांसमोर एक मोठे आव्हान आहे. केवळ यशस्वी नागरिक बनणे नव्हे, तर सुसंस्कृत, जबाबदार आणि राष्ट्रासाठी विचार करणारे नागरिक बनणे. भारताचे भविष्य तरुणांच्या चारित्र्याच्या बळावरच घडणार आहे. आज प्रत्येक तरुणाने हे लक्षात ठेवले पाहिजे की भारताचे भविष्य तरुणांच्या हातात आहे केवळ अधिकारांची अपेक्षा न ठेवता कर्तव्य शिस्त संयम आणि राष्ट्रनिष्ठा जोपासली तरच भारत खऱ्या अर्थाने बलवान आणि गौरवशाली बनेल.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

● ● ● ●

### आयसीसीचा खंबीरपणा स्वागतार्ह

बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडची निवड, ही बातमी वाचली. हे होणारच होते. आयसीसी बरोबर केलेल्या कराराचे उल्लंघन करून बांगलादेशाने भारतात खेळण्यास ऐनवेळी नकार दिला आणि त्याचा परिणाम बांगलादेशाला भोगावा लागला. मात्र पाकिस्तानबाबत असा कोणताही वाद नसतानाही पाकिस्तानलाही आता खुमखुमी आली आहे असे वाचण्यात आले. बांगलादेशवर झालेल्या अन्यायाचे निमित्त साधून पाकिस्तान आपले महत्त्व वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहे आणि वर्ल्ड कप सामन्यांवर बहिष्कार घालण्याची पोकळ धमकी देत आहे. आयसीसी बरोबर केलेल्या कराराचे उल्लंघन केल्यास पाकिस्तानलाही गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. मात्र ते करण्यापूर्वी पाकिस्तानने त्यांच्या रमीज राजा या खेळाडूशी चर्चा जरूर करावी. आयसीसीचे ऐंशी टक्के उत्पन्न एकट्या बीसीसीआयकडून येत असल्याने, जर भारताने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या बाबतीत हात आखडता घेतला तर, पाकिस्तानी खेळाडूंकरिता बूट खरेदी करण्यासाठी सुद्धा पाकिस्तानी क्रिकेट मंडळाला इतर देशांकडे कटोरा घेऊन फिरावे लागेल, अशी स्पष्टोक्ती रमीज राजाने नुकतीच केली होती. तेव्हा आपले उपद्रवमूल्य वाढवण्याचा प्रयत्न करणे पाकिस्तानसाठी आत्मघातकी ठरू शकतो. आयसीसीच्या खंबीरपणाबाबत त्यांचे अभिनंदन.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

● ● ● ●

### न्यूझीलंडवर भारताचा शानदार विजय

गुवाहाटी येथे गोलंदाजांच्या प्रभावी कामगिरीनंतर अभिषेक शर्मा आणि कर्णधार सूर्यकुमार यादवच्या दमदार फलंदाजीच्या बळावर भारताने येथे तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात पाहुण्या न्यूझीलंडवर १० षटके शिल्लक ठेवीत ८ गड्यांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयाबरोबरच भारताने ५ सामन्यातील टी-२० मालिका ३-० ने खिशात घातली आणि आगामी टी-२० विश्वचषकासाठी सज्जा असल्याचे दाखवून दिले. जसप्रीत बुमराह सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. भारताने दहा षटकांत २ बाद १५५ धावा केल्या. अभिषेक शर्माने अवघ्या २० चेंडूत ७ चौकार व ५ षटकारांच्या मदतीने नाबाद ६८ धावांची तर कर्णधार सूर्यकुमारने २६ चेंडूत ६ चौकार व ३ षटकारांच्या मदतीने नाबाद ५७ धावांची विजयी खेळी केली. अभिषेकने अवघ्या १४ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. सामन्यातील भारतीय फलंदाजांची अप्रतिम फलंदाजी पाहून प्रत्येक भारतीय क्रिकेटप्रेमीला अतिशय आनंद व अभिमान वाटला असेल, यात शंका नाही. कर्णधार सूर्यकुमारने कर्णधाराला शोभेल अशाच प्रकारची कामगिरी केलेली आहे आणि कर्णधाराकडून हीच अपेक्षा आपली असते. जसप्रीत बुमराहची गोलंदाजी, ईशान किशन, अभिषेक शर्मा व सूर्यकुमारची फलंदाजी अप्रतिम होती. भारतीय संघाचा खेळ पाहता ७ फेब्रुवारीपासून सुरू होणारा टी-२० विश्वचषक जिंकण्याची भारताची पूर्ण तयारी आहे, असे वाटते. ▮

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



# अक्कलकोट जि.प. ६ गटासाठी १८ उमेदवार रिंगणात

## पंचायत समितीसाठी ५३ रिंगणात

**अक्कलकोट, दि. २७ जानेवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ६ गटासाठी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी एकूण ४६ उमेदवारांनी माघार घेतली आहे. १८ उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत

पंचायत समिती १२ गणासाठी एकूण ११० उमेदवारानी माघार घेतली आहे. प.स. गणासाठी ५३ उमेदवार निवडणुक लढवत आहेत.

जिप चप्पळगाव गटासाठी भाजपाकडून शांभवी कल्याणशेट्टी, सुजाता भरमशेट्टी शिवसेनेकडून वागदरी जिप साठी भाजपाच्या राजश्री शेळके, शिवसेनेकडून प्रविण तानवडे, काँग्रेसकडून मल्लीकार्जुन हत्ते, जिल्हा परिषद जेऊर गटासाठी काँग्रेसकडून अश्वमेघ बनसोडे भाजपाकडून विकास बुळ्ळा, वंचित बहुजन आघाडी कडून यशवंत इंगळे, अपक्ष बंडेप्पा भुताळी अपक्ष सत्यम कट्टीमनी जिल्हा परिषद मंगरूळ गटासाठी भाजपाकडून शिवानी स्वामी, राष्ट्रवादी कडून सुज्ञानी बनसोडे सलगर, नागणसुर जिपसाठी भाजपाकडून सिद्धाराम शिवमुर्ती रिंगणात आहेत. शिवसेनेकडून धनराज धनशेट्टी, संतोष शिंदे सलगर जिपसाठी भाजपाकडून सिध्दाराम बाके शिवसेनेकडून शिवराज म्हेत्रे दत्तात्रय माडकर यांच्यात लढत आहे.

# दारूच्या नशेत ब्लेडने मारुन घेतले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

दारुच्या नशेत तसेच घरगुती भांडणातून एका तरुणाने हातावर ब्लडने मारुन घेतल्याची घटना जुळे सोलापूर येथील गजानन नगरात शनिवारी रात्री १० वाजता घडली. आकाश अशोक व्हनमाने (वय-२८) असे त्या तरुणाचे नाव आहे.

# आईने रागावल्याने प्राशन केला पिवळा रंग

**सोलापूर, दि.२७ जानेवारी-**

घरातील कामावरुन रविवारी सकाळी मुलीवर आई रागावली, त्या रागातून मुलगी भावना उसाकोयल (वय-१८, रा.नीलम नगर, सोलापूर) हिने अंगणात सडा मारण्याचा पिवळा रंग प्राशन केला. त्यात तिला त्रास होऊ लागला, तिच्या मामाने तिला तातडीने छत्रपती शिवाजी रुग्णालयाम ध्ये दाखल करण्यात आले.

# 'पीएनजी'चा परंपरा आणि आधुनिकतेचा नवा अध्याय सुरू

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

पीएनजी ज्वेलर्सने बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता रणबीर कपूर याची नवा ब्रँड ऍम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. परंपरेची जाण, आकर्षकता आणि विश्वासार्हता यांचा सहज संगम असलेला रणबीर कपूर पीएनजी ज्वेलर्सच्या प्रवासातील एक रोमांचक नवा अध्याय ठरणार असून, यामुळे ब्रँडची राष्ट्रीय पातळीवरील उपस्थिती अधिक भक्कम करणार आहे.महाराष्ट्राच्या मातीतून सुरू झालेले आणि आज भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावर आत्मविश्वासाने विस्तार करत असलेले पीएनजी ज्वेलर्स डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहे. रणबीर कपूरसोबतची ही भागीदारी ब्रँडच्या उत्क्रांतीचे प्रतीक असून, विश्वास, कारागिरी आणि वारसा या मूल्यांशी असलेली नाळ अधिक दृढ करते.हा करार जानेवारी २०२६ पासून सुरू होणार असून, रणबीर कपूर विद्यमान ब्रँड ऍम्बेसेडर म्हणून पीएनजी ज्वेलर्सचे प्रतिनिधित्व करणार आहे.


## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब डि. बार्शी व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. बार्शी व ता. बार्शी पैकी बार्शी म्यू. पल हद्दीतील गट नं. १२८७ पैकी प्लॉट नं. ९ याचे क्षेत्र २५१.१३ चौ. मी. असे असुन, यासी चतुःसिमा पुर्वेस रस्ता, दक्षिणेस -रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. ८ व उत्तरेस श्री. बालाजी कैलास लांडगे यांची मिळकत असून याची पाणी वागणूक पुर्व व दक्षिणेकडील रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसीमापुर्वक संपूर्ण प्लॉट आतील सर्व दगड माती व इतर तद्‌गभूत वस्तूसह तसेच वहिवाटीच्या हक्क व अधिकारासह.

सदर नमूद प्लॉटजागा ही श्री. सुभाष संभुआप्पा ठोकडे, व श्री. मोहन संभुआप्पा ठोकडे, रा. आगळगाव रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे सामाईक खरेदी मालकीची व कब्जेवहिवाटीची व ७/१२ सामाईक हक्कपत्रकी नोंद असलेली असून सदर मिळकत त्यांनी त्यांचे कौटूंबिक अडचणीकरीता व इतर कायदेशीर गरजेकरीता आमचे अशिलास विक्री करण्याचे ठरवले आहे. त्याप्रमाणे सदर प्लॉट जागेबाबत आमचे अशिलासोबत श्री. सुभाष संभुआप्पा ठोकडे, व श्री. मोहन संभुआप्पा ठोकडे, यांनी इसारपावती व्यवहार केलेला आहे व सदर व्यवहारापोटी काही इसारादाखल रक्कमही स्विकारलेली आहे.

तरी सदर प्लॉट जागेबाबत कोणाचे कसलेही अधिकार, हक्क, म्हणजे साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, बहिण हिस्सा, चोळी बांगडी, गहाणपट्टा, बटईपत्र, विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही हक्क असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासह आमचे कार्यालयात ०८ दिवसात लेखी हरकत नोंदवावी. कागदोपत्री पुराव्याशिवाय हरकत आल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास सदर प्लॉटजागेवर कोणाचाही हक्क नाही असे समजून आगचे अशिल सदर प्लॉटजागेबाबत खरेदीखत करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

ता. २८/०१/२०२६

**सही/-**
**अशिल**

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड**
**ॲड. सुरज संजय जामदार,**
पत्ता:- शिंदे प्लॉट, उपळाई रोड, बार्शी, ता. बार्शी, जि.. सोलापूर



## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः बार्शी शहर म्यु.पल हद्दीतील लोकांना आमचे खाली सही करणारे अशिलांनी माहिती दिलेवरून व नोटीस देण्याचे सांगितलेवरून या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील जुना गट नं. ११०० याचा नवीन गट नं. ११०६ याचा स.नं. ५२४ पैकी भूखंड क्र. ७ त्याचा प्लॉट नं. ७ हा प्लॉट, १) सौ. दिलशाद अकबर पठाण, २) महीबुब मियाँ शेख यांच्या सामाईक खरेदी मालकीची असून तिचे क्षेत्रफळ १५०.५३ चौ.मी. यांसी चतुःसिमा पुर्वेस - सदर गट नंबर पैकी प्लॉट नं. ६ दक्षिणेस - सदर प्लॉट पैकी सोडलेला रस्ता, पश्चिमेस - गट नं. ११०६, उत्तरेस - ६.१० मी. रुंदीचा रस्ता, येणेप्रमाणे गुंठेवारी नियमाधीन झालेला प्लॉट आतील तदंगभूत वस्तुसह .

सदर प्लॉटचा ताबा व वहिवाट आजही आमचे अशिल सौ. दिलशाद अकबर पठाण करीत आहेत. असे असतानाही महीबुब मियाँ शेख हे लोकांची दिशाभूल करून नमूद प्लॉट त्यांचे एकटयाचे मालकीचा असल्याचे भासवून परस्पर विक्री करण्याच्या तयारीत आहे. सदरील प्लॉट हा आजही सौ. दिलशाद अकबर पठाण व महीबुब मियाँ शेख यांचे सामाईक खरेदी मालकीचा आहे. तसेच सदर प्लॉटवर फाईव्ह स्टार, शाखा बार्शी या संस्थेचे (बँकेचे) मॉर्गेज लोन आहे. अशी वस्तुस्थिती असताना महीबुब मियाँ शेख हे आमचे अशिल सौ. दिलशाद अकबर पठाण यांचे अपरोक्ष विक्री करणार असल्याचे आमचे अशिलास नुकतेच कळाले आहे. तसेच त्यांनी आमचे अशिलांचे नातलगाजवळ बोलूनही दाखविले आहे.

सबब या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर उल्लेख केलेल्या आमचे अशिलाचे कब्जेमालकी वहीवाटीचे प्लॉटशी कोणीही कसलीही गहाण, दान, लिज, इसारपावती, बक्षिसरपत्र, हिब्बानामा, साठेखत, खरेदीखत अथवा इतर कसलाही जमीन हस्तांतरणाचा व्यवहार करू नये, या उपर कोणी सदर प्लॉटशी कोणीही कांही व्यवहार केल्यास तो आमचे अशिलावर व सदर प्लॉटचे कब्जे मालकी वहीवाटीवर बंधनकारक राहणार नाही कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून मी सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे ता. २८/०१/२०२६

**सही/-**
**अशिल**

**सही/-**
**ॲड. रियाज अ. शेख**
**सौ. दिलशाद अकबर पठाण**
**रा. बार्शी, ता. बार्शी**
**तर्फे ॲडव्होकेट**



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील सर्व लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब. डि. ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील खुला प्लॉट याचा सर्व्हे नं. ५२७, जुना गट नं. ११२२, नवीन गट नं. ११२८ मधील प्लॉट नं. ३० याचे क्षेत्रफळ २००.०० चौ.मी. याचे मोजमाप पुर्व पश्चिम मी. ११.०० व दक्षिणोत्तर मी. २०.०० यासी चतुःसिमा पुर्वेस - प्लॉट नं. २९, दक्षिणेस - ओपन स्पेस, पश्चिमेस प्लॉट नं. ३१, उत्तरेस - येणे जाणे साठी सोडलेला रस्ता, याचे पाणी व वागणूक उत्तर बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमा पुर्वक प्लॉट आतील सर्व तदंगभूत वस्तू हक्कासह

सदरचा प्लॉट हा सुलभा संजय तुपे व योगेश प्रल्हाद भोसले यांचे सामाईक मालकी व कब्जेवहीवाटीचा आहे. त्याप्रमाणे त्यांची वर नमूद मिळकतीचे हक्कपत्रकी नाव नोंद असून सदरची मिळकत त्यांचे मालकी व कब्जेवहिवाटीस आहे.

सदरची मिळकत ही सुलभा संजय तुपे व योगेश प्रल्हाद भोसले यांचे मालकी हक्काची व नांवे असलेली समाईक कब्जेवहिवाटीची मिळकत असून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करुन त्यांनी आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे व तसा इसारपावतीचा दस्त दि. ०६/०१/२०२६ रोजी लिहून दिलेला आहे. त्यावेळी त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निजोखमीची असलेची खात्री व विश्वास आमचे अशिलास दिलेली आहे.

याउपरही वरिल मिळकती संदर्भाने कोणाची काही हरकत, हक्क संबंध, गहाण, साठेखत, दानपत्र, भाडेकरार, मृत्युपत्र, बक्षिसपत्र, चोळी बांगडी, कोर्ट आदेश, लिज, लिन, वारसा हक्क वा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क संबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०७ (सात) दिवसांत खालील पत्त्यावर समक्ष भेट घेवुन योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आमचे अशिलाची खात्री करुन द्यावी. त्यानंतर आमचे अशिल आपसात ठरलेप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता. २७/०१/२०२६.

**सही/-**
**मुस्तफा जहाँगीर पठाण**

**सही/-**
**ॲड. आर. ए. शेख**
जिल्हा व सत्र न्यायालय आवार, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९०२८५६६८४४
अशिलातर्फे ॲडव्होकेट



## हरवले आहे

प्रथमेश बसण्णा गायकवाड, रा. १९/ब, आदित्य नगर, विजापूर रोड सोलापूर या नावे असलेली विभागीय जात पडताळणी कार्यालयाकडून मिळालेली दि. २४/०१/२०१९ रोजी जात पडताळणी प्रमाणपत्र क्र. ५४५०८ लॉट क्र. १३१२ दि. २९/१२/२०२५ रोजी आदित्य नगर, विजापूर रोड दरम्यान माझ्या नजरचुकीने हरविले आहे. सदर जात पडताळणी पत्र कोणाला मिळाल्यास संपर्क साधावा.

**- मनोहर गायकवाड**
**(मो. ८२३७१४२३५५)**



## मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**विद्युत कामे**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) खालील कामांसाठी प्रतिष्ठित आणि अनुभवी विद्युत कंत्राटदारांकडून रॅलवेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. दोन पॅकेट सिस्टम; निविदा क्रमांक: SUR/TD/T/2025/33S; कामाचे नाव: सोलापूर विभागातील 02 वर्षांसाठी ढळऊ डेपोच्या व्यवस्थापनाचे आउटसोर्सिंग. अंदाजे खर्च: रु. 51,78,946.80. बोली सुरक्षा: रु. 1,03,600/- पूर्ण कालावधी: 24 महिने ऑफरची वैधता: 90 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 20.02.2026 दुपारी 15:00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), सोलापूर**

**असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करणे दंडनीय अपराधी आहे.**



## जामश्री रिअलटी लिमिटेड

सीआयएन: L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालयः फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र – ४१३ ००१
इमेल आयडीः jammill1907@gmail com

### सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी ६०१–बी, ६वा मजला, मोतीमहल, १९५ जे. टी. रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२० येथे संध्याकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) इतर गोष्टीसह ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिसऱ्या तिमाही आणि नऊ महिन्यांसाठीच्या कालावधी करीताचा कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष ग्राह्य धरण्यासाठी आणि संमत करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

**जामश्री रिअलटी लिमिटेड करिता**
**सही/-**
तारीख : २७.०१.२०२६ **राजेश दमाणी**
ठिकाण : सोलापूर **संयुक्त व्यवस्थापकीय संचालक**



## उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर, सोलापूर यांचे कार्यालय
**सोलापूर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था. नि. सोलापूर - ४१३००३**
दूरध्वनी क्र. : ईमेल :

### जाहीर प्रकटन

क वर्गातील खालील सहकारी संस्थांचा संचालक मंडळ निवडणूक सन २०२५-२६ ते २०३०-३१ साठीचा निवडणूक कार्यक्रम संबंधित संस्थेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सविस्तर पणे संस्थेच्या नोटीस बोर्डावर व या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेला आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी |
|---|---|---|
| १ | श्रो, स्वामी समर्थ शासकीय व जिल्हा परिषद शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर | कु. एस.एस. मलवे, सहकारी अधिकारी श्रेणी-२ |
| २ | श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय कर्मचारी सहकारी पतपेढी नि.. सोलापूर | श्री.आर.एन.ढोणे, सहकारी अधिकारी श्रेणी-२ |
| ३ | यशोधन नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर | श्री. एस.डी. वटटे, सहाय्यक सहकारी अधिकारी |

**सदर निवडणूकीसाठीचे महत्वाचे टप्पे खालीलप्रमाणे आहेत.**

| नामनिर्देशन पत्र विक्री व स्विकृती दिनांक व वेळ | नामनिर्देशनपत्र छाननी | उमेदवारी मागे घेणे दिनांक व वेळ | मतदान घ्यावयाचा दिनांक वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|
| दि. २९.०१.२०२६ ते ०४.०२.२०२६ वेळ स. ११.०० ते दु. ३.०० वा. पर्यत | दि. ०५.०२.२०२६ वेळ स. ११.०० ते दु. २.०० पर्यत | दि. ०६.०२.२०२६ ते दि. २०.०२.२०२६ वेळ स. ११.०० ते दु. ३.०० वा. पर्यंत | दि. २८.०२.२०२६ वेळ स. ८.०० ते ४.०० वाजेपर्यंत ठिकाणी नंतर प्रसिध्द करण्यात येईल |

**स्थळ:- सोलापूर**
**दिनांक :- २७.०१.२०२६**

**सही/-**
**(डॉ. प्र. बागल )**
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर



## अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

फोन नं. ०२१८१-२२०२५३/२२०२४३ फॅक्स नं. ०२१८१-२२०२५३
टोल फ्री क्र. १८०० २३३२ २३० ई-मेल: comcakkalkot123gmail.com

**जा.क्र.२०२५/अ.न.प./आरोग्य१०/संकलन-१/कावि/ १३२६ आरआर दिनांक- २७/०१/२०२६**

### शुद्धीपत्रक

अक्कलकोट शहरामधील विविध स्वच्छता व घनकचरा विषयक कामे करणे काम अक्कलकोट नगरपरिषदेने जा.क्र. २०२५/न.प.अ. कोट/आरोग्य१०/ संकलन-१/कावि-१३१८ आरआर दि. २३/०१/२०२६ अन्वये दैनिक लोकसत्ता व दैनिक सोलापूर तरुण भारत मध्ये जाहीर प्रसिद्धीकरण देण्यात आलेले होते. सदर कामाचे ई निविदा क्र. 2026_DM_1271354_1 तांत्रिक कारणास्तव सदरचे निविदा रद्द करण्यात येत आहेत.

**सही/-**
**रमाकांत डाके**
मुख्याधिकारी
नगरपरिषद अक्कलकोट



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे बोरामणी, ता. दक्षिण सोलापुर येथील लोकांस कळविणेत येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि, व सब डि. सोलापुर, पैकी तालुका दक्षिण सोलापुर पैकी मौजे बोरामणी येथील ग्रामपंचायत हद्दीतील गट क्र. ४१७ यांसी एकूण क्षेत्र ०२ हे. १३ आर यांसी आकार र. रु. ०१.४५ पैसे अशी संपूर्ण शेत जमीन मिळकत असून यापैकी ०१ हे. ३२ आर यांसी आकार र. रु. ००.८९ पैसे इतकी शेतजमीन यांसी चतुःसिमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस : गट नं. ४१७ पैकी उर्वरित शेतजमीन, दक्षिणेस : गट नं. ४१५. पश्चिमेस : गट नं. ४१६, उत्तरेस : चिचोळी यांची शेतजमीन ही मिळकत स्नेहल अनील गायकवाड व सुरजकुमार सिद्राम जाधव यांच्या मालकी व कब्जेहक्काची असल्याची व ती पूर्णतः निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याची त्यांनी आमचे अशिलांस विश्वास व भरोसा देवून ती आमचे अशिलांस विक्री करण्याच्या हेतूने व्यवहार निश्चित करुन इसारापोटी रक्कम आमच्या अशिलाकडून घेतलेली आहे व लवकरात लवकर खरेदीखत आमचे अशिलाच्या हक्कात करुन देणार आहेत.

तथापि सदर मिळकतीशी अन्य कोणाचे कसल्याही प्रकारचे हक्क हितसंबंध निर्माण होवून ते चालू राहिले असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ (आठ) दिवसाचे आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह येवून तशी खात्री पटवून द्यावी. सदरप्रमाणे मुदतीत कोणी न केल्यास आमचे अशिल हे सदर मिळकतीचे खरेदीखत त्यांचे मालकी व कब्जेहक्कात करुन घेतील, मग सदर प्रसंगांती त्यासंबंधी कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर सबब मुळीच कायद्यानुसार विचारात घेतली जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

ही जाहीर नोटीस दिली ता. २७/०१/२०२६.

**सही/-**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**संदीप कं. सातलगांव**
चेंबर नं. २८, जिल्हा न्यायालय आवार, सोलापुर. मो. नं.९६६५४९०१४३



## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public in large that, The property mentioned in schedule hereunder is purchased by Afsarali Husen Shiakh by registered sale deed.

That, prior sale deed bearing R.E. No. 4259/2019 dated 17-09-2019. That, the said sale deeds have been lost by Afsarali Husen Shaikh. Now the original sale deeds are no available with him and accordingly he has filed missing complaint at Jailroad Police Station, Solapur City bearing its Missing Online Registered on dated 24-01-2026.

Our Client is going to take a loan from AU SMALL FINANCE BANK, Br. Solapur by securing the mortgage. All persons or institutions having any claim or right in respect of the said property or any part thereof by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, exchange, trust, possession or encumbrance or otherwise howsoever are hereby required to inform the same in writing supported with the original documents to the undersigned at the address given below mentioned, within 3 days from the date of publication of this notice, failing which, the claim or claims, if any of such person, persons or institution/s shall be considered to have been waived and /or abandoned. Further, it is also hereby informed through this public notice that no one should deal with the said properties on the basis of the said properties on the basis of the said documents.

**THE SCHEDULE OF THE PROPERTY**

District and sub District Solapur, Taluka North Solapur, within limits of Solapur Municipal Coropoartaion Boundry at Majrewadi property bearing Old S. No. 271, New S. No. 53 Known as Siddheshwar Nagar Part-5A out of Plot No. 32 admeasuring area 81.31 Sq.mtr. & it is bounded and surrounded by East Road, West-Plot No. 29, South: Plot No. 33, North:- Road.

This Notice is issued on 26-01-2026.

**Note- Please Take Advocate's Name in Bold.**

**सही/-**
**अशिल**

**सही/-**
**ॲड. सलाम मोहम्मदसाब बगलुर**
**ॲडव्होकेट**
B.A.,LL.B.,M.S.W.D.M.C.J
ऑफिस पत्ता : गाळा नं. १० पहिला मजला, दारुस्सलाम अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, सोलापूर



## मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर सोलापुर, सोलापूर यांचे समोर

सोलापुर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित सोलापुर
सिटी सर्व्हे नं. ८४१३. कुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आधार, सोलापुर ४१३००३

जा क/उप/ /२०२६ दि. .०१.२०२६

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापुर अर्जदार**

विरूध्द

**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) जाब देणार**

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ३३९३/२०२५ | १,४५,८९०/- | २<br>३<br>४ | २. सौ. कोरे गौराबाई नागनाथ<br>रा. नव समता सोसायटी शेळगी ता.उ. सोलापूर जि. सोलापूर<br>३. श्री. रामजगले नितिन हनुमंत<br>रा. ब्लॉक नं बी रूम नं २०२ परीहार अपार्टमेन्ट विजापूर रोड रामलिंग सोसायटी जवळ सोलापूर जि. सोलापूर<br>४. श्री. पोरे आनंत चंदुलाल<br>रा. दमाणी हायस्कूल समोर १०१३ निला नगर बुधवार पेठ सोलापूर जि. सोलापूर |
| २ | ३३१७/२०२५ | १,९१,१५०/- | १ | १. श्री. कामेगांवकर विजय सुनिल<br>रा. ८४९ उ. कसबा सोलापूर ४१३००२ |
| ३ | ३३०२/२०२५ | २,१७,९०९/- | २<br>३ | २. श्री. सुळ शिवाजी विठोबा<br>रा. मु. पो. मोरोची घर नं. ३५७ नवीन विठ्ठल मंदिर ता. माळशिरस जि. सोलापूर<br>३. श्री. वाटघर सिराज अब्दुल गफुर<br>रा. ११४० जी एच नं. २ विजापूर नाका सोलापूर व्ही टी सी इंद्रानगर सोलापूर, |
| ४ | ३३०१/२०२५ | ५,९३,२३७/- | १<br>३ | १. श्री. पाटील कृष्णा भगवान<br>रा. पिरटाकळी ता. मोहोळ जि. सोलापूर<br>३. श्री. निंबाळकर भागवत नकुल<br>रा. पिरटाकळी ता. मोहोळ जि. सोलापूर |
| ५ | ३३०९/२०२५ | १,९७,२४६/- | १<br>२ | १. सौ. रुकसाना समिर खान<br>रा. १२०८ उत्तर कसबा टिळक चौक टिळक गणपती मंदिर जि. सोलापूर<br>२. श्री. समिर यासीन खान<br>रा. १२०८ उत्तर कसबा टिळक चौक टिळक गणपती मंदिर जि. सोलापूर |
| ६ | ३२९९/२०२५ | १,१९,६०९/- | १ | १. श्री. सातपुते संभाजी पांडूरंग<br>रा. २७५ निराळे वस्ती मुरारजी पेठ सोलापूर |
| ७ | ३३०६/२०२५ | १,१७,३७१/- | ३ | ३. श्री. शेख शकील अब्दुल<br>रा. १८९ बुधवार पेठ, जय मल्हार चौक, सोलापूर |
| ८ | ३२८८/२०२५ | १,११,१०१/- | २<br>३ | २. श्री. बाबुळगांवकर सुदेश शरणप्पा<br>रा. देव दत्त आपार्टमेंट पश्चिम मंगळवार पेठ सोलापूर<br>३. श्री. हंचनाळे सोमलिंग शरणप्पा<br>रा. ७७५, शुकवार पेठ सोलापूर |
| ९ | ३३२७/२०२५ | १,५३,४६६/- | १<br>२<br>३ | १. श्री. काझी मुझाहिद अ जब्बार<br>रा. १३९ गरीब हटावो झोपडपटटी नं. २ चाँदतारा मस्जिद जवळ सोलापूर<br>२. श्री. शेख इकबाल मौला<br>रा. हाजी मंगल किराणा दुकान जवळ ४६७ गरीब हटावो झोपडपटटी नं.१ . वि. रोड सोलापूर ४१३००५<br>३. श्री. चव्हाण अजय काशिनाथ<br>रा. चैतन्य नगर जवळ ३५ नेताजी सुभाष सोसायटी वि. रोड सोलापूर |
| १० | ३२८६/२०२५ | १,८४,७१८/- | १<br>२<br>३ | १. श्री. मनोहर मल्लेशाम दोंतुल<br>रा. ७० श्रमजीवी नगर भाग ३.४ एम आय डी सी सोलापूर<br>२. श्री. किरण श्रीनिवास वग्गु<br>रा. १३८ आकाशवाणी रोड हनुमान सोलापूर<br>३. श्री. उपेंद्र श्रीनिवास मेरगु<br>रा. ६१० थोबडे नगर शरण चौक सोलापूर |
| ११ | ३३२४/२०२५ | ३,०८,०२९/- | ३ | ३. श्री. पोगुल राजेश रमेश<br>रा. वालचंद गुलांची वस्तीग्रह जवळ ३४३ जी ८ प्रणिती कॉम्प्लेक्स सोलापूर |
| १२ | ३३१६/२०२५ | १,८७,५६१/- | २ | २. सौ. शेख निलोफर जाफर सादिक<br>रा. ४३४ साऊद सदर बझार लष्कर सोलापूर |
| १३ | ३३०५/२०२५ | २,८९,७८३/- | २ | २. श्री. जाधव विनायक श्रीकांत<br>रा. २ साक्षी रेसीडन्सी अक्कलकोट रोड वेंदात नगर शेजारी सोलापूर |
| १४ | ३२९३/२०२५ | २,०५,८७९/- | ३ | ३. श्री. कोठमळे पाडुरंग उदाजी<br>रा.मु.पो. चुंगी जि. धाराशिव |
| १५ | ३३१३/२०२५ | ३,८९,७८३/- | ३ | ३. श्री. शिंदे हिराकांत दत्तु<br>रा. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोंढार चिंचोली ता. करमाळा जि. सोलापुर |
| १६ | ३३२१/२०२५ | १,६९,६०७/- | १<br>३ | १. सौ. शेख शमशाद निजाम<br>रा. ११०, गरीब हटाव नं. २ विजापूर रोड सोलापूर<br>३. श्री. पगडीवाले अहमदअली म. शफी<br>रा.३००, गरीब हटाव झोपटपटटी नं. २ विजापूर रोड सोलापूर |
| १७ | ३३०७/२०२५ | १,१२,७०९/- | १<br>२ | १. श्री. शेख समीर रफीक<br>रा. गरीबी हटाव झोपडपटटी नं. २ हनुमान मंदिराजवळ सोलापूर<br>२. सौ. शेख फिरदोस मोहिउददीन<br>रा. नुराणी मस्जिद जवळ प्लॉट नं. २२७ गरीबी हटाव झोपडपटटी नं. १ वि. रोड सोलापूर |
| १८ | ३२९७/२०२५ | १,३६,२६०/- | ३ | ३. श्री. शेख शमशाद निजाम<br>रा.११० गरीब हटाव झोपडपटटी नं. २ विजापूर रोड सोलापुर |
| १९ | ३३१८/२०२५ | १,३१,५२४/- | २<br>३ | २. श्री. गोरे धर्मण्णा धुळप्पा<br>रा. माळी गल्ली लक्ष्मी मार्केट ५५२ शुक्रवार पेठ सोलापुर<br>३. श्री. पवार सागर अनंत<br>रा. ५०९ उत्तर कसबा नार्थ सोलापुर |
| २० | ३२८९/२०२५ | १,१८,३०९/- | १<br>२ | १. श्री. शेख हकीम अलीसाब<br>रा. २२३ उत्तर सदर बझार सोलापुर<br>२. श्री. इनामदार जमीर नबीलाल<br>रा. गरीब हटाव झापेडपटटी नं. २ विजापूर नाका सोलापुर |
| २१ | ३३१९/२०२५ | १,३४,५५२/- | १<br>२<br>३ | १. श्री. शेख अकबर अ सुकुर<br>रा. घर नं. २१७ गरीब हटाव झापेडपटटी नं. २ चांदतारा मस्जिद विजापूर नाका सोलापुर<br>२. सौ. जतकर शबाना इम्रान<br>रा. ७५ गरीब हटाव झापेडपटटी सोनिया नगर आम्रपाली चौक विजापूर नाका सोलापुर<br>३. श्री. शेख रसुल गहम्मदसाव<br>रा. १४८२ गरीब हटाव झापेडपटटी नं. २ विजापूर नाका सोलापुर |
| २२ | ३२९४/२०२५ | १,०५,२२७/- | ३ | ३. श्री. जमादार मोहसीन ईलाही<br>रा. स्वागत नगर कुमठा नाका सोलापुर |
| २३ | ३२९६/२०२५ | १,१७,११७/- | १<br>३ | १. श्री सुर्यान सुमितकुमार शशिकांत<br>रा. प्लॉट नं. ७९ रविंद नगर सोलापुर<br>३. श्री. शफीक शरीफ मुलाणी<br>रा. ६० गदर इंडिया झोपडपटटी कुमठा नाका सत्तर फुट रोड गोलापूर |
| २४ | ३३०८/२०२५ | १,०३,६०७/- | २ | २. श्री. रामजगले नितिन हणमंतु<br>रा. घर नं. १०७ जाई जुई नगर विजापूर रोड सोलापुर |
| २५ | ३२९१/२०२५ | १,८८,९७५/- | २ | २. श्री. मेडेगार शिवलिंगप्या रेवण्या<br>रा. २१७ कित्तुर चंन्रम्गा नगर सैफुल विजापूर रोड सोलापूर |
| २६ | ३३२५/२०२५ | ९६,१६८/- | १<br>२ | १. श्री. जाधव संतोष सुभाष<br>रा.मु. हनुमान मंदिर जवळ प्रताप नगर पो सोरेगांव ता.उ. सोलापूर<br>२. सी. चव्हाण ज्योती मिथुन<br>रा. प्लॉट नं. ६८ पी माशाळ वस्ती विजापूर रोड इंदिरानगर सोलापूर |
| २७ | ३३२६/२०२५ | ९२,१०३/- | १<br>२<br>३ | १. श्री. निलकंट विजयकुमार उदयकुमार<br>रा.१९५ कित्तुर चंन्रम्मा नगर रीफुल विजापूर रोड सोलापूर<br>२. श्री भिसे बिरू दशरथ<br>रा. १०६ गरीब हटाव झोपडपटटी नं. २ विजापूर रोड सोलापूर<br>३. श्री. रणखंबे शिवदास भिमशा<br>रा.०६ सिध्देश्वर नगर विजापूर रोड सोलापूर |
| २८ | ३३०३/२०२५ | १,९४,८९३/- | १<br>२ | १. श्री. माने सुनिल यशवंत<br>रा. ६८ टिळक नगर मजरेवाडी सोलापूर<br>२. श्री. पुकाळे जयेश शाग<br>रा. प्लॉट नं. २२६ विजय नगर निलम नगर सोलापूर |
| २९ | ३२८७/२०२५ | १,९४,८९३/- | ३ | ३. श्री. इराबत्ती मोतीलाल सिद्राम<br>रा. १११ तेलंगी पाच्छा पेठ दाजी पेठ सोलापूर |
| ३० | ३३९९/२०२५ | १,६०,९४८/- | १<br>२<br>३ | १. श्री. शेख रेश्मा कादार<br>रा.२०८ गोदुताई विडी घरकुल सोलापूर<br>२. श्री. व्हरडे विजयकुमार अर्जन<br>रा. १८ हासिंग सोसायटी कुमठे सोलापूर<br>३. श्री. पाटील रविंद्र अप्पाराव<br>**रा. ३१७ स्वामी विवेकानंद नगर हत्तरे वस्ती सोलापूर** |
| ३१ | ३२२८/२०२५ | १,६४,९६५/- | १ | १. श्री. नल्ला मोहन श्रीनिवास<br>रा.६७/२ आकाशवाणी केंद्र मुकबधिर शाळे शेजारी निलग नगर सोलापूर |
| ३२ | ३३१४/२०२५ | १,८९,१९६/- | १<br>२ | १. श्री. सुर्यवंशीपाटील प्रशांत युवराज<br>रा. महिला मेडिकल कॉलेज ३१ ओकांर सोसायटी मजरेवाडी सोलापूर<br>२. सौ. पवार सुरेखा संतोष<br>रा.१५८ संगमेश्वर नगर कुमठे सोलापूर |
| ३३ | ३३११/२०२५ | १,३६,७८६/- | १<br>२ | १. श्री. हुलसरे विठ्ठल शेखर<br>रा.३४ डोर गल्ली भवानी पेठ सोलापुर<br>२. श्री. गायकवाड राहुल अनिल<br>**रा. ३०३ वी तुळजापूर वेस ढोर गल्ली भवानी पेठ सोलापुर** |
| ३४ | ३२९२/२०२५ | १,४५,८५०/- | १<br>२ | १. श्री. हडलगी दाऊद इस्माइल<br>रा. ९७ विजयलक्ष्मी नगर स्वामी समर्थ नगर मजरेवाडी सोलापुर<br>२. श्री. तांबोळी सिकंदर अब्दुल गणी<br>स. शिवशाई कारखाना रेवणसिध्देश्वर नगर कुमठा नाका होटगी रोड सोलापुर |
| ३५ | ३२८५/२०२५ | ७२,७५५/- | १ | १. सौ. शहा रेश्मा सागर<br>रा. ५९५ पश्चिम मंगळवार पेठ गितांजली लॉज शेजारी सोलापूर |
| ३६ | ३२९०/२०२५ | २,४३,२२३/- | २ | २. श्री. म्हेत्रे सिद्राम चनप्पा<br>रा. १०२५ उत्तर सदर बाजार लष्कार सोलापूर ४१३००३ |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळुन येत नसल्याने /अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वताः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक :-१०/०२/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. २७/०१/२०२६ रोजी माझी ही कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**स्थळ - सोलापूर**
**दि - २७/०१/२०२६**

शिक्का


**सही/-**
**(डॉ. प्र. अ. बागल)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापुर शहर सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



महत्त्वाचे

### अतिका पात्रता फेरीत दुसरे स्थान मिळवणारी पहिली भारतीय



**ला कोंका (इटली)** : भारताची ११ वर्षीय रेसिंग सेन्सेशन, अतिका मीरने डब्ल्यूएसके सुपर मास्टर कार्टिंग सीरिजमध्ये शानदार पदार्पण केले. ३७ ड्रायव्हर्सच्या पात्रता फेरीत दुसऱ्या क्रमांकाची सर्वात वेगवान वेळ नोंदवणारी ती पहिली भारतीय ठरली.२०२६ मध्ये मिनी (८ ते ११ वर्षे) वरून ज्युनियर (१२ ते १४ वर्षे) श्रेणीत गेल्यानंतर पहिल्यांदाच ओकेएनजे श्रेणीत गाडी चालवणाऱ्या अतिकाने उल्लेखनीय कामगिरी केली. ग्रिडवरील सर्वांत तरुण ड्रायव्हर्सपैकी एक आणि फॉर्म्युला वन अकादमीच्या पाठिंब्याने, तरुण रेसरने पात्रता फेरीत दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत वेगवान वेळ नोंदवण्यासाठी सर्व अडचणींना तोंड दिले, पोल पोझिशनमध्ये फक्त एक सेकंदाच्या दहाव्या भागाने हुकली. अतिकाने ४९.७६ सेकंद वेळ नोंदवली. ती पोल पोझिशनसाठी एका टप्प्यावर होती, परंतु शेवटच्या क्षणी फिनलॅण्डच्या लिओ लाइटिनेनने तिला मागे टाकले. यापूर्वी, अतिकाने शुक्रवार आणि शनिवारी झालेल्या तीन हीट रेसमध्ये अनुक्रमे चौथे, सहावे आणि सातवे स्थान पटकावले होते. तिने पहिल्या हीटमध्ये सर्वांत जलद लॅपचा विक्रमही केला.

### अभिषेक आणि सूर्यकुमारचा सामना करणे कठीण

**विशाखापट्टणम** : अभिषेक शर्मा, इशान किशन आणि सूर्यकुमार यादव यांच्या सातत्याने आक्रमक फलंदाजीमुळे सध्या सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत न्यूझीलंडच्या गोलंदाजांना संयम राखणे कठीण झाले आहे, परंतु गोलंदाजी प्रशिक्षक जेकब ओरम यांनी खेळाडूंना आव्हान स्वीकारण्याचा आणि ते हाताळण्याचे मार्ग शोधण्याचा सल्ला दिला. या तीन भारतीय टॉप-ऑर्डर फलंदाजांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजी आक्रमणाला कठीण परीक्षेत टाकले आहे, गेल्या तीन टी-२० सामन्यांमध्ये सुमारे २५० च्या स्ट्राईक रेटने सातत्याने धावा केल्या आहेत. ओरम यांनी सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदेत सांगितले की, मैदानावर थोडा गोंधळ उडाला आहे. चेंडू नेहमीच सीमारेषेबाहेर जात आहे. अशा परिस्थितीत, संयम आणि नियंत्रण राखणे आणि आपल्या योजना अंमलात आणणे महत्त्वाचे आहे. पण मी पुन्हा सांगेन, हा शिकण्याच्या प्रक्रियेचा एक भाग आहे. भारतीय फलंदाज ज्या सहजतेने मोठे फटके मारत आहेत त्यामुळे ओरमला श्रीलंकेचा महान फलंदाज सनथ जयसूर्याची आठवण झाली.

### टी-२० विश्वचषकात वरुण चक्रवर्तीला फायदा : कुंबळे

**नवी दिल्ली** : दिग्गज क्रिकेटपटू अनिल कुंबळे यांनी पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषकादरम्यान लेग-स्पिनर वरुण चक्रवर्तीला भारताच्या फिरकीचे नेतृत्व करण्यासाठी पाठिंबा दिला आहे. टी-२० विश्वचषक ७ फेब्रुवारी ते ८ मार्च दरम्यान भारत आणि श्रीलंकेत खेळला जाईल. कुंबळे यांनी एका कार्यक्रमात सांगितले की स्पर्धेत दव नक्कीच भूमिका बजावेल. विशेषतः फेब्रुवारी आणि मार्चमध्ये होणाऱ्या विश्वचषकादरम्यान, जेव्हा सामने संध्याकाळी उशिरा खेळले जातील तेव्हा सोपे होणार नाही. कुंबळे म्हणाले, भारताला निश्चितच एका गोष्टीचा दिलासा मिळू शकतो की मला वाटत नाही की दव पडणे वरुण चक्रवर्तीसारख्या खेळाडूवर परिणाम करेल. तो ज्या पद्धतीने चेंडू पकडतो आणि ज्या वेगाने तो गोलंदाजी करतो त्याचा त्याच्यावर परिणाम होणार नाही. भारताचे फिरकीपटू वरुण, कुलदीप यादव आणि अक्षर पटेल हे गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने चांगली कामगिरी करत आहेत, परंतु कुंबळेने तामिळनाडूच्या या खेळाडूला फिरकीपटूंमध्ये सर्वांत मोठा प्लस पॉईंट म्हणून वर्णन केले.

# भारताला फिरकीकडून अपेक्षा

## न्यूझीलंडविरुद्ध आज चौथा टी-२० सामना

**विशाखापट्टणम, २७ जानेवारी**


आतापर्यंत खेळाच्या प्रत्येक पैलूवर वर्चस्व गाजवणाऱ्या भारतीय संघाला बुधवारी येथे न्यूझीलंडविरुद्धच्या चौथ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात फिरकी गोलंदाजांकडून दमदार कामगिरीची अपेक्षा करेल.

अभिषेक शर्मा, सूर्यकुमार यादव आणि ईशान किशन यांच्या शानदार कामगिरीमुळे भारताने पहिले तीन सामने जिंकून मालिकेवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. तथापि, भारतीय संघाचे दोन प्रमुख फिरकी गोलंदाज, कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती अपेक्षेनुसार कामगिरी करू शकले नाहीत.

कुलदीपने दोन सामन्यांमध्ये फक्त दोन बळी घेतले आहेत. त्याने प्रति षटक ९.५ धावा दिल्या आहेत. मागील सामन्यात त्याने तीन महागडी षटके टाकली. ज्यात त्याने ३२ धावा दिल्या. जसप्रीत बुमराह, रवी बिश्नोई आणि हार्दिक पंड्या यांच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे भारताने किवी संघाला नऊ बाद १५३ धावांवर रोखले. मागील एकदिवसीय मालिकेतही कुलदीपने चांगली कामगिरी केली नाही. तीन सामन्यांत तीन बळी घेतले आणि प्रति षटक ७.२८ धावा दिल्या.



सूर्यकुमार यादव



मिचेल सँटनर

गेल्या सामन्यात चक्रवर्तीला विश्रांती देण्यात आली होती. परंतु पहिल्या दोन सामन्यांमध्ये त्याच्या गोलंदाजीत तो ज्या धारदारपणासाठी ओळखला जातो त्याचा अभाव होता. या संदर्भात, भारत चौथ्या सामन्यात बिश्नोई (गुवाहाटीमध्ये १८ धावांत दोन बळी) ला कायम ठेवायचे की नाही आणि कुलदीपच्या जागी चक्रवर्तीला परत आणून त्याला विश्रांती द्यायची की नाही याचा विचार करेल.

भारताचे अष्टपैलू अक्षर पटेलच्या तंदुरुस्तीवरही बारकाईने लक्ष आहे. कारण तो बोटाच्या दुखापतीमुळे नागपूरमधील पहिल्या सामन्यात खेळला नाही. भारत या मालिकेत विश्वचषकापूर्वी गोलंदाजी विभागात शिखर गाठण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु सध्या त्याची फलंदाजी अतुलनीय आहे.

या मालिकेत भारतीय फलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तिसऱ्या सामन्यात भारताने फक्त १० षटकांत विजय मिळवला. अभिषेकने ३०० पेक्षा जास्त स्ट्राईक रेटने धावा केल्या आहेत, तर सूर्यकुमार आणि किशनने सुमारे २३० चा स्ट्राईक रेट राखला आहे. गेल्या दोन सामन्यांतून भारताची फलंदाजीची आक्रमकता दिसून येते. दुसऱ्या आणि तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारताने अनुक्रमे २०९ आणि १५४ धावांचा (एकूण ३६३ धावा) पाठलाग करताना फक्त २५.२ षटकांत फलंदाजी केली.

या मालिकेत भारतासाठी एकमेव चिंतेचा विषय संजू सॅमसनचा खराब फॉर्म आहे. त्याने तीन सामन्यांमध्ये ५.३३ च्या सरासरीने फक्त १६ धावा केल्या आहेत. तथापि, तिलक वर्मा दुखापतीमुळे बाहेर असल्याने, संघ व्यवस्थापन संजूला स्वतःला सिद्ध करण्याची आणखी एक संधी देऊ शकते. एकदिवसीय मालिकेत शानदार कामगिरी करणाऱ्या न्यूझीलंडला आतापर्यंत टी-२० मालिकेत चांगली सुरुवात करता आलेली नाही. त्यांच्या फलंदाजांनी कधी कधी चांगली कामगिरी केली आहे, परंतु त्यांच्या गोलंदाजांना भारतीय फलंदाजांच्या आक्रमक दृष्टिकोनाचा सामना करण्यात अपयश आले आहे.

**भारत-न्यूझीलंड चौथा टी-२० सामना**
**स्थळ** : एसीए-व्हीसीडीए क्रिकेट स्टेडियम, विशाखापट्टणम
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्‌वर

जेकब डफी हा त्यांचा सर्वांत किफायतशीर गोलंदाज आहे, ज्याचा इकॉनॉमी रेट १०.३० आहे. इतर गोलंदाज, मॅट हेन्री (१३.८०), काइल जेमिसन (१४.२०), मिचेल सँटनर (१३.१४) आणि ईश सोधी (१२.५०) हे भारतीय फलंदाजांना त्रास देण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहेत.

न्यूझीलंड या सामन्यात फॉर्मात असलेल्या डॅरिल मिशेलला फलंदाजीच्या क्रमात वरच्या स्थानावर नेऊ शकते. मिशेलने एकदिवसीय मालिकेत त्याच्या प्रभावी कामगिरीने त्याच्या संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती, परंतु टी-२० मालिकेत त्याच्या खालच्या मधल्या फळीत स्थानामुळे प्रश्न उपस्थित झाले आहेत. (वृत्तसंस्था)

# भारताची झिम्बाब्वेवर २०४ धावांनी मात

## कर्णधार आयुष म्हात्रे, उद्धव मोहन चमकले

**बुलवायो, २७ जानेवारी -**

उद्धव मोहन आणि कर्णधार आयुष म्हात्रे यांच्या नेतृत्वाखालील भारतीय १९ वर्षांखालील संघाने सुपर सिक्स स्टेज सामन्यात झिम्बाब्वेचा २०४ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. विहान मल्होत्राच्या नाबाद शतकाच्या मदतीने भारताने ५० षटकांत ८ बाद ३५२ धावा केल्या. प्रत्युत्तरात झिम्बाब्वेचा संघ ३७.४ षटकांत १४८ धावांपर्यंत मजल मारू शकला.

झिम्बाब्वेकडून लेरॉय चिवालाने ७७ चेंडूत ६२ धावा केल्या, यात सात चौकार आणि एक षटकार होता. तथापि, ही खेळी देखील संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही. लक्ष्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात खराब झाली. त्यांनी केवळ २४ धावांत तीन गडी गमावले. तथापि, त्यानंतर लेरॉयने कियानसोबत भागीदारी केली. कियान बाद झाल्यानंतरही लेरॉयने आपला डाव सुरू ठेवला आणि अर्धशतक झळकावले. तथापि, लेरॉय बाद झाल्यानंतर झिम्बाब्वेचा डाव कोसळण्यास जास्त वेळ लागला नाही. भारताकडून उद्धव मोहन आणि आयुष म्हात्रे यांनी प्रत्येकी तीन, तर आरएस अम्ब्रीशने दोन गडी बाद केले. हेनिल पटेल आणि खिलन पटेल यांनी प्रत्येकी एक गडी टिपला आणि भारताच्या विजयात मोलाची साथ दिली. नाणेफेक जिंकल्यानंतर झिम्बाब्वेने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पण हा निर्णय त्यांना चांगलाच महागात पडला.

भारताचे सलामीचे फलंदाज ऐरन जॉर्ज आणि वैभव सूर्यवंशी यांनी तडाखेबंद फलंदाजी केली आणि ४४ धावांची भागीदारी केली. ४४ धावा असताना ऐरन जॉर्ज २३ धावा काढून बाद झाला. त्यानंतर कर्णधार आयुष म्हात्रे आणि वैभवने डाव सावरला आणि भारताला १०० धावांपर्यंत नेऊन ठेवले. त्यावेळी आयुष म्हात्रे २१ धावांवर बाद झाला. त्यानंतर लगेच वैभव सूर्यवंशी बाद झाला. त्याने ५२ धावा काढल्या. त्यात ४ चौकार आणि ४ षटकार मारले. त्यानंतर वेदांत त्रिवेदी आणि विहान मल्होत्रा यांनी चांगली फलंदाजी केली. पण १३० धावा असताना वेदांत त्रिवेदी बाद झाला. अभिज्ञान कुंडू आणि विहान यांनी मोठी भागीदारी करीत भारताला दोनशे धावा पूर्ण करून दिल्या. २४३ धावसंख्येवर अभिज्ञान बाद झाला. त्याने ६१ धावा केल्या. त्यानंतर कनिष्क चौहान आणि विहान यांनी धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला.

पण कनिष्कही लवकर बाद झाला. अम्ब्रीश (२१) आणि विहान (नाबाद १०९) यांनी चांगली फलंदाजी केली. खिलन पटेलनेही धावसंख्या वाढविण्यात महत्त्वाचे योगदान दिले. त्याने ३० धावा केल्या. भारताने ५० षटकांत ८ बाद ३५२ धावा केल्या. झिम्बाब्वेकडून तेतेंदा चिमुगोरोने ४९ धावांत ३ गडी बाद केले.

# सोलापूरची आरोही पाठमास अव्वल

## सांगोला मानगंगा मॅरेथॉन : पंढरपूरची सानिका ऐवळे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२७ जानेवारी -**

माणगंगा परिवार अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी यांच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या मानगंगा परिवार मॅरेथॉन मध्ये खुल्या गटात ५ किलीमीटरमध्ये सोलापूरची आरोही पाठमास तर १० किलोमीटरमध्ये पंढरपूरची सानिका ऐवळे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

विजेत्यांना ट्रॉफी, मेडल, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी माजी सहा.पो.आयुक्त भरत शेळके, मानगंगा परिवाराचे संस्थापक अध्यक्ष नितीन इंगोले, चेअरमन अर्चना इंगोले, व्हा.चेअरमन सुखदेव रंधवे, सचिन इंगोले, संचालक विवेक घाडगे, महादेव शिंदे, विजय वाघमोडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षय मुढे, आपुलकीचे अध्यक्ष राजेंद्र यादव, डॉ.शैलेश डोंबे, ॲड.गजानन भाकरे, डॉ.निरंजन केदार, पत्रकार अमेय मस्के, विज्ञान महाविद्यालयाचे क्रीडा संचालक विजय पवार, अविनाश इंगोले, कडलास मॅरेथॉनचे संयोजक टापरे, वेलनेस कोच खटकाळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेश कोळी व विवेक घाडगे यांनी केले.



**अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**शालेय गट (३ कि.मी.)**: मुली : सानिका महानवर, प्रगती सरक (जांभुळवाडी, जत), राजेश्वरी कीरगत (डोंगरगाव). मुले : साहिल वाघमोडे, शिवम शिवशरण (जत), सुरज खोत (कोगनोळी, कवठेमंकाळ)

**खुला गट (५ कि.मी.)** : महिला : आरोही पाठमास (सोलापूर), रिद्धी सप्रे (श्रीगोंदा, नगर), पूजा मासाळ (शिरभावी), पुरुष : साहिल गायकवाड (मार्डी, माण), अजित चौगुले (वाढेगाव), रविराज नरळे (बालाजी नगर). **खुला गट (१० कि.मी.)** : महिला : सानिका ऐवळे (पंढरपूर), सुरेखा मतने (श्रीगोंदा), अक्षरा पवार (बालाजी नगर), पुरुष : प्रवीण कांबळे (सांगली), सुशांत सरगर (कोळे) अक्षय खोत (कोगनोळी).

# आश्लेषा बागडे मंगळवेढा केसरीची मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२७ जानेवारी-**



मंगळवेढा येथे झालेल्या राज्य मंगळवेढा केसरी कुस्ती स्पर्धेत इंटरनॅशनल कुस्ती संकुल श्रीगोंदाची वाघीण इंटरनॅशनल कुस्तीपटू आश्लेषा कल्याण बागडे हिने दमदार कामगिरी करत २०२६ ची महिला मंगळवेढा केसरी होण्याचा मान पटकावला.

करमाळा तालुक्याची शान असलेल्या आश्लेषाने प्रथमच महिला मंगळवेढा केसरी किताब जिंकून इतिहास घडवला. आपल्या उत्कृष्ट तंत्रकौशल्य, ताकद आणि आत्मविश्वासाच्या जोरावर तिने एकामागोमाग एक प्रतिस्पर्धींना नमवले. अंतिम कुस्तीमध्ये आश्लेषाने कोल्हापूरच्या नामांकित कुस्तीपटू रिंकू पाटील हिला पराभूत करत निर्णायक विजय मिळवला. ही लढत अत्यंत चुरशीची ठरली आणि प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात तिच्या विजयाचे स्वागत केले.

आश्लेषा सध्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा येथे बी.ए. अंतिम वर्षात शिक्षण घेत आहे. तिच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे सचिव विलासराव घुमरे, प्राचार्य माने तसेच क्रीडा मार्गदर्शक राम काळे यांनी तिचे कौतुक करत पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**योग्य मार्गदर्शनामुळेच सुवर्णक्षण**

आपल्या यशाबद्दल बोलताना आश्लेषा हिने या विजयाचे श्रेय आपले मार्गदर्शक हनुमंत फंड, पुजाताई फंड तसेच मार्गदर्शक पै. अमित साळवे यांना दिले. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळेच हा सुवर्णक्षणाचा टप्पा गाठता आल्याचे तिने सांगितले.

# वालचंद शिक्षकेतर कर्मचारी संघास विजेतेपद

## भाऊसाहेब गांधी स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धा : समाधान कासार फलंदाज व मालिकावीर, नितीन पाटील सर्वोत्कृष्ठ गोलंदाज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ जानेवारी-**

वालचंद शिक्षकेतर कर्मचारी संघाने श्रीमान भाऊसाहेब गांधी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी वालचंद अभियांत्रिकी शिक्षकेतर संघावर २० धावांनी मात केली. समाधान कासार फलंदाज तसेच या स्पर्धेतील मालिकावीर तर नितीन पाटील गोलंदाज पुरस्काराचा मानकरी ठरल

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील क्रीडांगणावर झालेल्या अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना वालचंद नॉन टीचिंग संघाने १० षटकांत ५ गडी गमावत ११६ धावा उभारल्या. यात समाधान कासार याने अवघ्या १९ चेंडूंमध्ये ५४ धावांची झुंजार खेळी करत सामन्याचा रंग बदलून टाकला. विजयी ११७ धावांचे लक्ष्य गाठणाऱ्या डब्ल्यू.आय.टी. नॉन टीचिंग संघास १० षटकांत ६ बाद ९६ धावांच करता आल्या. नितीन पाटील याने १४ चेंडूंमध्ये ३५ धावा करत एकहाती झुंज दिली. मात्र त्याचे प्रयत्न अपुरे पडले.



संस्थेचे विश्वस्त पराग शहा यांच्या हस्ते विजेता वालचंद नॉन टीचिंग संघाचा कर्णधार ओमप्रकाश फटाले, उपविजेता डब्ल्यू.आय.टी. नॉन टीचिंग संघाचा कर्णधार नरेश रेस व तिसऱ्या क्रमांकाचा डब्ल्यू.आय.टी. टीचिंग संघाचा कर्णधार प्रथमेश चिट्टे त्यांच्या संघातील सदस्यांना ट्रॉफी तसेच सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. विजय आठवले, प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, प्राचार्य डॉ. संतोष कोटी, प्राचार्य डॉ. अश्विन बोन्दार्डे आणि मुख्याध्यापक राजकुमार काळे आदी उपस्थित होते. या अंतिम सामन्याला वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजीत गांधी, विश्वस्त वैभव गांधी, माया गांधी, ब्रिजेश गांधी, पराग शहा आदी उपस्थित होते.

# मध्य व पश्चिम रेल्वेची अंतिम फेरीत धडक

## विद्यार्थी क्रीडा केंद्राची ६२वी खो-खो स्पर्धा

**मुंबई, दि. २७ जानेवारी-**

मुंबईच्या लाल मातीत खेळाडूंच्या अफाट चपळाईने, अचूक आक्रमण आणि श्वास रोखून धरणाऱ्या अटीतटीच्या लढतींनी अक्षरशः थराराचा कळस गाठला. मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने व विद्यार्थी क्रीडा केंद्र आयोजित ६२ व्या मुंबई जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रेक्षकांचे डोळे दिपले. सेंट्रल रेल्वे, पश्चिम रेल्वे, रचना नोटरी वर्क्स, विद्यार्थी क्रीडा केंद्र आणि ओम साईश्वर सेवा मंडळ या संघांनी प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारत अंतिम फेरीकडे दमदार वाटचाल केली. पुरुष विभागात सेंट्रल रेल्वे व पश्चिम रेल्वे अंतिम फेरीत भिडणार असून ४ फूट ११ इंच गटात ओम साईश्वर सेवा मंडळ व विद्यार्थी क्रीडा केंद्र यांच्यात अंतिम लढत रंगणार आहे.



**सेंट्रल रेल्वेची 'रचना'वर मात**

पुरुषांच्या पहिल्या उपांत्य सामन्यात सेंट्रल रेल्वेने रचना नोटरी वर्क्स संघाचा १३-११ असा एक डाव राखून २ गुणांनी पराभव करत आपला दबदबा सिद्ध केला. विजयी सेंट्रल रेल्वेकडून रामजी कश्यप (नाबाद ३ मि. संरक्षण व २ गुण), विजय हजारे (२:२० मि. संरक्षण व २ गुण), आकाश तोगरे (२:२० मि. संरक्षण), अवधूत पाटील (२:२० मि. संरक्षण) यांनी संघाला विजयाकडे नेले. पराभूत रचनाकडून हितेश आंग्रे (२ गुण), सिद्धेश चिकने (१:१० व १:१० मि. संरक्षण व २ गुण), यश बोरकर (२ गुण) यांनी कडवी झुंज दिली.

**पश्चिम रेल्वेचा थरारक विजय**

दुसऱ्या उपांत्य सामन्यात पश्चिम रेल्वेने अत्यंत अटीतटीच्या लढतीत महाराष्ट्र पोस्टवर २:३० मिनिटे शिल्लक राखून १२-११ असा १ गुणाने विजय मिळवला. विजयी पश्चिम रेल्वेकडून राहुल मंडल (२ मि. संरक्षण व ३ गुण), महेश शिंदे (१ व २:३० मि. संरक्षण), आदित्य गणपुले (१:१०, २:४० मि. संरक्षण व १ गुण), निखील सोडये (२:४० मि. संरक्षण व १ गुण) यांनी निर्णायक कामगिरी केली. महाराष्ट्र पोस्टकडून अक्षय म्हासाळ (१:१० मि. संरक्षण व २ गुण), सनी तांबे (३ गुण) यांनी शेवटपर्यंत झुंज दिली.

**रचना नोटरी वर्क्सची अंतिम फेरीत झेप**

महिलांच्या उपांत्य सामन्यात रचना नोटरी वर्क्सने मुंबई पोलीस संघावर ५-४ असा १ गुणाने विजय मिळवत अंतिम फेरी गाठली. विजयी रचनाकडून गितांजली नरसाळे (नाबाद ४:५० व ४:५० मि. संरक्षण), काजल शेख (४:१०, २ मि. संरक्षण व १ गुण), शेजल यादव (२ गुण) यांनी प्रभावी खेळ केला. पराभूत मुंबई पोलीसकडून पायल पवार (३:१० मि. संरक्षण व १ गुण), प्रिया भोर (४:५० व १:४० मि. संरक्षण), दीक्षा सोणसुरकर (४ मि. संरक्षण व २ गुण), श्रेया सनगरे (३:२० मि. संरक्षण व १ गुण) यांनी चांगली लढत दिली.

**विद्यार्थी क्रीडा केंद्राचा दणदणीत विजय**

४ फूट ११ इंच मुलांच्या गटात यजमान विद्यार्थी क्रीडा केंद्राने ओम समर्थ भारत व्यायाम मंदिरवर १०-४ असा एक डाव राखून ६ गुणांनी एकतर्फी विजय मिळवला. विजयी विद्यार्थीकडून विघ्नेश जाधव (५ मि. संरक्षण व २ गुण), सार्थक जाधव (३:५० मि. संरक्षण व १ गुण) यांनी अष्टपैलू खेळ केला. ओम समर्थकडून श्रीयांश ताम्हणकर (१:२० मि. संरक्षण), गौरांग जोशी (१:१० मि. संरक्षण व १ गुण), ईशान देसाई (१:१० मि. संरक्षण) यांनी प्रतिकार केला.

**ओम साईश्वर सेवा मंडळाची सरशी**

दुसऱ्या ४ फूट ११ इंच मुलांच्या सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने वैभव स्पोर्ट्स क्लबवर ११-५ असा एक डाव राखून ६ गुणांनी विजय मिळवला. ओम साईश्वरकडून आरव साटम (५ मि. संरक्षण व ३ गुण), श्लोक जाधव (२:१० मि. संरक्षण व १ गुण), शंतनू रावराणे (२:४० मि. संरक्षण) यांनी चमकदार कामगिरी केली. वैभव स्पोर्ट्सकडून पुष्कर देवळेकर (१:४० मि. संरक्षण व २ गुण), अनिकेत गुप्ता (१:४० मि. संरक्षण व १ गुण) यांनी झुंज दिली.



# शालेय ड्रॉप रो बॉल विभागीय स्पर्धेत सुमतीबाई स्कूल तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ जानेवारी-**

विभागीय क्रीडा संकुल येरवडा पुणे येथे पार झालेल्या शालेय ड्रॉप रो बॉल विभागीय स्पर्धेत पी एस इंग्लिश मीडियम टेक्निकल हायस्कूलने १७ वर्षाखालील मुलींच्या तिहेरी प्रकारामध्ये तृतीय क्रमांक संपादिला.

त्यांना क्रीडा शिक्षक अजित पाटील, रोहन घाडगे व सोमनाथ मगर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी केलेला संघ** : अनुष्का मोरे, नेत्रा मल्लुरे, वैष्णवी चौहान, प्रभा शर्मा, देवयानी कासट, प्रिया गांगजी.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# १,२०० कर्मचारी व स्वयंसेवकांची नियुक्ती

## दर्शन रांगेत चार अतिरिक्त पत्राशेड

## माघी यात्रेसाठी मंदिर प्रशासन सज्ज : गहिनीनाथ महाराज औसेकर



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. २७ जानेवारी-**

माघ यात्रा दरवर्षी चैत्र शुध्द ११ जया एकादशी या दिवशी भरते. माघी यात्रा दिनांक २९ जानेवारी रोजी असून, या यात्रा कालावधीत सुमारे ३ ते ४ लाख भविक श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात . यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना सुलभ व जलद दर्शना बरोबरच आवश्यक सोयी-सुविधा मंदिर समितीच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्रीची दर्शन रांग सुलभ व जलद गतीने चालवण्यासाठी अनुभवी कमांडोजची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजेची संख्या कमी करून, व्हीआयपी दर्शनावर निर्बंध व दर्शनाची वेळ वाढवून सकाळी ६.०० ते रात्री १२.०० करण्यात आली आहे. सदर यात्रा निर्विघ्नपणे - सुरळीत पार पाडण्यासाठी व भाविकांना केंद्रबिंदू मानून त्यांना अधिकाधिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समितीचे सदस्य, अधिकारी, विभाग प्रमुख, कर्मचारी वर्ग परिश्रम घेत असून, १ हजार २०० कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

आपत्कालिन व्यवस्थेच्या दृष्टीने सोलापूर महानगरपालिका यांचेकडील रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचा-यासह, सिझफायर यंत्रणा, अत्याधुनिक १०० नग सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, मेटल डिटेक्टर, मोबाईल लॉकर, चप्पल स्टँड, सार्वजनिक प्रसारण सुचना प्रणाली, चौकशी कक्ष, बँग स्कॅनर मशिन, अपघात विमा पॉलीसी इ. व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य व्यवस्थेसाठी पत्राशेड येथे तालुका आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष, उपजिल्हा रूग्णालया मार्फत दर्शनमंडप येथे आयसीयू तसेच वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा व मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्यावत रूग्णवाहिका सज्ज ठेवण्यात येत आहेत. स्वच्छतेसाठी मंदिर, दर्शनमंडप, तुकाराम भवन येथील स्वच्छता मंदिर कर्मचा-यांमार्फत व नगरप्रदक्षिणा, दर्शनरांग, मंदिर प्रदक्षिणा आदी ठिकाणची स्वच्छता आउट सोर्सिंग पद्धतीने करण्यात येत आहेत. याकामी स्वकाम सेवा आळंदी व संत ज्ञानेश्वर सेवा मंडळ आळंदी या स्वयंसेवी संस्थाची मदत घेण्यात येत असून, स्वच्छतेसाठी विशेष लक्ष देण्यात येत आहे. तसेच अन्नछत्रामध्ये दु. १२.०० ते २.०० व रा.७.०० ते ९.०० या वेळेत अन्नदान सुरू राहणार असून, दर्शनरांगेत चहापान, तांदळाची अथवा शाबुदाणाची खिचडी वाटप करण्यात येत आहे असे व्यवस्थापक संदेश भोसले यांनी सांगीतले. दर्शनरांग व्यवस्थापनाच्या दृष्टीने स्कायवॉक पासून पत्राशेड पर्यंत बॅरीकेटींग करून त्यावर ताडपत्री टाकणे व कायमस्वरूपी ४ पत्राशेड येथे तात्पुरते ४ असे ८ पत्राशेड उभारण्यात आले आहेत. या दर्शनरांगेत मॅट, बसण्याची सुविधा, थंड पिण्याचे पाणी, तात्पुरते उड्डाणपुल, शौचालये, विश्रांती कक्ष, बाथरूम, लाईव्ह दर्शन इ. सुविधा उपलब्ध आहेत. याशिवाय, महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, हिरकणी कक्ष तसेच श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडूप्रसादाची उपलब्धी तसेच वेदांता, व्हीडीओकॉन व विठ्ठल रूक्मिणी या तीन भक्तनिवासामधील ३६१ रूममध्ये सुमारे १६०० भाविकांची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

### जनावरे बाजार व जनावरे प्रदर्शन

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने पालखी तळावर जनावरांचा बाजार आणि जनावरांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कृषी उत्पन्ना बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड यांनी दिली. दि.२७ जानेवारी ते दि.३१ जानेवारी अखेर येथील वाखरी पालखी तळ येथे जनावरांचा बाजार भरणार आहे. प्रदर्शनामध्ये भाग घेण्यासाठी दि.२७ आणि २८ जानेवारी २०२६ अखेर नांव नोंदणी करावी. तसेच गुरूवार दि. २९ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता निवड होणार असून दि.२९ जानेवारी रोजी सांय.५ वा.निवड झालेल्यांचा बक्षीस वितरण कार्यक्रम होणार आहे. पंढरपूर कृषी उत्पन्ना बाजार समितीच्या वतीने भरविण्यात आलेल्या जातीवंत खिलार प्रदर्शनात जिल्ह्यातील सर्व शेतकरी बंधु, पशुपालक, या बरोबरच जनावरांची खरेदी विक्री करणारे व्यापारी आदींनी भेट देवून, सहभाग नोंदवावा.

## महत्वाचे...



### अरिहंत स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर रोहिणी देशपांडे व एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पीएसआय बालाजी मस्के उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी डॉ.अजय पोन्नम हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अंबिका वडदाळ यांनी केला. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध कवायतेचे संचलन केले. सूत्रसंचालन तोषिता पोन्नम यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. अंजली रगबले यांनी केले. यावेळी मंचावर डॉ. अजय पोन्नम, सुलक्षणा पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, अर्चना महांकाळ, रामकृष्ण पोन्नम, चन्नेश इंडी उपस्थित होते. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊवाटप करून वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.



### डॉ. रंगनाथन वाचनालयात प्रजासत्ताक दिन

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

जुळे सोलापुरातील डॉ. एस. आर. रंगनाथन सार्व वाचनालय त प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते वासुदेव सुळे यांच्या हस्ते करण्यात आला प्रमुख पाहुण्यांचा सत्कार संस्थेचे सचिव तात्यासाहेब भोसले यांनी केला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निकम उपस्थित होते. याप्रसंगी लहान मुलांना शालेय साहित्य व खाऊ वाटप प्रमुख पाहुणे सत्यम श्रीरामोज यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आभार संस्थेचे अध्यक्ष सुदर्शन भोसले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी श्रीकांत कोकितकर, सचिन गुंजाळ, आशिष इंगोले, धीरज माडिकर, शुभम परदेशी, कामत, शिवाजी रुपनर, सोमन्ना देसाई, पुजारी, आमने आदींनी परिश्रम घेतले.




### महावितरण कार्यालयात प्रजासत्ताक दिन

महावितरण सोलापूर शहर ई-उपविभाग येथे अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनानिमित्ताने राष्ट्रध्वज फडकविण्यात आले. याप्रसंगी विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन पुणे प्रादेशिक संघटक तथा सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनिल काळे, सहाय्यक अभियंता शगुप्ता मुजावर, सविता जंगम, मेघा शिवगुंडे, अजिंक्य कुलकर्णी तसेच सचिन कानडे, निलकंठ कांबळे, अनिलकुमार बनसोडे, प्रदीप मुलादी, आनंद फुलारी, दिनेशकुमार बळवंत, सौरभ पवार, प्रमोद गुमल, मिनल भोसले, भारती टांक, श्रुती मोरे, प्राजक्ता राऊतराव, प्रमिला सुरवसे, रजनी बोड्डू, रम्या कुंजूकुंजू, चंद्रकला शिंदे, दीपक यलगुलवार, एम.एम.करजगीकर, सोमनाथ कारंडे, सतीश बिराजदार, मल्लिनाथ मुन्नोळी, संजय फताटे, चंद्रकांत कुंभार, परमेश्वर जाधव, भीमाशंकर कोळी, स्वप्निल कोरे, रोहिदास डांगे, श्रीशैल विजापूरे, नितीन कोळी, वाहिद शेख, स्वप्निल पाटील, भिमाशंकर इरशेट्टी, आदित्य व्हनमाने उपस्थित होते.


### मसापच्या वतीने 'लेणं अनुभवाचं' या पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूर यांच्या वतीने लेणं अनुभवाचं या ललित लेखाच्या पुस्तकाचे प्रकाशन शनिवार दि. ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक सोलापूर येथे होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून अक्षरधारा दिवाळी अंकाच्या संपादिका व लेखिका स्नेहा अवसरीकर उपस्थित राहणार आहेत. यावेळी वैशाली सुरवसे सीईओ सूर्या एक्झिक्यूटिव्ह व इव्हेंट मॅनेजर सोलापूर यांची प्रमुख उपस्थिती आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मसाप सोलापूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर या आहेत. हे पुस्तक महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सोलापूर शाखेने संपादित केलेल्या लेखांचे आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ३७ महिलांच्या विविध अनुभवांचे अतिशय सुंदर असे लेख आहेत.. असा उपक्रम महाराष्ट्रात सोलापूरच्या शाखेने प्रथमच राबवला आहे..तरी या प्रकाशन कार्यक्रमाला साहित्यप्रेमी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मसाप शाखा सोलापूरचे प्रमुख कार्यवाह डॉ. नरेंद्र काटीकर व या पुस्तकाच्या संपादिका डॉ श्रुती श्री वडगबाळकर, कार्यकारी संपादिका वंदना कुलकर्णी, सहाय्यक संपादिका डॉ .सुवर्णा गुंड-चव्हाण व शोभा बोल्ली यांनी केले आहे.

## निधन वृत्त...

### आगव्वा दोंता



**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

जूना विडी घरकुल प्रगती चौक गोविंदराज नगर येथील रहिवासी आगव्वा नारायण दोंता यांचे मंगळवारी सकाळी ८ वाजता निधन झाले आहे मृत्यूसमयी त्या ८८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवारी दुपारी एक वाजता पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात येणार आहे. पत्रकार व्यंकटेश दोंता व न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीचे निवृत्त अधिकारी नरेश दोंता यांच्या त्या मातोश्री होत.

## जिल्हा परिषदेत प्रजासत्ताक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. २७ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा परिषदेत भारत देशाचा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करणेत आला. जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याचे पुजन करून ध्वज वंदन करणेत आले. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रकल्प संचालक चंद्रकांत जगताप, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, सामान्य प्रशासन विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( ग्रामपंचायती) सुर्यंकात भुजबळ, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी,, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, शिक्षणाधिकारी (माध्यमिक सचिन जगताप, शिक्षणाधिकारी कादर शेख, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता सप्ताळे उपस्थित होते. या प्रसंगी सिंईओ कुलदीप जंगम यांनी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रारंभी हरीभाई देवकरण प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी राज्यगीत सादर केले. त्यानंतर जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी कुष्ठरोग निर्मूलनाची शपथ दिली.



जिल्हा परिषद मुख्यालयात सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करणेत आले. स्वीय सहाय्यक सुधाकर माने देशमुख, कक्ष अधिकारी अविनाश गोडसे यांचे सह कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचालन मेहताब शेख यांनी केले.

## माळशिरस शहर व परिसरात प्रजासत्ताक दिन

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस,दि. २७ जानेवारी-**

येथील तहसील कार्यालयात तहसीलदार सुरेश शेजूळ यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

यावेळी नायब तहसीलदार अमोल कदम, महसूल नायब तहसीलदार सिद्धनाथ जावीर, निवडणूक नायब तहसीलदार प्रवीण सूळ उपस्थित होते. नंतर माजी स्वातंत्र्य सैनिक, निवृत्त अधिकारी यांचा सन्मान झाला. येथील न्यायालयात जिल्हा नायाधीश आर.व्ही. ताम्हाणेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. येथील पंचायत समिती कार्यालयात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांच्याहस्ते ध्वजारोहण झाले. नगर पंचायत कार्यालयात नगराध्यक्ष प्राजक्ता ओहोळ यांचेहस्ते ध्वजारोहण झाले यावेळी माजी नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख, मुख्याधिकारी सुमित जाधव उपस्थित होते, तालुका कृषी कार्यालयात तालुका कृषी अधिकारी आबासाहेब



रूपनवर यांचेहस्ते ध्वजारोहण झाले. पाटबंधारे कार्यालयात सहा अभियंता(श्रेणी १) श्रवण नहार यांच्याहस्ते ध्वजारोहण झाले. येथील वन क्षेत्रपाल कार्यालयात वनक्षेत्र अधिकारी राजू आटोळे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. वीजवितरण कार्यालयात शाखा अभियंता शितल डोळे यांचे हस्ते ध्वजारोहण झाले. येथील पोलीस ठाण्यात पोलीस निरिक्षक विकास दिंडूरे यांच्याहस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी ए.पी. आय स्वाती पवार, संदीप गोसावी उपस्थित होते. गोपाळराव देव प्रशाला व ज.च.आगाशे कनिष्ठ महाविद्यालयात संस्थेचे सचिव रामभाऊ दोशी यांनी ध्वजारोहन केले. मुख्याध्यापक धनंजय केसकर उपस्थित होते. समीर गांधी महाविद्यालय व विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूलमध्ये सहसचिव राजाराम ढाले यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले. प्राचार्य देविदास गेजगे, प्रा. अपर्णा इनामदार उपस्थित होते. कन्या प्रशालेत संस्थेचे अध्यक्ष अजय पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले. यावेळी मुख्याध्यापक व्ही.आर. वाघमोडे उपस्थित होते माळशिरस प्रशालेत मुख्याध्यापक एस.जी. सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले. सावित्रीबाई फुले विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष रवींद्र फरांदे यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले. श्रीनाथ विद्यालय व इंडियन मॉडेल स्कूल मध्ये सचिव रावसाहेब देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले. हनुमान मोफत वाचनालय येथे संथेचे संचालक अश्विनी केसकर यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले.

## युनाइटेड फोरम ऑफ बँक युनियन्सचा देशव्यापी संप




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ जानेवारी-**

पाच दिवसांचा आठवडा या करारानुसार मान्य केलेल्या मागणीची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी, या दीर्घकालीन प्रलंबित मागणीसाठी आज बँकिंग क्षेत्रातील णत्रङ्गण या शिखर संघटनेंतर्गत नऊ संघटनानी देशव्यापी संप पुकारला होता.

बार्शी येथे कार्यरत असलेल्या बँक कर्मचारी समन्वय समितीने तालुकास्तरावर निदर्शने करण्याचे आयोजन केले होते. त्याला प्रतिसाद म्हणून बार्शी शहर व तालुक्यातील सर्व बँकेतील अधिकारी व कर्मचारी बँक ऑफ इंडिया, शाखा बार्शी येथे आपला निषेध व्यक्त करण्यासाठी जमले होते. त्या ठिकाणी आपल्या पाच दिवसांचा आठवडा या प्रलंबित मागणीसाठी जोरदार घोषणा आणि निदर्शने करण्यात आली आणि आपली मागणी लवकरात लवकर मान्य करावी नाहीतर हा लढा यापुढे अजून तीव्र करण्यात येणार असे सांगितले. बार्शी समन्वय समितीतर्फे समन्वयक कॉ. सरिता कुलकर्णी, अध्यक्ष कॉ. राहुल मांजरे यांनी मार्गदर्शन केले. तर विविध बँकेतून सुरज गोडगे युनियन बँक, विक्रम निचळ सेंट्रल बँक, अंकित केडिया महाराष्ट्र बँक, अमित काळदाते, सुदर्शन अग्निहोत्री, विशाल तांबडे यांनी आपली मते व्यक्त केली. कॅनरा बँक नितीन, शैलजा गुप्ता स्टेट बँक, बँक ऑफ बडोदा इत्यादींचे प्रतिनिधी उपस्थित होते. डिजीटल बँकिंगचे इतके ढोल वाजवले जात असताना रिझर्व बँक, एलआयसी, नाबार्ड, आयटी क्षेत्र या सर्वप्रमाणे बँक कर्मचाऱ्याची मान्य केलेला पाच दिवसांचा आठवडा त्वरित अंमलात आणला पाहिजे ही सर्वांची मागणी होती.

## महातपस्वी श्री कुमार स्वामीजी यांच्या जीवन व कार्यावर ८२० विद्यार्थ्यांची परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी -**

आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळ यांच्या वतीने महातपस्वी श्री कुमार स्वामीजी - जीवन व कार्य या ग्रंथावर आधारित इयत्ता ८ वी, ९ वी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेत शालेय व महाविद्यालयीनस्तरावरील ९३० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यापैकी ८२० विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेत सहभागी झाले.




ही परीक्षा रविवार, दिनांक २५ जानेवारी रोजी सोलापूर येथील सिद्धेश्वर कन्या प्रशाला, पंचकट्टा येथे पार पडली. परीक्षेसाठी सदर प्रशाला परीक्षा केंद्र म्हणून निवडण्यात आली होती.

या उपक्रमामध्ये सिद्धेश्वर प्रशाला, सिद्धेश्वर वुमन्स पॉलीटेक्निक कॉलेज, सिद्धेश्वर वुमन्स इंजिनिअरिंग कॉलेज, ए. जी. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, वीर तपस्वी ब्रह्मठ होटगी कनिष्ठ महाविद्यालय, श्राविका आश्रम प्रशाला, पुल्ली कन्या प्रशाला, बुरला कनिष्ठ महाविद्यालय, कुचन प्रशाला, ऑर्किड प्रशाला, सुरवसे प्रशाला यांच्यासह १८ शैक्षणिक संस्थांनी सहभाग नोंदवला. या परीक्षेसाठी इयत्ता ८ वी व ९ वी साठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका करण्यात आली होती. यशस्वी विद्यार्थ्यांसाठी बक्षिसे आहेत.

## महर्षि शैक्षणिक संकुलात प्रजासत्ताक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २७ जानेवारी -**

यशवंत नगर येथील अग्रगण्य शैक्षणिक महर्षि संकुल येथे भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. विविध विधायक उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून संकुलाने भारतीय लोकशाहीचा उत्सव साजरा केला.

ध्वजारोहण कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी संतोष वाळके उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज विभाग अकलूज, सुषमा संतोष महामुनी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती माळशिरस, सिद्धार्थ गायकवाड विभागीय सहसंचालक शाखा अमरावती, सभापती ॲड. नितीनराव खराडे, प्रशालेचे मुख्याध्यापक संजय गळीतकर उपस्थित होते. प्रमुख अतिथी संतोष वाळके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. महाराष्ट्र





शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सूर्यनमस्कार स्पर्धेत शिक्षक गटातून प्रथम क्रमांक मिळवलेले योगशिक्षक प्राध्यापक धनंजय देशमुख यांचा सन्मान व्यासपीठावर संपन्न झाला. सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ आयोजित त्रिमूर्ती केसरी कुस्ती स्पर्धेत महर्षि प्रशालेतील मेघराज तानाजी तांबिले याने सलग तीन वर्षे प्रथम क्रमांक मिळवून प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला याबद्दल सन्मान समारंभ पार पडला. प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मेरा मुल्क मेरा देश हे देशभक्तीपर गीत, लक्ष्मीबाई कन्या प्रशालेने आम्ही शिवकन्या स्फूर्ती गीत सादर केले. हर्षि प्रशालेच्या मुलींच्या ेझीम संघाने महाराष्ट्राची लोकसंस्कृती दर्शवणारे २२ कौशल्यांसह पारंपारिक लेझीम सादर केले. निरक्षरतेचे निर्मूलन करून आत्मनिर्भर व सुशिक्षित भारत घडवण्यासाठी सर्वांमार्फत असाक्षरमुक्त भारत शपथ घेण्यात आली. प्रशाला समिती सदस्य नवनाथ पांढरे, कैलास चौधरी, विनोद जाधव, नितीन इंगवले देशमुख, जया गायकवाड, मुख्याध्यापक शिवाजी पारसे, मुख्याध्यापिका अनिता पवार, उपमुख्याध्यापक आसिफ झारेकरी, पर्यवेक्षक उमेश बोरावके उपस्थित होते. सूत्रसंचालन रवी गायकवाड यांनी केले.

# बांधकाम कामगार योजनेच्या नावाखाली सोलापुरातील ४४ महिलांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ जानेवारी-**

बांधकाम कामगार कल्याणकारी योजनेचा लाभ मिळवून देतो, असे सांगून सोलापुरातील ४४ महिलांची फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांचा गैरवापर करत बोगस कागदपत्रांच्या आधारे लाभ घेतल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाने चौकशी सुरू केली आहे.



प्राप्त माहितीनुसार, संबंधित महिलांची बांधकाम कामगार म्हणून मंडळामध्ये नोंदणी झालेली असल्याचे दाखवण्यात आले होते. ए-०५ वैद्यकीय पदवी या योजनेअंतर्गत त्यांच्या पाल्यांच्या नावे प्रत्येकी एक लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळाल्याची नोंद आढळून आली. या नोंदणीसाठी, शिष्यवृत्तीसाठी सादर करण्यात आलेली कागदपत्रे संशयास्पद असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. अक्कलकोट विभागातील नोंदणी अधिकाऱ्यांनी संबंधित लाभार्थ्यांना नोटीस बजावली आहे. ठरलेल्या तारखेला हजर न राहिल्यास किंवा कागदपत्रे बोगस आढळून आल्यास स्थानिक पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. प्रशासनाकडून सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

महिलांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकारने बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरु केली असून त्याचा लाभ मिळवून देतो, असे सांगून गावात येणाऱ्या एजंटांनी त्यांच्याकडून आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुकसह इतर आवश्यक कागदपत्रे गोळा केली. या कागदपत्रांच्या आधारे योजना मंजूर करून देण्याचे आमिष दाखवण्यात आले. महिलांकडून काही ठराविक रक्कम तात्पुरती देण्यात आली.

मात्र त्यांच्या नावावर सुमारे दीड लाख रुपयांचा आर्थिक बोजा दाखवण्यात आल्याचे चौकशीत उघड झाले आहे. प्रत्येक महिलेला वेगवेगळ्या प्रमाणात रक्कम देण्यात आली असली, तरी मोठी रक्कम एजंटांनी स्वतःकडेच ठेवून ते पसार झाल्याचा आरोप महिलांनी केला आहे. चपळगावसह परिसरातील अनेक गावांमध्ये हे एजंट नियमितपणे येत होते आणि सर्व महिलांची कागदपत्रे एकत्रितपणे गोळा करून नेत होते. महिलांना याबाबत कोणतीही अधिकृत माहिती न देता त्यांच्या नावावर मोठ्या रकमेची नोंद करण्यात आल्याने आता त्या मोठ्या अडचणीत सापडल्या आहेत. फसवणुकीमागे कोण आहे, किती महिलांना याचा फटका बसला आहे आणि आर्थिक गैरव्यवहार किती आहे, तपास सुरु असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

**सुमारे २०० जणांच्या नावाने बोगसगिरी**

चपळगाव येथील महिलांनी दमाणी नगर येथील सहाय्यक कामगार कल्याण आयुक्त कार्यालयात एकच गर्दी केली होती. महिलांनी खरी वस्तुस्थिती अधिकाऱ्यांसमोर सांगितली. याबाबत चौकशी सुरू असून बांधकाम कामगार योजनेमध्ये सुमारे २०० जणांच्या नावे बोगसगिरी झाली असल्याचे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# सांगोला : ७ जि.प.साठी ४१, १४ पं.स.साठी ५४ उमेदवार

## जि.प.गटातून ६५ तर पं.स.गणातून ९८ जणांची माघार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२७ जानेवारी -**

सांगोल्यामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ साठी ७ जि.प.सदस्यासाठी ४१ तर १४ पं.स.सदस्यसाठी ५४ उमेदवारी अर्ज राहिले आहेत. तसेच जि.प.गटातून ६५ तर पं.स.गणातून ९८ उमेदवारांनी माघार घेतली आहे. मंगळवार दि.२७ जानेवारी रोजी अर्ज माघारी घेण्याची प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी व सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांच्या उपस्थितीत पार पडली.

जिल्हा परिषद गटातून महूद-५, एकतपुर-४, जवळा-८, कडलास-५, चोपडी-९, कोळा-६, घेरडी-४ असे ७ जागांसाठी एकूण ४१ उमेदवारी अर्ज राहिले आहेत. पंचायत समिती गणातून महूद-३, चिकमहुद-३, वाकी शिवणे-३, एकतपुर-४, वाढेगाव-३, जवळा-४, कडलास-३, अजनाळे-६, राजुरी-४, चोपडी-३, कोळा-३, हतीद-३, सोनंद-७, घेरडी-५ असे १४ जागांसाठी एकूण ५४ उमेदवारी अर्ज राहिले आहेत, अशी माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली. अंतिम उमेदवारासाठी अधिकृत निवडणूक चिन्हाचे वाटप प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पार पडली. अंतिम उमेदवाराची यादी जाहीर झाल्यानंतर आता प्रचाराला वेग आला आहे.

सर्व उमेदवार व कार्यकर्त्यांना आचारसंहिता पाळावेत, असे आवाहन आचारसंहिता कक्षाचे प्रमुख उमेशचंद्र कुलकर्णी यांनी केले आहे.

# बार्शीत शेवटच्या दिवशी जि.प.च्या ३६, पं.स.च्या ६२ उमेदवारांनी घेतली माघार

## सर्वच गट आणि गणात होणार दुरंगी लढती

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २७ जानेवारी-**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी जिल्हा परिषद सदस्य पदासाठी उमेदवारी दाखल केलेल्या ३६ उमेदवारांनी तर पंचायत समिती सदस्य पदासाठी दाखल केलेल्या ६२ उमेदवाराने उमेदवारी अर्ज माघे घेतल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार एफ. आर. शेख यांनी दिली.

आता निवडणुकीच्या आखाड्यात जिल्हा परिषदेच्या ६ जागांसाठी १६ तर पंचायत समितीच्या १२ जागांसाठी ३६ असे एकूण ५२ उमेदवार राहिले आहेत.




एकंदरीत तालुक्यात किरकोळ अपक्ष वगळता भाजप विरुद्ध दोन शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसची महाआघाडी यांच्यात थेट लढत होणार हे स्पष्ट झाले आहे. बहुतांश अपक्ष आणि पक्षाच्या मुख्य उमेदवाराला पूरक म्हणून अर्ज दाखल केलेल्या सर्व उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले आहेत.

दोन्ही गटात एकही उमेदवाराने बंडखोरी केली नाही. सासुरे पंचायत समिती गणातून अपक्ष अर्ज दाखल केलेल्या माजी जिल्हा परिषद सदस्य मकरंद निंबाळकर यांनी त्यांचा अर्ज माघारी घेतला आहे. त्यामुळे भाजपचे संतोष निंबाळकर यांना त्याचा फायदा होणार आहे.

आता निवडणुकीच्या मैदानात जिल्हा परिषदेसाठी भाजप ६, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार ३, शिंदेसेना २ आणि उध्दव सेना १, ,राष्ट्रीय समाज पक्ष २ आणि २ अपक्ष उमेदवार मैदानात आहेत. पंचायत समिती १२ जागांसाठी भाजप १२, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार ८, शिंदेसेना ४, काँग्रेस १ तर उर्वरित रासप आणि अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे.

अपक्ष किंवा इतर पक्षाचे उमेदवार असले तरी खरी लढत ही आमदार दिलीप सोपल विरुद्ध राजेंद्र राऊत या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यात होणार आहे.


# महापौरपदासाठी पडद्यामागची खेळी

- ‘भाजपा’त नवे समीकरण
- राजकारणात सर्व काही असते माफ?
- देशमुख गटाची एकजूट, कोठे गट अडचणीत?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुका पार पडल्यानंतर आता खऱ्या अर्थाने राजकीय डावपेचांना सुरुवात झाल्याचे चित्र दिसत आहे. ‘भाजपा’मधील दोन प्रभावी गट आमनेसामने येत असून, महापौरपदासाठी जोरदार सत्तासंघर्ष रंगताना दिसत आहे. महापौरपदासाठी पडद्यामागची खेळी सुरु असून ‘भाजपा’त नवे समीकरण आखण्यात येत असल्याचे चर्चेत आहे.

भाजपच्या महापौरपदाच्या शर्यतीत विनायक कोंड्याल आणि डॉ.किरण देशमुख ही नावे आघाडीवर असली, तरी पालकमंत्र्यांच्या सूचक वक्तव्यामुळे कोठे गटाचा नगरसेवक महापौरपदी विराजमान होणार असल्याचे संकेत मिळत होते. भाजपाच्या अंतर्गत बैठकीतही तसाच सूर दिसून आला. मात्र या बैठकीस



देशमुख गटातील काही नगरसेवक अनुपस्थित होते. विशेष म्हणजे या बैठकीत डॉ.किरण देशमुख यांचीही अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली होती.

महापौरपदावर आपलाच ‘विजय’ व्हावा, यासाठी आमदारद्वय विजयकुमार देशमुख आणि सुभाष देशमुख यांच्या दोन्ही गटातील नगरसेवकांनी एकत्र येत डॉ.किरण देशमुख यांच्या नावाची शिफारस पक्षश्रेष्ठींकडे केल्याचे सांगण्यात येत आहे. येत्या काही दिवसांत या निर्णयावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यासाठी आवश्यक संख्याबळ मिळवण्यासाठी इतर पक्षांतील नगरसेवकांनाही सोबत घेण्याची रणनीती आखली जात असल्याची चर्चा आहे. एमआयएम पक्षातील नगरसेवकांना महत्त्वाची पदे देण्याची शक्यता असल्याची चर्चाही भाजपच्या गोटात सुरु आहे. या सर्व घडामोडींमुळे कोठे गटाला मोठा धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात असून, ‘युध्दात, प्रेमात आणि राजकारणात सर्व काही माफ’ ही म्हण पुन्हा एकदा खरी ठरत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठीच घेणार असून, सध्या यावर अधिकृत भाष्य करण्यास भाजप नेते टाळत आहेत.

### उपमुख्यमंत्री शिंदेंच्या दौऱ्यामुळे राजकीय घडामोडीची शक्यता

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. हॉटेल बालाजी सरोवर येथे त्यांचा मुक्काम असून आज मोठ्या राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. शिवसेना राज्यात सत्तेत सहभागी मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपली वेगळी चूल मांडली आहे. दरम्यान, सत्ता संघर्षाच्या नव्या पर्वात शिंदे सेनेमध्ये देखील मोठे फेरबदल घडणार असल्याची चर्चा महापालिकेच्या राजकीय वर्तुळात सुरु आहे.

# पेनूरमध्ये तिसरे गोल रिंगण उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ जानेवारी-**

अखिल भाविक वारकरी मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या माघवारीच्या अनुषंगाने मोहोळ तालुक्यातील पेनूर येथे तिसरे गोल रिंगण उत्साहात पार पाडण्यात आले. जोतिराम चांगभले, किसन कापसे, नामदेव रणदिवे, निळोबा जांभळे, विवेक जमदाडे, संजय पवार, विष्णूपंत मोरे यांच्या हस्ते पालखी व अश्व पूजन करण्यात आले. भारत चवरे यांच्या हस्ते दिंडी प्रमुख व विणेकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सुधाकर इंगळे यांनी सूत्रसंचालन केले. बळीराम चवरे, महेश चवरे, आबा वसेकर आदींनी परिश्रम घेतले. या रिंगण सोहळ्याचे यजमानपद पेनूर भजनी मंडळाने स्वीकारले होते. या गोल रिंगण सोहळ्यामुळे मैदानासह परिसरात भक्तीचा माहोल झाला होता.



**सोलापूर : प्रिसीजन कॅमशॉफ्टमध्ये ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी.**

# मंगळवेढा जि.प. व पं.स. गटात ३८ उमेदवार रिंगणात

## ८८ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा, दि. २७ जानेवारी-**

मंगळवेढा तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गटांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी ३८ उमेदवारच निवडणूक रिंगणात उभे राहिले आहेत. यापैकी जि.प. गटात १३ तर पं.स. गटात २५ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. एकूण १८२ अर्ज प्राप्त झाल्यापैकी ८८ उमेदवारांनी माघार घेतल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली आहे.

या निवडणुकीत भाजप आणि तीर्थक्षेत्र विकास आघाडी यांच्यात थेट लढतची चित्र आहे. दरम्यान, निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ भाजप पक्षाने तीर्थक्षेत्र माचणूर येथील श्री सिद्धेश्वर मंदिरात फोडून फोडला. आ. समाधान आवताडे यांनी मागील दोन दिवसांपूर्वी हा प्रचाराचा शुभारंभ केला. उर्वरित पक्षांचाही प्रचार शुभारंभ येत्या दोन दिवसांत होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत भाजप आणि तीर्थक्षेत्र विकास आघाडी असा प्रमुख सामना होणार असल्याचे चित्र आहे.

**प्रभावी माघारींमुळे बदलले चित्र**




या निवडणुकीत अनेक प्रमुख नेत्यांनी आपले अर्ज माघार घेतल्याने राजकीय वातावरणात बदल झाला आहे. मंगळवेढ्याच्या नगराध्यक्ष सुनंदा आवताडे यांचे चिरंजीव व खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सिद्धेश्वर आवताडे, माजी समाज कल्याण सभापती शिला शिवशरण, माजी पंचायत समिती सदस्य उज्वला मस्के आणि काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रशांत साळे या प्रमुखांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे.

यामुळे जि.प. आणि पं.स. गटांमध्ये अपक्ष आणि इतर छोट्या पक्षांच्या उमेदवारांना फायदा झाला असला तरी मुख्य लढत भाजप आणि तीर्थक्षेत्र विकास आघाडी यांच्यातच होणार आहे.

**निवडणूक विभागाची माहिती**

निवडणूक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, एकूण १८२ अर्जांपैकी ९४ अर्ज वैध ठरले. यापैकी ३८ उमेदवार रिंगणात राहिले तर ५६ अर्ज नामंजूर झाले. माघार घेणाऱ्या ८८ पैकी अनेकजण प्रमुख राजकीय व्यक्ती असल्याने निवडणुकीचे स्वरूप एकदम बदलले आहे. आता प्रचारयंत्रणा सज्ज झाली असून, मतदारांना निवडणूक रिंगणातील उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

**भाजपचा प्रचाराचा शुभारंभ** भाजपने प्रचाराचा नारळ फोडून आ. समाधान आवताडे यांच्या उपस्थितीत तीर्थक्षेत्र माचणूर येथे श्री सिद्धेश्वर मंदिरात शुभारंभ केला. पक्षाने सर्व गटांमध्ये मजबूत उमेदवार उतरवले असून, तीर्थक्षेत्र विकास आघाडीला धक्का देण्याचा प्रयत्न आहे. तीर्थक्षेत्र विकास आघाडीनेही आपले उमेदवार मजबूत केले असून, प्रचाराचा नारळ लवकर फोडण्याची शक्यता आहे. काँग्रेस, शिवसेना, वंचित बहुजन आघाडी आणि अपक्ष उमेदवारही काही गटांत प्रभावी ठरतील.

**तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा प्रभाव**

मंगळवेढा तालुक्यातील तीर्थक्षेत्र विकास आघाडीनेही अनेक गटांत मजबूत उमेदवार दिले आहेत.

दामाजीनगर, हुलजंती, लक्ष्मी दहिवडी, संत चोखामेळानगर, भोसे, रड्डे या गटांत आघाडीचे उमेदवार रिंगणात आहेत. भाजपशी थेट लढत असल्याने हा सामना रंजक होणार आहे. स्थानिक विकासाच्या मुद्द्यांवर प्रचार होण्याची अपेक्षा आहे.

**अपक्ष आणि छोट्या पक्षांचा वाटा**

काही गटांत अपक्ष उमेदवारांचा प्रभाव आहे. लक्ष्मी दहिवडी (११०) गटात दोन अपक्ष, संत दामाजीनगर (५३), लक्ष्मी दहिवडी (५५) गटांतही अपक्ष आहेत. आम आदमी पार्टी, राष्ट्रीय काँग्रेस, नॅशनल काँग्रेस पार्टी यांसारख्या छोट्या पक्षांचेही उमेदवार रिंगणात आहेत. यामुळे मतविभाजनाची शक्यता आहे.

# हेरिटेज मणीधारी सोसायटीत प्रजासत्ताक दिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

भारताचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी पालकांनी सुसंस्कारित पिढी तयार करावी, असे आवाहन संभाजीनगर येथील बाल न्यायालयाच्या दंडाधिकारी सुप्रिया बिराजदार शिंदे यांनी केले. अक्कलकोट रोडवरील हेरिटेज मनिधारी एम्पायर सोसायटीत श्री दत्त मंदिराजवळ प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहन प्रसंगी त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष सतीश नोमुल होते. याप्रसंगी न्यायाधीश सुप्रिया यांचे आई वडील मीनाक्षी व काशिनाथ बिराजदार हे उपस्थित होते. सुनीता गोडाळे, राधिका नोमुल व प्रतिभा पारे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. सूत्रसंचालन पत्रकार दशरथ वडतिले यांनी केले. यावेळी माजी अध्यक्ष गजाननराव होनराव, सुरेश येळमेळी, सोसायटीचे अध्यक्ष अंजली माशाळकर, सचिव सिद्धेश्वर श्रीगादी, शंकर गाडी, सचिन पतंगे, सुतार उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** लातूर शहरातील विशालनगर परिसरातील साई मंदिर समोरील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये चिमुकल्यानी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.

या प्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थी, सर्व शिक्षिकांची उपस्थिती होती. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शाळेने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. यावेळी प्ले ग्रुप क्लासमधून सई संदीप मोहिते – प्रथम, धार्मिका सतलिंग बुलबुले – द्वितीय, नर्सरी क्लासमधून अद्वैत सुरज खंडागळे, श्रीजा धनंजय देलमोडे – प्रथम, रुशांक रामराजे तेले, शौर्य सदाशिव कांबळे – द्वितीय, प्रीशा प्रवीण यादव, रीयांशी बसवेश्र्वर आलमले – तृतीय यासह अनेक विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्याना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेमध्ये चिमुकल्यांनी त्यांच्या वक्तृत्वाचे खूपच उत्तमरित्या सादरीकरण केले. या कार्यक्रमाला बहुसंख्य पालक उपस्थित होते. याप्रसंगी श्रीकृष्ण लाटे यांनी सर्व विद्यार्थी व पालकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.




# शेतकरी आत्महत्या तंत्र आणि संघटनाच्या अभावामुळे होतात : पद्मश्री डॉ. दादा लाड

**तभा वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** शेतीमुळे शेतकरी आत्महत्या करतात असे म्हणणे शेतीला बदनाम करण्याचा प्रयत्न आहे. कापूस असो वा अन्य पीक त्याच्या उत्पादन वाढीसाठी योग्य त्या तंत्राचा अवलंब करणे गरजेचे असते. तंत्र आणि संघटनाच्या अभावामुळे खचून गेल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. शेतीमालाला भाव मिळत नाही म्हणून एवढे टोकाचे पाऊल उचलणे योग्य नसल्याचे प्रतिपादन पद्मश्री पुरस्कार घोषित झालेले भारतीय किसान संघाचे ज्येष्ठ नेते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक डॉ. दादा लाड यांनी 'दैनिक सोलापूर तरुण भारत' शी बोलताना केले.

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येस पद्मश्री पुरस्कार घोषित झालेल्या डॉ. श्रीरंग उर्फ दादा लाड यांच्याशी लातूरच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'माधव स्मृती' कार्यालयात सोमवारी प्रस्तुत प्रतिनिधीने सुसंवाद साधला. निःस्पृह कर्मयोगी डॉ. दादा लाड मागच्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती आणण्याच्या उद्देशाने कार्यरत आहेत. कापसाच्या उत्पादन तंत्रात बदल घडवून आणण्याच्या त्यांच्या तंत्राने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग उपलब्ध करून दिला आहे. भारतीय किसान संघाच्या माध्यमातूनही त्यांनी कृषी क्षेत्रात अमुलाग्र कार्य केले आहे. आजही वयाची आठ दशके उलटूनही त्यांचा उत्साह तरुणांना लाजवणारा असा आहे. किसान संघाचे संघटन आजमितीस बाल्यावस्थेत आहे. हे संघटन मजबूत करण्याचे प्रयत्न सुरु आहेत, असे सांगून डॉ. दादा लाड म्हणाले की, शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही, ह्या कारणावरून शेतकरी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलतात,असे होत नाही.

शेतकरी संघटित झाल्याशिवाय सरकार शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव देऊ शकत नाही. म्हणूनच आजपर्यंत अनेक सरकारे आली – गेली, पण शेतकऱ्यांचा प्रश्न आहे तसाच आहे. शेतकऱ्यांना चांगल्या भावासोबतच त्यांच्या



उत्पन्नातही वाढ होणे आवश्यक आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या तंत्रानुसार कापसाची लागवड केल्यास उत्पादनात वाढ होऊ शकते.

मराठवाड्यातील शेतकरी भावूक आहे. दरवर्षी आषाढी वारीला आठ दहा लाख लोक जातात. यामध्ये शेतकऱ्यांची संख्या जास्त असते. एवढ्या मोठ्या संख्येने शेतकऱ्यांचे संघटन शेतकऱ्यांच्या प्रश्नावर झाल्यास शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक गतीने होऊ शकते. एखाद्या वर्षी शेतकरी आषाढी वरील जाण्याऐवजी एवढ्या मोठ्या संख्येने मुंबईला मोर्चा काढला तर त्याचा कायमसाठी फायदा होऊ शकतो, असेही डॉ. लाड म्हणाले.

मराठवाड्यातील जमिनीला जास्त पावसाची गरज नाही. फक्त शेतकऱ्यांनी विकसित तंत्राचा अवलंब केल्यास शेतकरी निश्चित आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतात. कापूस उत्पादनात वाढ करण्याचे तंत्र शेतकऱ्यांना शिकविले गेल्यास त्याचा होऊ शकतो. आपल्याला मिळालेल्या या पुरस्कारामुळे आपले तंत्र जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचणार आहे. परिणामी शेतकरी राजा खऱ्या अर्थाने आर्थिक दृष्टया सक्षम होणार आहे. या तंत्राची प्रसिद्धी आता सरकारने मोठ्या प्रमाणात करावी. जेणेकरून जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत हे तंत्र पोहोचेल. आपल्याकडे त्रेता युगापासून कापसाचे उत्पादन होते. हे उत्पादन वाढीसाठी तंत्र विकसित होणे आवश्यक होते. शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे मागणी करूनही हमीभाव मिळत नाही. हमीभाव न मिळणे याकरिता शेतकऱ्यांत शक्ती आणि संघटनाचा अभाव कारणीभूत आहे. भारतीय किसान संघ शेतकऱ्यांना संघटित करण्याचे काम करत आहे. मात्र संघर्ष ही काही किसान संघाची प्रवृत्ती नाही.

शेतकऱ्यांना हमीभाव मिळवण्यासाठी सर्वप्रथम त्यांचे संघटन वाढले पाहिजे. हे संघटन वाढल्यास शेतकऱ्यांना हमीभावासाठी सरकारला विनंती करण्याची गरज पडणार नाही तर आदेश देता येऊ शकेल असेही त्यांनी बोलून दाखवले. आपल्याला पद्मश्री पुरस्कार मिळाल्याचा व्यक्तिगत आनंद झाला नाही. मात्र, शेतकरी या तंत्राचा अवलंब करून आपल्या उत्पादनात वाढ करू शकेल याचा आनंद अधिक झाल्याची प्रांजळ भावना डॉ. लाड यांनी व्यक्त केली. कापसाच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी २६ वर्षांपासून आपण करत असलेल्या संशोधनाचा फायदा आता जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचणर आहे, याचा आपल्याला मनस्वी आनंद झाल्याचे त्यांनी सांगितले.

## शाळांतील मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** राष्ट्र प्रथम अभियानांतर्गत शाळांतील मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. मुली स्वसंरक्षण करण्यास सक्षम व्हाव्यात म्हणून हा निर्णय घेतला असून, माजी सैनिकांकडून सैनिकी धडेही दिले जाणार आहेत.

शालेय शिक्षण विभागाचा हा निर्णय अत्यंत चांगला असून, पालक, विद्यार्थ्यांतून याचे स्वागत होत आहे. हल्ली शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना स्वतःचे संरक्षण करता आले पाहिजे. त्या बाहेर वावरताना सक्षम असल्या पाहिजेत. यासाठी शालेय शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला असून, प्रबोधनकारामार्फत विद्यार्थ्यांत राष्ट्रीय विचार आणि व्यक्तीमत्व विकासासाठी मार्गदर्शनही केले जाणार आहे.

प्रशिक्षणात शारीरिक सक्षमतेबरोबरच आरोग्याबाबतीतही मार्गदर्शन केले जाणार आहे. परिपूर्ण प्रशिक्षण देण्याचे नियोजन असून, यात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेवर जबाबदारी सोपवली आहे. उत्तम प्रकारे प्रशिक्षण देण्यासाठी खाजगी संस्थांचा देखील हातभार घेतला जाणार असून, मुलींना स्वसंरक्षणाबरोबरच मार्शल आर्ट, योग, बौद्धीक कौशल्य, सैनिकी शिक्षण देण्याचा मानस आहे. हल्ली शालेय विद्यार्थिनींवर अन्याय होण्याचे प्रकार वाढत असून, यातून मुलीच स्वतःचे स्वसंरक्षण कशा करतील, यावर भर दिला जाणार आहे. सध्या शालेय मुली देखील सक्षम होण्यास तयार असून, त्यांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन, प्रशिक्षण दिले तर त्यान निर्भयपणे वावरतील, असा शालेय शिक्षण विभागाचा विश्र्वास आहे.

### लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा !

## सर्वोत्कृष्ट पहिल्या पाच जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये लातूरचा समावेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई–गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद (क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया) मार्फत करण्यात आले. या अंतर्गत राज्यातील सर्वोत्कृष्ट पाच जिल्हाधिकारी कार्यालयांची नावे राज्य शासनामार्फत प्रजासत्ताक दिनी जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाचाही समावेश असून यानिमित्ताने लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मनाचा तुरा रोवला गेला आहे. पालकमंत्री



शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या नेतृत्वात लातूर जिल्हा प्रशासनाने राबविलेल्या उपक्रमांची यानिमित्ताने राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील प्रशासनिक कार्यालयांसाठी १५० दिवसांच्या ई–गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम जाहीर केला होता. यामध्ये प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान, तंत्रज्ञानाधिष्ठित व नागरिकाभिमुख करणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने १ जून २०२५ पासून या कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु केली होती. प्रामुख्याने संकेतस्थळ सुधारणा, सेवा हमी कायदा (आरटीएस), ई–ऑफिस प्रणाली, डेटा डॅशबोर्ड, व्हाटसअप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि जीआयएस व रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर आदी बाबींचा समावेश होता.

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या इंडिया गेट प्रतिकृतीने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या सामाजिक शास्त्र विभागाच्या वतीने साकारण्यात आलेल्या इंडिया गेटच्या सुंदर प्रतिकृतीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले.

लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रात आपल्या अभिनव उपक्रमांनी स्वतंत्र अस्तित्व निर्माण केलेल्या श्रीकिशन सोमाणी विद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध पथ संचलन, मानवी मनोरे, इयत्ता दहावीचा विद्यार्थी अनुराग सावंत याची योगा प्रात्यक्षिके, विद्यार्थ्यांची साहित्य कवायत, सामूहिक कवायत, देशभक्तीपर गीते अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. यावेळी संस्थेचे सदस्य तथा ज्येष्ठ उद्योजक





दिलीप माने यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ अतुल देऊळगावकर, डॉ. रमेश जाजू, रामप्रसाद राठी, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात विद्यालयाच्या राष्ट्रीय स्तरावर गेलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध संचलन आणि प्रात्यक्षिकांनी सर्वांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी प्रमुख अतिथींना मानवंदना दिली. दरवर्षी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यालयाच्या वतीने टाकाऊ वस्तूंपासून देशभक्तीपर प्रेरणादायी प्रतिकृती तयार करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाते. यावर्षी सामाजिक शास्त्र विभागाच्या शिक्षकांनी अत्यंत सुंदर अशी इंडिया गेटची आकर्षक प्रतिकृती तयार केली होती. या प्रतिकृतीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतना सारडा यांनीही यावेळी या प्रतिकृतीचे निरीक्षण करून सामाजिक शास्त्र विभागाच्या संबंधित शिक्षकांचे कौतुक केले.

प्रमुख अतिथी दिलीप माने यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रजासत्ताक दिनाचे महत्व सोप्या शब्दात विशद केले. भारतीय राज्यघटनेने प्रदान केलेल्या अधिकारांचीही त्यांनी विद्यार्थ्यांना अतिशय सोप्या शब्दात माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या पथसंचलनाने आपण प्रभावित झाल्याचे सांगून विद्यार्थ्यांना सर्वंकष शिक्षण देण्याचे काम श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या माध्यमातून केले जात असल्याचे संगितले. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर अभ्यासाव्यतिरिक्त करणे घातक असल्याचेही त्यांनी यावेळी बोलून दाखविले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांच्यासह सर्व शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### घर नसलेल्यांना कबाले देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** शहरात खाजगी व शासकीय जागेत झोपड्या घालून राहिलेल्या लोकांना कबाले देऊन घरकूल योजना राबवावी, अशी मागणी तालुक्यातील सलगरा (बु.) येथील बालाजी संस्थेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. लातूर शहरातील विलास नगर, यशवंत शाळेच्या बाजूस, समता नगर, बुद्ध गार्डनच्या भोवती श्रमिक लोकांची वस्ती आहे. शहरात गोरगरीब नागरिकांना घरे नाहीत, त्यांना किमान हक्काचे कबाले दिले तर त्यांच्या घरांचा प्रश्न मिटेल. महसूल प्रशासन व महानगरपालिकेने सर्व्हे करुन गोरगरीब, मजूर लोकांना हक्काचे कबाले द्यावेत. या गरजू लोकांना कबाले द्यावेत. बऱ्याच लोकांना इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकूल योजनेचा लाभ मिळत नाही. अशा लोकांना जिल्हाधिकाऱ्यांनी शहरात कबाले देण्याची सोय करावी, अशी मागणी संस्थेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

## वाहतुकीचे नियम युवकांनी अंमलात आणावेत : सोनटक्के

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** वाहतुकीचे नियम सर्वांनी मिळून पाळणे आवश्यक असून, युवकांनी जोश व जल्लोषात वाहने चालू नये. रस्त्यावर घडणाऱ्या दुर्घटना टाळणे आवश्यक असून, बेफिकीर राहणे, मोबाईलवर बोलत वाहन चालवणे, अति वेगाने वाहन पळवणे, हेल्मेट न वापरणे, लायसन नसतांना गाडी चालवणे, सिग्नल पाहून वाहन चालवणे, जास्तीचे प्रवासी सोबत घेऊन नियमबाह्य वर्तणूक करणे ही काळजी घेण्याबरोबर आपली गाडी व्यवस्थित ठेवणे. नेहमीच सर्व्हिसिंग करणे जागरूक असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रादेशिक परिवहन मं–डळ कार्यालयाचे अधिकारी शिवाजी सोनटक्के यांनी केले.

येथील श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालयातील राज्यशास्र विभागाच्या वतीने आयोजित 'रस्ता सुरक्षा अभियान २०२६', सडक सुरक्षा व जीवन रक्षा या विषयावर शिवाजी सोनटक्के बोलत होते. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. वेदप्रकाश मलवाडे हे होते. यावेळी अभिजीत टिळे, डॉ. यु. टी. गायकवाड, प्रा. अनिता गायकवाड व राज्यशास्त्र विभाग प्रमुख व या स्पर्धेचे संयोजक प्रा. डॉ. शिवाजी मोहाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी रस्ता वाहतूक सुरक्षिततेसाठी आवश्यक तो शपथविधी समारंभघेण्यात आला. यावेळी अभिजीत टिळे यांनी युवकांना शपथ देऊन देवदूत ही संकल्पना सांगितली. देवदूत म्हणजे अपघाता प्रसंगी धावत जाऊन मदत करतो त्यांना देवदूत मानले जाते. अशा व्यक्तींचा सत्कारही परिवहन महामंडळ करते ही माहिती दिली. प्रा. डॉ. वेदप्रकाश मलवाडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रास्ताविक प्रा. डॉ. शिवाजी मोहाळे यांनी केले.

## सिध्देश्वर यात्रा महोत्सवाची गौरवशाली परंपरा वृंध्दिगत करावी

### पूर्वतयारी आढावा बैठकीत ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. गेल्या ७२ वर्षापासून हा यात्रा महोत्सव आयोजित करण्यात येत असून या वर्षी महोत्सवाचे ७३ वे वर्ष आहे. गत ७२ वर्षापासून सुरु असलेल्या या महोत्सवाला गौरवशाली परंपरा असून ही परंपरा अधिकाधिक वृंध्दिगत करावी, असे आवाहन देवस्थान समितीचे ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी केले.

श्री सिध्देश्वर देवस्थान परिसरात यात्रा महोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती. यावेळी ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे बोलत होते. या प्रसंगी विश्वस्त अशोक भोसले, रमेश बिसेन, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, बाबासाहेब कोरे, व्यंकटेश हालिंगे यांच्यासह प्रतिष्ठीत नागरिक व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर परजिल्ह्यासह कर्नाटक राज्यात श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सव पोहचला असल्याचे सांगून या यात्रा महोत्सवाला हजारो भाविकांसह नागरीकांचा मोठा सहभाग नोंदवला जात असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी स्पष्ट केले. ७२ वर्षापासून सदर यात्रा महोत्सव भरविण्यात येत असून यात्रा महोत्सवाला यशस्वी करण्यासाठी लातूरसह परिसरातील



अनेक शिवभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते आपले योगदान देतात. त्याच बरोबर विश्वस्तही तितक्याच ताकदीने या सर्वांच्या पाठिशी उभे राहून यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी ताकद देत असतात. या महोत्सवाला सिध्देश्वर महाराजांच्या आशिर्वादाने व सर्वांच्या सहकार्याने गौरवशाली परंपरा लाभलेली असून ही परंपरा वृंध्दीगत करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी सांगितले.यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी विविध समित्या गठीत होत असून या समितीतील प्रत्येक सदस्यांनी योगदान द्यावे, असे आवाहन ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी केले.

यात्रा महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी या बैठकीत विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून यामध्ये झेंडा मिरवणूक, यात्रा स्टॉल, पशु व कृषी प्रदर्शन, कुस्ती, भोजन, भजन व किर्तन, अभिषेक, संरक्षक, स्वयंसेवक, विद्यूत व पाणी पुरवठा, प्रसाद वाटप, पास दर्शन, रुद्राभिषेक व महिला स्पर्धा, रचना व सजावट आणि प्रसिध्दी समितीचा समावेश आहे. या समितीच्या माध्यमातून यात्रा महोत्सव यशस्वी करून महोत्सवाची गौरवशाली परंपरा जोपासली जाईल, असा विश्वास या समितीचे प्रमुख व समिती सदस्यांनी व्यक्त केला आहे.

## महाराष्ट्रात बिहार भवन नको, मुंबईत महाराष्ट्र भवन उभारावे

### व्ही. एस. पँथर संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ जानेवारी :** महाराष्ट्रात बिहार भवन बांधण्याऐवजी मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारण्यात यावे, अशी मागणी व्ही. एस. पँथर संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या सूचनेनुसार जिल्हा शाखेच्या वतीने, जिल्हाध्यक्ष शरद किनीकर यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातून उपचारासाठी तसेच विविध प्रशासकीय कामांसाठी मुंबई येथे येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. निवासव्यवस्थेअभावी सर्वसामान्य नागरिकांना खासगी लॉज व हॉटेलमध्ये महागड्या दराने थांबावे लागते. त्यामुळे मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारल्यास राज्यातील नागरिकांना सवलतीच्या दरात निवासाची सुविधा उपलब्ध होईल. महाराष्ट्र शासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारावे, अन्यथा व्ही. एस. पँथर्स संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष शरद किनीकर, विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रितम दंडे, कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे, विद्यार्थी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सूरज कांबळे, महादेव कांबळे, शहर सचिव रोहित दंडे, शहर संघटक रितेश जांभळे, शहर सदस्य सुदर्शन ओव्हाळ यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जि.प.- पं.स. निवडणूका विकासाच्या मुद्यावर जिंकणार : निलंगेकर

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. २७ जानेवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका भावनिक नव्हे तर भाजपने गेल्या पाच वर्षांत लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात केलेल्या ठोस विकास कामांच्या आधारे लढवित आहे. मतदार २५ वर्षातील काँग्रेसच्या भ्रष्ट कारभारापेक्षा भारतीय जनता पार्टीच्या पारदर्शक विकास कामाला साथ देणार असल्याने भाजपा महायुती या निवडणूका जिंकणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी निलंगा येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना केले.

यावेळी युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, बाजार समितीचे सभापती शिवकुमार चिंचनसुरे, चेअरमन दगडू सोळुंके, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, संजय दोरवे, शेषराव ममाळे, मनोज पाटील, शाहूराज थेटे, हरिभाऊ सगरे आदी उपस्थित होते. लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक निवडणूका विकासाच्या मुद्द्यावर झाल्या पाहिजेत, असा उल्लेख करत आ. संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजप जनतेसमोर विकासकामांचा लेखाजोखा मांडून मते मागणार आहे.

आम्ही नगरपालिका व महानगरपालिका निवडणुका विकासाच्या मुद्द्यावर लढलो. मात्र काँग्रेस भावनिक मुद्दे उपस्थित करून जनतेची दिशाभूल करीत आहे.

जागरूक मतदाराने काँग्रेसने २५ वर्षांत काय विकास केला आणि आम्ही मागील पाच वर्षांत कोणती विकासकामे केली याची तुलना केली पाहिजे.



लातूर जिल्हा परिषदेत भाजपची सत्ता असताना जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून या भागातील भूजल पातळी वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आले. ही योजना ग्रामीण भागातील जनतेसाठी वरदान ठरली आहे. तसेच घरकुल योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. ३ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना विहिरीसाठी अनुदान देण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यात राज्य शासन व केंद्र शासनाच्या निधीतून रस्त्यांचे मोठे जाळे उभारण्यात आले आहे. महिलांसाठी हिरकणी कक्ष, तसेच बचत गटांचे मजबुतीकरण यासारखे अनेक विषय मागील जिल्हा परिषद सत्ताकाळात मार्गी लागले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा परिषदेमध्ये पुन्हा आपली सत्ता आली तर शेतकऱ्यांसाठी 'शेतरस्ता' मोहीम प्रभावीपणे राबवण्यात येईल व विद्यार्थी पटसंख्या अभावी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा बंद पडू देणार नाही अशी ग्वाही आमदार निलंगेकर यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात शिक्षण, आरोग्य, रस्ते व पाणी हे जनतेशी निगडित मुख्य विषय आहेत. गेल्या २५ वर्षांत काँग्रेसने शिक्षकावर शाळाबाह्य अतिरिक्त कामाचा बोजा टाकून जिल्हा परिषद शाळा बंद पाडून खासगी शिक्षण संस्थांचे जाळे वाढवले. शिक्षकांच्या बदलीच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात आले.मात्र भाजपने ऑनलाईन बदली प्रणाली राबवून शिक्षण विभाग भ्रष्टाचारमुक्त केले.गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचा दर्जा सुधारण्यात आला.

दिव्यांगांसाठी जिल्ह्यात पहिले ऑटिझम सेंटर उभारण्यात आले. तसेच साडेतीन लाख शौचालयांची उभारणी करण्यात आली असल्याची माहिती आ. संभाजी पाटील निलंगेकर दिली.

# खरोळा सेवा सहकारी संस्थेत प्रशासक नियुक्त

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि. २७ जानेवारी :** तालुक्यातील सर्वात मोठी असलेली खरोळा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था कारभारातील गंभीर अनियमितता, सहकार अधिनियमांचे उल्लंघन व कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी प्रशासकांच्या ताब्यात देण्यात आली आहे. संस्थेच्या संचालक मंडळाने वार्षिक सर्वसाधारण सभा घेताना सभासदांना सभा वेळ व ठिकाणाची पूर्वसूचना दिली नाही. तसेच वार्षिक अहवाल, आर्थिक पत्रके, अंदाजपत्रके व सभेचे विषय नमूद असलेली नोटीस सभासदांना उपलब्ध करून देण्यात आली नाही. सभेचे रेकॉर्ड बोगस दाखविल्याचा ठपकाही ठेवण्यात आला.

या बाबत संस्थेचे संचालक डॉ. महेंद्र पिंपळे, शिवराज सप्ताळ व विश्र्वस देशमुख यांनी २०२२ मध्ये सहाय्यक सहकारी संस्था निबंधकांकडे तक्रार दाखल करून संचालक मंडळ बरखास्त करण्याची मागणी केली होती. याप्रकरणी चौकशी पथकाने अहवाल सादर केला. सहायक निबंधकांनी वादी व प्रतिवादींची सुनावणी घेतली. दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी अंतिम सुनावणीत संचालक मंडळ व सचिवांनी सहकार अधिनियमांचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाले. अर्जदार डॉ. महेंद्र पिंपळे यांना वगळता उर्वरित १२ संचालकांना अपात्र ठरविण्यात आले, तर सचिवावर ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. अपात्र संचालकांना दि. २१ जानेवारी रोजी सुनावणीसाठी नोटीस देण्यात आली होती. मात्र कोणीही संचालक उपस्थित न राहिल्याने व लेखी म्हणणे सादर न केल्यामुळे रेणापूर येथील सहायक सहकारी संस्था निबंधक मनिषा जरे यांनी जिल्हा बँकेतील शाखा तपासणीस प्रमोद रघुनाथ पवार यांची प्राधिकृत अधिकारी तथा प्रशासक म्हणून नियुक्तीचे आदेश दिले आहेत.

## थोडक्यात...

### सुनेगाव शाळेत महिला मेळावा

**अहमदपूर :** अहमदपूर तालुक्यातील सुनेगावच्या (सां.) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ व महिला मेळावा घेण्यात आला. अध्यक्षस्थानी मंगल सूरनर होत्या. यावेळी गट साधन केंद्रातील साधन व्यक्ती इंदूमती जोगदंड, अंधोरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य पर्यवेक्षिका के. बी. चव्हाण, आरोग्य सेविका आर. एल. मंदेवाड, कांता ढवळे, सुभद्रा पोले, गंगाबाई वडेर, सारिका सूरनर, मीना तुरेवाले, कुसूम सूरनर, आशा अंजली ढवळे, गंगासागर सूरनर उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.सूत्रसंचालन मुख्याध्यापक प्रकाश भालेराव यांनी केले. आभार सहशिक्षिका शालिनी गुंजरगे यांनी मानले. यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक प्रकाश भालेराव, अंगणवाडी कार्यकर्ती वैष्णवी सूरनर, मदतनीस शीतल सूरनर, पवन सूरनर यांनी परिश्रम घेतले.

### निवडणुका, परीक्षा एकत्र आल्याने शिक्षकांची कसरत

**लातूर :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि दहावी, बारावीच्या परीक्षा जवळ आल्याने शिक्षकांची मोठी कसरत होत आहे. निवडणूक कामासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाल्याने शाळेत कधी शिकवावे, बारावीच्या प्रॅक्टीकल व प्रात्यक्षिक परीक्षा कधी घ्याव्यात, असा प्रश्र्न शिक्षक करीत आहेत.

येत्या सात फेब्रुवारीपर्यंत निवडणुकीची धांदल असणार आहे. शुक्रवारी (दि. २३) बारावीच्या प्रॅक्टिकल परीक्षा होत्या. त्यानंतर प्रात्यक्षिक परीक्षा आहेत. तसेच येत्या १० फेब्रुवारी २०२६ पासून इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा सुरू होत आहेत. पुढे २१ फेब्रुवारी २०२६ पासून इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षा सुरू होत रणधुमाळी मिनी मंत्रालयाची प्रवेश उशिरापर्यंत झाले आहेत. त्यामुळे शिक्षकांवर निवडणूक आणि परीक्षा, अशा दोन्ही पातळ्यावर काम पाहावे लागत असल्याने त्यांची मोठी कसरत होत असल्याची चर्चा शिक्षकांत आहे. फेब्रुवारी महिन्यापासून परीक्षा सुरू होतात. त्या पुढे मे महिन्यापर्यंत चालतात. यावर्षी अकरावी असल्याने अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांच्या परीक्षा कधी आयोजित करायच्या याबाबतचा तिढा अजून कायम आहे.यावर शालेय शिक्षण विभागाने फारसे सूतोवाच केलेले नाही. मात्र, यावर काही तरी लवकरात लवकर निर्णय घेऊन पुढच्या वर्षी शैक्षणिक वर्ष मागे-पुढे होणार नाही, याची काळजी घ्यावी लागणार आहे.

# महात्मा फुले महाविद्यालयात प्रजासत्ताकदिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**किनगाव, दि. २७ जानेवारी :** श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले वरिष्ठ महाविद्यालयात ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय ध्वजाचा ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला.

या ध्वजारोहण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिन प्राचार्य कॅप्टन डॉ बबनराव बोडके होते तर प्रमुख पाहुणे छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रामजी बोडके, सहसचिव लताताई मोरे, सामाजिक कार्यकर्ते सुभाष चाटे उपप्राचार्य डॉ विठ्ठल चव्हाण मुख्याध्यापक डॉ संतोष पवार, पर्यवेक्षक प्रा विष्णू पवार यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी रामजी बोडके यांच्या शुभहस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष रामजी बोडके यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण झाले राष्ट्रगीता नंतर संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन प्रा विष्णू पवार यांनी केले यानंतर वरिष्ठ महाविद्यालयाच्या आणि आदर्श सेमी इंग्लीश स्कूल च्या बाल चिमुकल्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

यावेळी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त समर्पक मनोगत डॉ प्राचार्य डॉ बबनराव बोडके यांनी व्यक्त करून सम्यक शुभेच्छा दिल्या यावेळी अंतर्गत मुल्यमापण कक्षाचे समन्वयक डॉ अनंत सोमवंशी, प्रा बालाजी आचार्य, डॉ भारत भदाडे, डॉ बळीराम पवार,डॉ संजय जगताप, डॉ पांडुरंग कांबळे, डॉ प्रभाकर स्वामी, डॉ सदाशिव वरवटे, डॉ दर्शना कानवटे, प्रा पद्मजा हगदळे, प्रा अंकिता जाधव प्रा कृष्णा केंद्रे, प्रा सुमेध जोगदंड,प्रा दयानंद सुर्यवंशी, प्रा निलेश पिटले, प्रा डॉ अंबादास मुळे,प्रा चंद्रमणी बनसोडे,प्रा लक्ष्मण क्षिरसागर, प्रा अभय गोरटे, प्रा राजु गुट्टे, कार्यालयीन अध्यक्ष गोपाळ इंद्राळे, उध्दवराव जाधव, आदि प्राध्यापक वृंद, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उमेश जाधव ज्ञानेश्वर खिडसे, श्रावण नवरखेले, अभिषेक भदाडे,पालक, नामदेवराव कांबळे मानसपूरीकर जगदिश वाघमारे, भगवान पेंडकर, अमोल भंडारपे, मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते ध्वजारोहन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ विरनाथ हुमनाबादे, यांनी केले तर शेवटी आभार प्रा दिलीप कांबळे यांनी मानले.

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त अहमदपूर प्रशासनाची विवाह सोहळ्यात जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि. २७ जानेवारी :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी अहमदपूर प्रशासनाच्या वतीने स्वीप पथकाद्वारे विविध ठिकाणी जनजागृती करण्यात येत आहे. राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून येथील एका विवाह सोहळ्यात नव वरवधूंनी केली मतदार जनजागृती.

अहमदपूर शहरातील लातूर रोड वरील माधव मंगल कार्यालयात २५ जानेवारी रोजी एका विवाह सोहळा कार्यक्रमात विवाह संपन्न झाल्यानंतर नववधू व वरांनी मतदान करण्याची शपथ घेऊन मंडपातील सर्व नातेवाईकांना येणाऱ्या ५ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत शंभर टक्के योगदान द्यावे असे नव वधू व वर यांच्या वतीने आवाहन करण्यात आले.

मंडपातील सर्व वऱ्हाडी मंडळींना स्वीप कलापथकाच्या वतीने येणाऱ्या ५ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीत आपल्या गावात १००% मतदान करुन या राष्ट्रीय कार्यात आपले योगदान द्यावे. असे पथकाच्या वतीने आव्हान करण्यात आले. सदरील अभियानांसाठी निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे,अहमदपूर चे तहसीलदार उज्वला पांगरकर, गटशिक्षणाधिकारी रामलिंग काळे यांच्या आदेशानुसार अहमदपूर तालुक्यात स्वीप पथकाच्या माध्यमातून जनजागृती यशस्वी होण्यासाठी स्वीप पथक प्रमुख महादेव खळुरे,मोहन तेलंग,शिवकुमार गुळवे, बसवेश्र्वर थोटे, रमेश भालेराव आदिंनी परिश्रम घेतले.

# सांगोला येथे शवपेटीचे लोकार्पण

## रोटरी क्लब उदगीर व रोटरी क्लब सांगोलाचा संयुक्त उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २७ जानेवारी :** रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल व रोटरी क्लब सांगोला यांच्या संयुक्त विद्यमानाने व आपुलकी प्रतिष्ठान सांगोला, संघर्ष मित्र मंडळ उदगीर आणि श्री नवयुवक व्यापारी गणेश मंडळ उदगीर यांच्या सहयोगातून सांगोला जि. सोलापूर येथे सुरु करण्यात आलेल्या शवपेटीचे सांगोलाचे नगराध्यक्ष आनंदा माने यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष प्रशांत मांगुळकर यांच्या कल्पनेतून कै. राजकुमार भालचंद्र गाडे यांच्या स्मरणार्थ या शवपेटीची सोय करण्यात आली आहे. सांगोल्याचे नगराध्यक्ष आनंदा माने यांच्या हस्ते या शवपेटीचे लोकार्पण करण्यात आले.

सांगोला येथील वैकुंठ स्मशानभूमीत झालेल्या या लोकार्पण कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष प्रशांत मांगुळकर, सचिव विक्रम हलकीकर, संतोष फुलारी, विजयकुमार पारसेवार, गजानन चिद्रेवार, गोपाळ मुक्कावार, श्री नवयुवक व्यापारी गणेश मंडळाचे अध्यक्ष रामदास जळकोटे, मिलिंद मुक्कावार, राहुल मुचेवाड, मल्लिकार्जुन चिल्लरगे, श्रीनिवास चंडेगावे, उदय धुर्वे, संघर्ष मित्र मंडळाचे अध्यक्ष अनिल मेंगा, विजय ढोबळे, महेश गुरमे आदींसह आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, रमेशअण्णा देशपांडे, महादेव दिवटे, दत्तात्रय खटकाळे, अतुल वाघमोडे, अच्युत फुले, अब्दुल गनी सय्यद सर, रो. हमीद शेख, रो. माणिक भोसले, प्रदीप गाडे, कपिल गाडे, प्रवीण आरबळी, चंद्रशेखर हिरेमठ, संग्रामसिंह गायकवाड, उमेश व्हटे, प्रतीक गाडे, विक्रम अडसूळ आदी उपस्थित होते.

# विषय समित्यांच्या सभापतींची निवड

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २७ जानेवारी :** नगरपरिषद सभागृहात विशेष सभेत न. प. विषय समित्यांच्या सभापती विशेष स्थायी समिती सदस्यांची निवड करण्यात आली.

यावेळी अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष स्वाती हुडे होत्या. तर पिठासन अधिकारी म्हणून तहसीलदार राम बोरगावकर यांनी काम पाहिले. त्यांना मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांनी सहकार्य केले. नगराध्यक्ष हे स्थायी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. तर स्थायी समितीमध्ये सदस्य राजेश्वर निटुरे व गंगाबाई गुरुनाथ कपाळे यांची निवड करण्यात आली.तर शिक्षण क्रीडा व सांस्कृतिक कार्य समितीच्या सभापतीपदी न. प. उपाध्यक्ष शितल नरसिंग शिंदे, सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापतीपदी राजकुमार श्रीपती भालेराव, स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य समितीचे सभापतीपदी राजकुमार सभापतीपदी सय्यद रेश्मा खतीजा इमरोज, नियोजन व विकास समिती सभापतीपदी शहाजी भगवानराव पाटील आणि महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी खुर्शिदबी हनिफसाब सय्यद यांची निवड झाली आहे.

# माजी आमदार दिनकरराव माने यांचा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपा प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि. २७ जानेवारी :** औसा विधानसभा मतदारसंघाचे दहा वर्षे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ नेते, माजी आमदार दिनकरराव माने यांनी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यासमवेत मुंबई येथे सोमवार दि. २६ रोजी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्यामुळे औसा विधानसभा मतदारसंघात उबाठा शिवसेनेला मोठे खिंडार पडले आहे.

मुंबई येथे झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यास लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील व आमदार अभिमन्यू पवार यांची उपस्थिती होती.यावेळी भाजपात प्रवेश केलेल्या मान्यवरांचे भाजपा परिवारात स्वागत करण्यात आले. शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष सूर्यवंशी, तालुका प्रमुख आबासाहेब पवार, तालुका संघटक श्रीराम पवार यांच्यासह अनेक आजी-माजी सरपंच, चेअरमन, संचालक, ग्रामपंचायत सदस्य व विविध पदाधिकारी यांनीही भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. तसेच लातूर जिल्हा परिषदचे माजी बांधकाम सभापती व काँग्रेसचे पदाधिकारी अमरसिंह भोसले मातोळा यांनीही आपल्या अनेक सहकाऱ्यांसह भाजपा प्रवेश करून संघटन बळकट केले. या सर्व नवप्रवेशितांचे पक्षाच्या वतीने मनःपूर्वक स्वागत करण्यात आले.

औसा विधानसभा मतदारसंघाच्या दृष्टीने पक्षप्रवेश दूरगामी परिणाम करणारा असून, मतदारसंघाला राजकीय स्थैर्य देणारा ठरणार आहे. कुठल्याही भागाची राजकीय परिस्थिती जितकी स्थिर असते, तितक्याच वेगाने विकासाची चक्रे फिरू लागतात. त्या दृष्टीने पक्षप्रवेश औसा मतदारसंघाच्या विकासरथाला अधिक गती मिळेल असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी यावेळी व्यक्त केला आहे.

# भाषण कलेमुळे वाणी समृद्ध होते-नगराध्यक्षा स्वाती हुडे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २७ जानेवारी :** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात स्व.लालबहादूर शास्त्री यांच्या स्मरणार्थ ४६ व्या मराठवाडा आंतरशालेय वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्षा स्वातीताई हुडे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर प्रकाश यरमें प्रमुख उपस्थिती नगराध्यक्षा स्वाती हुडे उपनगराध्यक्षा शीतल शिंदे, शंकरराव लासूणे मधुकरराव वट्टमवार, , व्यंकटराव गुरमे, अंजलीताई नळगिरकर,ड शिवाजी बिराजदार, षण्मुखानंद मठपती मुख्याध्यापक संजय कुलकर्णी ज्ञानेश मातेकर, अंकुश मिरगुडे, श्रीपाद सिमंतकर उपस्थित होते.



कार्यक्रमाचे उद्धाटक स्वातीताई हुडे यांनी वक्तृत्व ही एक कला आहे त्यामुळे वाणी समृद्ध होत जाते. म्हणून शाळा सोडून जाताना फक्त प्रगतीपत्रकच घेऊन न जाता संस्कार व संस्कृतीची जोपासना करणारे गुण घेऊन जावे असा विद्यार्थ्यांना सल्ला दिला.

अध्यक्षीय समारोपात डॉ. प्रकाश येरमे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्पर्धक विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा.डॉ.बालाजी भंडारे, प्रा.डॉ. नयन राजमाने, डॉ. व्हि.के. नारायण लाभले आहेत.

उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन राहुल नेटके संतोष गजलवार प्रास्ताविक शंकरराव लासुणे स्वागत व परिचय निलेश मांडवकर, वैयक्तिक गीत बालाजी पडलवार तर आभार ज्ञानेश मातेकर यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता किरण नेमट यांच्या कल्याण मंत्राने झाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, स्पर्धा प्रमुख अनिता मुळखेडे, सहप्रमुख राहुल नेटके सह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आरोग्य सेविका आशा बिरादार यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि. २७ जानेवारी :** दैठणा येथील आशा आरोग्य सेविका. आशा सतीश बिरादार यांचे दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ठीक ८ वाजता अल्पशा आजाराने आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर अंत्यसंस्कार दुपारी तीन वाजता पारंपरिक समशानभूमीत करण्यात आले



त्यांच्या पश्चात श्री. सतीश बिरादार तसेच तीन मुले गणेश, महेश व दिनेश असा परिवार आहे. सौ. आशा बिरादार या स्वभावाने अत्यंत मनमिळावू, कर्तव्यदक्ष व सेवाभावी होत्या. दैठणा गावातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी स्वतःहून पुढाकार घेतला होता. त्यांच्या कार्यामुळे त्या दैठणा ग्रामस्थांमध्ये विशेष आदराचे स्थान मिळवून होत्या. त्यांच्या आकस्मिक निधनाने दैठणा गावावर शोककळा पसरली असून, आरोग्य क्षेत्रात अपूरणीय अशी हानी झाली आहे.

# घोणसी येथील पहिला आठवडी बैल बाजार जनावरांनी गजबजला

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि. २७ जानेवारी :** जळकोट तालुक्यातील घोणसी येथे पहिल्या आठवडी बैल बाजाराची अधिकृत सुरुवात उत्साहात झाली. या पहिल्याच बाजारात जनावरांची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने संपूर्ण बाजार परिसर गजबजून गेला होता.

या बाजाराचे उद्घाटन गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी उपस्थित व्यापाऱ्यांचा बाजार समिती घोणसी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. घोणसी परिसरातील सुमारे ३० ते ४० गावांतील शेतकरी व व्यापारी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून या बाजारात सहभागी झाले. होते. पहिल्या आठवडी बाजारासाठी बैल, गाय, म्हैस, घोडे, रेडे, शेळ्या, कोंबड्या आदी जनावरे विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात आणण्यात आली होती.

या पहिल्या बाजारात माधव कृष्णापुरे (शेतकरी) यांनी बैलाची पहिली विक्री केली, तर सूरज सूर्यवंशी (मंगरुळ) यांनी पहिली खरेदी करत बाजाराचे पहिले मानकरी ठरले. विशेष म्हणजे पहिल्याच बाजारात सुमारे १०० बैलजोड्यांची खरेदी-विक्री यशस्वीरीत्या पार पडली. घोणसी परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या बाजाराचा लाभ घेतला.

या बाजाराच्या यशस्वितेसाठी सरपंच शरद कोकणे, विजयकुमार भोसले, चेअरमन भानुदास मालुसरे, पत्रकार अंबादास गणुचे, विठ्ठल धोंड, पोलीस पाटील सोमेश्र्वर परगे, तंटामुक्त अध्यक्ष दत्त बिरादार तसेच सेवानिवृत्त पोलीस वाबुराव देवकत्ते, बबन मालुसरे, राहुल मालुसरे, आनंद बिरादार, राहुल बिरादार, संभाजी आंब्रे, प्रभाकर गणुचे, दयानंद जानतीने, अविनाश आंब्रे, गणेश गोदाजी, विशाल मालुसरे, मनोज मालुसरे, अनिल गव्हाणे, बालाजी जानतीने, पद्माकर भोसले, परमेश्वर डावळे, साईनाथ जानतीने, कालीदास डावळे आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बारुळ येथील श्री बाळेश्वर विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२७ जानेवारी -**
शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित श्री बाळेश्वर विद्यालय, बारुळ (ता. तुळजापूर) येथे आज भारतीय प्रजासत्ताक दिन हा राष्ट्रीय उत्सव म्हणून अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळी ७.३० वाजता राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मुख्याध्यापक मंगेश अणदूरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला सलामी देत सामूहिक राष्ट्रगीत, राज्यगीत, ध्वजप्रशंसा गीत व देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. ध्वजारोहणानंतर संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले तसेच असाक्षर लोकांना साक्षर करण्याची शपथ उपस्थितांनी घेतली. या कार्यक्रमास सरपंच सिंधु सुपणार, उपसरपंच सगट, हमीदबी शेख, दत्तात्रय सगर, सुरज धनवडे, शिवाजी क्षीरसागर, बाबुराव आप्पा ठोंबरे, शहाजी सुपणार, सुरेश ठोंबरे, जयप्रकाश वट्टे, कोमल ठोंबरे, युवक मित्र, विद्यालयाचे माजी विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# संविधानिक मूल्यांचे पालन करून राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे : पालकमंत्री प्रताप सरनाईक






**७७ व्या प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा... ३ हजार विद्यार्थ्यांची देशभक्ती गीतांवर सामूहिक कवायत...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**
देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांना अभिवादन करत पालकमंत्री सरनाईक यांनी जिल्ह्यातील नागरिकांना शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या प्रेरणेतून प्रेरित होऊन असंख्य वीरांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला.अपार यातना सहन करत त्यांनी देशासाठी प्राणांची आहुती दिली. या सर्व थोर स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान भारताच्या स्वातंत्र्य व प्रजासत्ताक व्यवस्थेचा पाया असल्याचे त्यांनी सांगितले.

आज पोलीस कवायत मैदान क्र.२ येथे ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे मुख्य शासकीय ध्वजारोहण केल्यानंतर उपस्थिताना संबोधित करताना सरनाईक बोलत होते. यावेळी स्वातंत्र्य सैनिक बुबासाहेब जाधव, भास्करराव नायगावकर, नामदेव माने, श्रीपती जावळे ,बाबुराव तवले, शेषराव बनसोडे, कलावती उंबरे, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना व निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली भारतीय राज्यघटना ही देशाला मिळालेली सर्वात मौल्यवान देणगी असून २६ जानेवारी १९५० रोजी स्वीकारलेली ही राज्यघटना कोट्यवधी नागरिकांच्या स्वप्नांचे व आत्मसन्मानाचे प्रतिबिंब आहे, असे सांगून पालकमंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, या राज्यघटनेमुळे भारत सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष व लोकशाही प्रजासत्ताक म्हणून जगात ओळखला जात असून स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व सामाजिक न्याय या मूल्यांवर देशाची उभारणी झाली आहे. जात, धर्म, लिंग वा भाषा यांचा भेद न करता प्रत्येक नागरिकाला सन्मानाने व सुरक्षिततेने जगण्याचा अधिकार राज्यघटनेने दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

सरनाईक पुढे म्हणाले की, राज्य सरकार मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली सर्वसमावेशक विकास, सामाजिक न्याय व सुशासन या त्रिसूत्रीवर कार्यरत असून राज्य प्रगतीपथावर आहे. आजच्या प्रजासत्ताक दिनी प्रत्येक नागरिकाने संविधानिक मूल्यांचे पालन करण्याची, राष्ट्रीय एकात्मता जपण्याची व आपली कर्तव्ये निष्ठेने पार पाडण्याची शपथ घ्यावी.

भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, पर्यावरण संवर्धन, सामाजिक सलोखा व राष्ट्रप्रेम हीच उज्ज्वल भविष्यासाठी खरी ताकद असून जिल्ह्याच्या विकासासाठी अहोरात्र परिश्रम करणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचारी व सजग नागरिकांचे त्यांनी अभिनंदन केले.

प्रारंभी पालकमंत्री सरनाईक यांनी राष्ट्रध्वजारोहण करून ध्वजाला मानवंदना दिली.

यावेळी पोलीस बँड पथकाने राष्ट्रगीत व राज्य गीत सादर करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

पालकमंत्री सरनाईक यांनी परेडचे निरीक्षण केले. पोलीस परेडचे संचलन भारतीय पोलीस सेवेतील परिविक्षाधीन अधिकारी मेघना आर्यन यांनी केले. परेडमध्ये पोलीस पुरुष- महिला, गृह रक्षक दल, एनसीसी, पोलीस बँड पथक, तुळजापूर सैनिक स्कूलचे विविध शाळांचे एनसीसी पथक तसेच स्काऊट गाईडचे पथक सहभागी झाले होते. यावेळी पोलिसांचे वज्र, शीघ्र कृती दल, श्वान कॅन्टन, बेवारस वस्तूपासून सावधान, दंगल नियंत्रण पथक,आपत्ती व्यवस्थापन दलाचा चित्ररथ,वन विभाग,कृषी विभाग,१०८ रुग्णवाहिका, अग्निशमन दल चित्ररथाच्या माध्यमातून सहभागी होते.

शालेय शिक्षण विभागाने पुढाकार घेऊन शहरातील विविध शाळांच्या ३००० विद्यार्थ्यांनी देशभक्तीवरील गीतांवर सामूहिक कवायत सादर केली. तसेच पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी लेझीम कवायत सादर केली.

## संक्षिप्त वृत्त...



### जयप्रकाश विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**
येथील जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ७.४५ वाजता प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर हैदराबाद मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मारकाचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत गात व घोषणा देत गावातून प्रभात फेरी काढली. या कार्यक्रमास डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, काकासाहेब डोंगरे यांच्यासह शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. प्रशांत कोळगे यांनी केले.



### श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानात ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा

**तुळजापूर, दि.२७ जानेवारी -**
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर येथे भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी तहसीलदार तथा मंदिर संस्थानच्या व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत अभिवादन केले. या कार्यक्रमास लेखाधिकारी संतोष भेंकी, सहायक पोलिस निरीक्षक अर्जुन चौधर, सहायक व्यवस्थापक (स्थापत्य) राजकुमार भोसले, प्रवीण अमृतराव, सहायक व्यवस्थापक (विद्युत) अनिल चव्हाण, सहायक व्यवस्थापक अनुप ढमाले, रामेश्वर वाले, अमोल भोसले, जयसिंग पाटील, नागेश शितोळे, जनसंपर्क अधिकारी अभिजीत तेरखेडकर, विश्वास सातपुते, महेंद्र आदमाने, ओंकार काटकर यांच्यासह श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### ईमामसाहेब सार्वजनिक वाचनालय येथे प्रजासत्ताक दिन साजरा

**उमरगा, दि.२७ जानेवारी -**
उमरगा तालुक्यातील पेठ सांगवी येथील ईमामसाहेब सार्वजनिक वाचनालय येथे दि.२६ जानेवारी रोजी सकाळी ७.४५ वा. मान्यवरांच्या उपस्थितीत वाचनालयाचे अध्यक्ष चाँदसाहेब पठाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी पेठ सांगवी येथील मुख्याध्यापिका कल्पना गुंजोटे, मुख्याध्यापक उध्दव कोठे, संतोष पाटील, वाचनालयाचे सचिव महेबुब पठाण, जिल्हा परिषद शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, यशवंतराव चव्हाण विद्यालयाचे शिक्षक, शिक्षिका विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धमुरे प्रतिष्ठानचे सामाजिक काम प्रेरणादाई : डॉ. दीपा कंदले

**प्रतिष्ठानच्या वतीने आशा कार्यकर्ती, बचत गट प्रमुख महिलांचा सन्मान...**



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२७ जानेवारी -**
ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्य सुदृढ राहावे यासाठी अहोरात्र प्रयत्न करणाऱ्या आशा कार्यकर्ती तसेच महिलांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडविणाऱ्या महिला बचत गट प्रमुखांचा सन्मान करून त्यांना पुढील काळात अधिक जोमाने कार्य करण्याची ऊर्जा देण्याचे कार्य कै. चंद्रकांत अण्णा धमुरे प्रतिष्ठान करत असून, हे कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ डॉ. दीपा कंदले यांनी केले.

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे कै. चंद्रकांत अण्णा धमुरे प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित आशा कार्यकर्ती व महिला बचत गट प्रमुखांच्या सन्मान सोहळ्यात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुलोचना धमुरे या होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून ललिता राक्षसे (टाटा सामाजिक संस्था, तुळजापूर), मथुराबाई मुळे, गणेश चादरे, सिद्धाराम धमुरे, करबसप्पा धमुरे उपस्थित होते. यावेळी गावाच्या सामाजिक, आरोग्य व आर्थिक उन्नतीसाठी मोलाचे कार्य करणाऱ्या आशा प्रवर्तिका अनुराधा पापडे, राजेश्री चव्हाण तसेच आशा कार्यकर्त्या आशा बोर्डे, संगीता कीरात, सुरेखा कांबळे, जयश्री तलवार, शिवकन्या घुगे, मनीषा कांबळे, चंपा सूर्यवंशी, सत्यशीला राठोड, लक्ष्मी दुपारगुडे, सुनीता मोकाशे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच महिला बचत गट प्रमुख शैलजा पाटील, मीराताई घुगे, बाबई चव्हाण, रेणुका बंदपट्टे, पूजा चिंकारे यांना शाल, भेटवस्तू व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमास उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार, अविनाश मोकाशे, महादेव स्वामी, गुणवंत मुळे, गंगाधर कबाडे, रामेश्वर कबाडे, राम भंडारकवठे, सचिन गुड्डु, श्रीकांत अणदूरकर, दयानंद काळूंके, संजीव आलुरे, सचिन तोग्गी, प्रसन्ना कंदले, मकरंद भालकरे, तसेच स्वामीज्ञा महिला मंडळाच्या महिला, आशा कार्यकर्ती, बचत गट प्रमुख, प्रतिष्ठानचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल घुगे, सन्मानपत्राचे वाचन महेश्वरी धमुरे, सूत्रसंचालन अमोल गुड्डु व श्रद्धा दुपारगुडे, तर आभार शिवशंकर तिरगुळे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शुभम धमुरे, आनंद सुरवसे, पृथ्वीराज पवार यांच्यासह प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांचा कर्मचाऱ्यांकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ जानेवारी -**
महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत घेण्यात आलेल्या पडताळणीत महाराष्ट्रातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कार्यालयांमध्ये तुळजापूर नगरपरिषद कार्यालय अव्वल ठरले आहे. या पडताळणीत तुळजापूर नगरपरिषद कार्यालयाला शंभर पैकी शंभर गुण मिळाल्याने हे कार्यालय राज्यातील सर्वोत्तम कार्यालय म्हणून गौरविण्यात आले आहे.

या उल्लेखनीय यशात कार्यालयीन प्रमुख म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारानिमित्त नगरपरिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने मुख्याधिकारी रणदिवे यांचा सत्कार करण्यात आला. या यशाबाबत बोलताना मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांनी सांगितले की, या कामगिरीमध्ये नगर प्रशासन विभाग, धाराशिवचे सहाय्यक आयुक्त त्रिंबक ढेंगळे पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. तसेच नगरपरिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सांघिक प्रयत्नांमुळेच हे यश मिळू शकले, असेही त्यांनी नमूद केले.

सत्कार कार्यक्रमावेळी दत्ता साळुंके, बापूसाहेब रोचकरी, अमर ताकमोघे, राम मोगरकर यांच्यासह नगरपरिषद कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे प्रजासत्ताक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**
पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे आज ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिके सादर करून केले.

कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुभेदार लक्ष्मण कृष्णा इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली. यावेळी उपस्थितांना राष्ट्रध्वजाला सलामी देऊन देशभक्तीपर घोषणा करण्यात आल्या.

शाळेचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे, उपप्राचार्य निलेश जाधव, व्यवस्थापकीय अधिकारी जीवन कुलकर्णी, उप व्यवस्थापकीय अधिकारी प्रदीप शिंदे, वरिष्ठ समन्वयक प्रभाकर चौधरी, कार्यक्रमाधिकारी दीपक अंकुश यांच्यासह शाळेच्या सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. शाळेचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला पालक वर्गदेखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीची जाणीव, एकात्मता व संविधानाचे महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## व्ही. पी. शैक्षणिक संकुलात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**
येथील व्ही. पी. शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजी नगर रोड येथे भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे मार्गदर्शक डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

प्रजासत्ताक दिनानिमित्त सकाळी डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत त्यांनी राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही मूल्ये आणि भारतीय संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, गीतगायन तसेच प्रेरणादायी विचार सादर करून उपस्थितांमध्ये देशप्रेमाची भावना जागवली. यावेळी संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.



या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील,

एसबीएनएम फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, आरपी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गाझी शेख, एस. पी. पॉलीटेक्निक कॉलेजचे प्राचार्य अमरसिंह कवडे, वेलनेस फिजिओथेरपी कॉलेजच्या प्राचार्य डॉ. पूजा आचार्य, बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य ऋषिकेश लोमटे, डेअरी व कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य, तसेच आयटीआय व संकुलातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रुपामाता नॅचरल शुगरच्या गाळप क्षमता विस्तारीकरणाला ऐतिहासिक यश

**शेतकरीहित, रोजगारनिर्मिती व ग्रामीण विकासाला नवी दिशा**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**
शेतकरी हा केंद्रबिंदू मानून उभारलेल्या रुपामाता उद्योग समूहातील रुपामाता नॅचरल शुगर प्रा. लि., युनिट क्रमांक-१, पाडोळी येथे गाळप क्षमता विस्तारीकरण फेज-२ हा ऐतिहासिक, दूरदृष्टीपूर्ण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा औद्योगिक टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे. हा प्रकल्प केवळ कारखान्याची क्षमता वाढवणारा नसून, शेतकरीहित, रोजगारनिर्मिती आणि स्थानिक विकासाचा ठोस आराखडा ठरला आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचे मोळीपूजन व उद्घाटन महंत योगी मावजीनाथजी महाराज (श्री तुळजाभवानी मंदिर, सिद्धगरीबनाथ मठ, तुळजापूर), हभप. ॲड. पांडुरंग लोमटे महाराज, जिल्हा परिषद धाराशिवचे माजी उपाध्यक्ष सुधाकर गुंड गुरुजी तसेच रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक ॲड. व्यंकटराव विश्वनाथ गुंड-पाटील यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.



या विस्तारीकरणामुळे कारखान्याची प्रतिदिन ८०० टन असलेली गाळप क्षमता थेट २००० टनांनी वाढून एकूण २८०० टन प्रतिदिन इतकी झाली आहे. यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस वेळेत, पूर्ण क्षमतेने व जलद गतीने गाळप होणार असून, आजवर गाळपाविना राहणाऱ्या उसाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. एकाही शेतकऱ्याचा ऊस शिल्लक राहणार नाही, असा ठाम विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना ॲड. व्यंकटराव गुंड-पाटील यांनी सांगितले, ग्रामीण भागात उद्योग उभारताना नफा नव्हे, तर शेतकरी, कामगार आणि स्थानिक युवक यांचे भविष्य केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. रुपामाता उद्योग समूहाचा प्रत्येक प्रकल्प हा सामाजिक बांधिलकीतून उभा राहिलेला आहे.

या विस्तारीकरणामुळे थेट व अप्रत्यक्ष स्वरूपात तिपटीने रोजगारनिर्मिती झाली असून, परिसरातील युवक-युवतींना स्थानिक पातळीवरच रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. परिणामी स्थलांतराला आळा बसून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली आहे.

याच कार्यक्रमात फेज-२ विस्तारीकरणासाठी मोलाचे सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

पाडोळी, मेंढा, घुगी, लासोना, समुद्रवाणी, सांगवी, कामेगाव, नितळी, टाकळी, कनगरा, धुता, येवती, एकंबीवाडी आदी गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते, ऊस उत्पादक शेतकरी व वाहतूक ठेकेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या संपूर्ण प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी कार्यकारी संचालक अड. अजित गुंड-पाटील यांच्या सक्षम नेतृत्वाखाली झाली. खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या संघभावना, शिस्तबद्ध नियोजन आणि अथक परिश्रमामुळे शेतकरीहिताचा हा महत्त्वपूर्ण औद्योगिक विस्तार प्रत्यक्षात साकार झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू शेख यांनी केले. प्रास्ताविक अमोल गुंड यांनी मांडले, तर सुरेश मनसुळे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रुपामाता उद्योग समूहातील सर्व पदाधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आत्मदहनाची धमकी देत शासकीय कामात अडथळा; महिलेविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

परंडा पोलीस ठाणे हद्दीत शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करून आत्मदहनाची धमकी दिल्याप्रकरणी एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी अनिता बाळासाहेब होरे, रा. पिंपळवाडी, ता. परंडा (ह.मु. श्रीपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर) हिने दि. २५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता परंडा पोलीस ठाण्यात आत्मदहन करण्याच्या निर्णयावर ठाम असल्याची भूमिका घेत प्रशासनास वेठीस धरल्याचा प्रकार घडला. यावेळी गट विकास अधिकारी शिंदे हे आपले शासकीय कर्तव्य बजावत असताना त्यांनी दिलेले कायदेशीर पत्र तसेच परंडा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री. चोरमले यांनी बी.एन.एस.एस. कलम १६८ अन्वये दिलेली नोटीस आरोपीने स्वीकारण्यास नकार देत त्याचा अवमान केला. आत्मदहनापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न सुरू असताना आरोपीने, मी आत्मदहन करणारच अशी धमकी देत शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

या प्रकरणी फिर्यादी सुर्यजित अरुण जगदाळे, नेमणूक पोलीस ठाणे परंडा यांनी दिलेल्या तक्रारीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### तुळजाभवानी अभियांत्रिकीचे क्रीडा क्षेत्रात उज्वल यश

**तुळजापूर, दि.२७ जानेवारी -**

श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे आयोजित विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला. या कार्यक्रमास श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या विश्वस्त तहसीलदार माया माने प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील मेहनत, शिस्त व संघभावनेचे महत्त्व सांगितले. श्री तुळजाभवानी मंदिर संस्थाचे सर्व विश्वस्त, प्राचार्य डॉ. ओमप्रकाश राजनकर, उपप्राचार्य मुदकन्ना आर.जी., प्रबंधक शिंदे दीपक, सर्व प्राध्यापक व कर्मचारीवर्गाने यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पतंगे विश्वास यांनी केले. जिमखाना प्रमुख प्रा. सगरे सचिन यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.



#### कानेगाव येथील जि.प. प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा

**लोहारा, दि.२७ जानेवारी -**

लोहारा तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक बालाजी साळुंके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी गावातील पदाधिकारी, सरपंच उपसरपंच सोसायटीचे चेअरमन, व्हा.चेअरमन, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सर्व सदस्य ग्रा.पं.चे सदस्य, माजी सैनिक, सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षण प्रेमी नागरिक, पालक, युवक उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी संगीतमय कवायत व लेझीमचे उत्कृष्ट सादरीकरण करून दाखवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मच्छिंद्र बोकडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रवीण अगंबरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शिक्षक नानासाहेब कोळी, गजानन सुतार, श्रीशैल जट्टे, मच्छिंद्र बोकडे, प्रवीण अगंबरे, बालाजी सोमवंशी, जयशंकर जवादे, अजित बोकडे, वंदना कोसकर, मेघाराणी जवादे, संगीता सूर्यवंशी व गोविंद श्रीखंडे यांनी परिश्रम घेतले.



#### प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलिसांनी केले रक्तदान

**तुळजापूर, दि.२७ जानेवारी -**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पोलीस ठाण्यात उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश देशमुख, पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जानेवारी रोजी सोलापूर येथील सिद्धेश्वर ब्लड बँक यांच्यामार्फत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिरामध्ये सर्व पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवलेला असून त्यामध्ये पोलीस स्टेशन येथील पोलिस कर्मचारी, होमगार्ड, यांच्यासह आदिंनी रक्तदान केले.

#### प्रतिबंधित गुटखा जप्त

**धाराशिव, दि.२७ जानेवारी**

सुरतगाव येथे तामलवाडी पोलिसांनी कारवाई करत शासनाने प्रतिबंधित केलेला केसरयुक्त विमल पान मसाला जप्त केला आहे. आरोपी अजय प्रकाश कवडे याच्याकडून विक्रीसाठी बाळगलेला सुमारे २,६४० रुपये किमतीचा गुटखा पोलिसांनी दि.२६ जानेवारी रोजी जप्त केला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

## तुळजाभवानी मंदिर संस्थानला २०२५ मध्ये ५१ कोटींहून अधिक उत्पन्न

**१४ किलो सोने, २८२ किलो चांदी भाविकांकडून दान... सुविधा वाढवण्याची अपेक्षा, मात्र पुजाऱ्यांना मानधन नाही : प्रश्न ऐरणीवर...**



सोलापूर तरुण भारत विशेष...

**सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२७ जानेवारी -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या चरणी भाविकांनी २०२५ या गतवर्षात मोठ्या श्रद्धेने कोट्यवधींचे दान अर्पण केले आहे. तुळजाभवानी मंदिर संस्थानला २०२५ साली देणगी स्वरूपात व विविध बाबींमधून एकूण ५१ कोटी ९ लाख २८ हजार ५६८ रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे. याशिवाय भाविकांनी १४ हजार १४८.२२ ग्रॅम (जवळपास १४ किलो) सोने आणि २ लाख ८२ हजार ५९८.०५ ग्रॅम (सुमारे २८२ किलो) चांदी दान स्वरूपात मंदिर संस्थानकडे अर्पण केली आहे.

दरवर्षी लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी तुळजापूरला येतात. रोख रक्कम, दानपेटी, ऑनलाइन देणगी, पेड दर्शन, लाडू प्रसाद विक्री आदी माध्यमांतून मंदिर संस्थानला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते. भाविकांनी श्रद्धेने दिलेल्या या दानातून अत्याधुनिक, दर्जेदार व सर्वसामान्यांना परवडणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित असल्याची भावना भाविकांमधून व्यक्त होत आहे.

तुळजाभवानी देवीचा मोठा भक्तवर्ग हा शेतकरी, मजूर आणि गोरगरीबांचा आहे. मात्र या वर्गासाठी तुळजापूर शहरात अल्प दरात राहण्याची सोय उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती आहे. मंदिर संस्थानकडून उभारण्यात आलेल्या



भक्तनिवासांमध्येही सर्वसामान्य भाविकांना न परवडणारे दर आकारले जात असल्याचा आरोप होत आहे. याउलट व्हीआयपी आणि श्रीमंत भाविकांना प्राधान्य दिले जात असल्याची भावना भाविकांतून व्यक्त होत आहे.

इतके मोठे उत्पन्न असतानाही तुळजाभवानी मंदिरातील पुजाऱ्यांना मंदिर संस्थानकडून कोणतेही नियमित मानधन दिले जात नसल्याचा गंभीर मुद्दा पुजारी वर्गाकडून उपस्थित केला जात आहे.

देवीचा कुलधर्म, कुलाचार, अभिषेक, पूजा विधी पुजाऱ्यांमार्फतच केले जातात.

भाविक केवळ दर्शनावर न थांबता पूजा-अर्चा करण्याला प्राधान्य देतात. यासाठी पुजारी व त्यांचे कुटुंब अहोरात्र सेवा बजावत असते. पहाटेपासून नैवेद्य व भाविकांच्या जेवणाची व्यवस्था पुजाऱ्यांच्या घरातूनच केली जाते. फुल नाही, फुलाची पाकळी तरी अशा स्वरूपात तरी मंदिर संस्थानने पुजाऱ्यांना मानधन द्यावे, अशी मागणी सातत्याने होत असली तरी त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे.

कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न, सोने-चांदीचे दान मिळत असताना त्या बदल्यात भाविकांसाठी दर्जेदार, सुलभ सुविधा देणे, सर्वसामान्य भक्तांसाठी परवडणाऱ्या निवास व्यवस्था उभारणे आणि देवीसेवेत राबणाऱ्या पुजाऱ्यांना न्याय देणे, ही काळाची गरज असल्याची जोरदार मागणी भाविक, पुजारी आणि शहरवासीयांकडून होत आहे.

### २०२५ मधील मंदिर संस्थानचे रोख उत्पन्न...

**पेड दर्शन पास :** १७,५१,८५,९०० रुपये, **सिंहासन पेटी :** १२,७६,०१,६२० रुपये, **दानपेटी :** ६,९६,६०,८६० रुपये, **ऑनलाइन देणगी (ICICI) :** ४६,७५,४४,९०० रुपये, **विश्वस्त निधी उत्पन्न :** ३,७५,२९,८६१ रुपये.

**इतर बाबींसह एकूण उत्पन्न : ५१,०९,२८,५६८ रुपये**

### भक्तांकडून मिळालेले सोने...

**पावती देणगी :** ४८०१.४६ ग्रॅम, **सिंहासन पेटी :** ७२००.९१ ग्रॅम, **दानपेटी :** १५३१.१६ ग्रॅम, **इतर :** ६१४.६९ ग्रॅम,

**एकूण : १४,१४८.२२ ग्रॅम (सुमारे १४ किलो)**

### भक्तांकडून मिळालेली चांदी...

**देणगी पावती :** ८६,४७३.१० ग्रॅम, **सिंहासन पेटी :** १,३८,५९२.१३ ग्रॅम, **दानपेटी व इतर :** ५७,५३२.८२ ग्रॅम.

**एकूण : २,८२,५९८.०५ ग्रॅम (सुमारे २८२ किलो)**

### पैसे देऊनही दर्शन सुलभ होत नाही!...

तुळजाभवानी देवीच्या पेड दर्शन पासमधून मंदिर संस्थानला २०२५ साली साडे सतरा कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. मात्र पैसे देऊनही भाविकांना सुलभ दर्शन मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत. गोरगरीब भाविक रांगेत तासन्तास उभे राहतात, तर श्रीमंत व व्हीआयपी भाविक पेड दर्शनातून सहज दर्शन घेतात, असा भेदभाव होत असल्याचा आरोप केला जात आहे. गाभाऱ्यात सुरक्षारक्षकांकडून भाविकांना ओढणे, धक्काबुक्की करणे, महिला भाविकांशी अयोग्य वर्तन केल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. हा प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद होत असतानाही कारवाई होत नसल्याचा आरोप आहे. यावर उपाय म्हणून गाभाऱ्यात, व्हीआयपी गेट व पाचशे रुपयांच्या दर्शन गेटवर मंदिर प्रशासनाचे जबाबदार अधिकारी व पोलीस उपस्थित असावेत, अशी मागणी होत आहे.

## सस्पेन्स संपला : तेर गटातून अर्चनाताई पाटील लढणार!

**भाजपकडून उमेदवारी जाहीर... भावी जिल्हा परिषद अध्यक्षा म्हणून चर्चा...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**



जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तेर गटातून कोण उमेदवार असेल, याबाबत गेल्या काही दिवसांपासून मोठी राजकीय चर्चा रंगली होती.

अखेर या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून भारतीय जनता पक्षाकडून अर्चनाताई पाटील यांच्या उमेदवारीवर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी अर्चनाताई पाटील यांनी जिल्हा परिषद निवडणुकीतून माघार घेणार असल्याचे संकेत दिल्यामुळे राजकीय वर्तुळात संभ्रम निर्माण झाला होता. मात्र त्यांनी शेवटच्या क्षणी दाखल केलेल्या दोन उमेदवारी अर्जांपैकी एक अर्ज मागे घेत, तेर गटातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे तेर गटातील राजकीय समीकरणांना वेगळी दिशा मिळाल्याचे चित्र आहे.




जिल्हा परिषद अध्यक्षपद हे यंदा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाल्यामुळे अर्चनाताई पाटील यांच्याकडे संभाव्य भावी जिल्हा परिषद अध्यक्षा म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळेच त्यांच्या उमेदवारीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. भाजपकडून त्यांना निवडून आणण्यासाठी संघटनात्मक ताकद पूर्ण क्षमतेने वापरण्यात येणार असल्याचे संकेतही मिळत आहेत.

भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वानेच अर्चनाताई पाटील यांच्या उमेदवारीवर अंतिम निर्णय घेतल्यामुळे उमेदवारीवरून सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. आगामी निवडणुकीत तेर गटातील ही लढत चुरशीची ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## अवैध गांजा विरोधी कारवाईत १.८९ किलो गांजा जप्त; एकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

येरमाळा पोलीस ठाण्याच्या वतीने अवैध गांजा विरोधी कारवाई दरम्यान दि.२६ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.२० वाजता येरमाळा पोलीस ठाणे हद्दीत वाघोली ते कसबे तडवळा जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये छापा टाकण्यात आला.



या कारवाईत लोचना एकनाथ पवार (वय ६५ वर्षे), रा. वाघोली, ता. कळंब, जि. धाराशिव यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून १ किलो ८९० ग्रॅम वजनाचा गांजा सदृश अमली पदार्थ, गांजाची पाने, फुले व झाडे असा एकूण ३७,८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर आरोपी हा हा अमली पदार्थ चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःच्या कब्जात बाळगत असल्याचे आढळून आले. याप्रकरणी येरमाळा पोलीस पथकाने मुद्देमाल जप्त करून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## भरधाव चारचाकीची दुचाकीला पाठीमागून धडक; एकजण ठार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

तुळजापूर पोलीस ठाणे हद्दीत झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून दुसरा जखमी झाला आहे. या प्रकरणी चारचाकी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयताचे नाव महादेव हरीदास पुरी (वय ४५), रा. तोरंबा हराळी, ता. लोहारा, जि. धाराशिव असे आहे. जखमीचे नाव राघु पुरी, रा. कानेगाव, ता. व जि. धाराशिव असे आहे. ही घटना दि.१६ जानेवारी रोजी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास तुळजापूर-लातूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर, खंडाळा गावाच्या पुढे काही अंतरावर घडली. महादेव पुरी व राघु पुरी हे दोघे मोटारसायकल क्रमांक एमएच-१४-एफएल-८५४० वरून प्रवास करत होते. दरम्यान, चारचाकी वाहन क्रमांक एमएच१४-बीसी-८१९० चा चालक विजय यशवंत नाईक, रा. वळसंग, जि. सोलापूर यांनी आपले वाहन अतिवेगाने व निष्काळजीपणे चालवून दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात महादेव पुरी हे गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाले.

## उमरगा तालुक्यात जि.प. व पं.स. निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट...

## जि.प. ९ गटांसाठी ३१, पं.स. १८ गणांसाठी ५३ उमेदवार रिंगणात

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा दि. २७ जानेवारी हा शेवटचा दिवस होता. या दिवशी अर्ज माघारीच्या प्रक्रियेनंतर उमरगा तालुक्यातील निवडणूक रिंगणाचे अंतिम चित्र स्पष्ट झाले आहे.

तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ९ गटांसाठी एकूण ९० उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. यापैकी ५९ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतल्याने अखेर ३१ उमेदवार निवडणूक रिंगणात कायम राहिले आहेत.



त्याचप्रमाणे पंचायत समितीच्या १८ गणांसाठी एकूण १६५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. अर्ज माघारीनंतर ११२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले असून ५३ उमेदवार निवडणूक लढविणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, तालुक्यातील तुरोरी व आलूर जिल्हा परिषद गटात अपक्ष उमेदवार विशेष चर्चेचा विषय ठरत आहेत.

तुरोरी गटातून युवराज जाधव, तर आलूर गटातून आप्पासाहेब पाटील हे अपक्ष उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. विशेष म्हणजे आलूर जिल्हा परिषद गटात सख्ख्या साडू-साडूंमध्ये थेट लढत होत असल्याने ही निवडणूक अधिकच रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे या गटाकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.

अर्ज माघारीनंतर उमेदवारांची अंतिम संख्या निश्चित झाल्याने आता प्रचाराला वेग येणार असून, पुढील काही दिवसांत उमरगा तालुक्यातील निवडणूक वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## १५० दिवसांच्या विशेष कृती कार्यक्रमात धाराशिव जिल्ह्याला राज्यात तृतीय क्रमांक

**जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या नेतृत्वाचे राज्यभर कौतुक....**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

राज्य शासनाने प्रशासनात अधिक पारदर्शकता, गतिमानता निर्माण व्हावी तसेच नवीन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शासकीय उपक्रम व सुविधांचा थेट लाभ जनतेपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने राबविलेल्या १५० दिवसांच्या विशेष कृती कार्यक्रमांतर्गत आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याने राज्यात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या कुशल नेतृत्वाखाली व दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनातून १५० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार धाराशिव जिल्ह्यात प्रशासन अधिक सक्षम, तंत्रज्ञानस्नेही आणि नागरिककेंद्रित करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण डिजिटल प्रणाली विकसित करण्यात आल्या. यामध्ये डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड प्रणाली, तुळजाई चॅटबॉट, कल्पवृक्ष - स्मार्ट जीआर प्रणाली तसेच जीवनरेखा प्रणाली या महत्त्वाच्या उपक्रमांचा समावेश आहे. डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड प्रणालीमुळे जिल्ह्यातील विविध विभागांच्या शासकीय योजनांचा एकत्रित आढावा घेणे सुलभ झाले आहे. योजनांची उद्दिष्टपूर्ती, प्रगतीवर सतत लक्ष ठेवणे व वेळेत पाठपुरावा करणे अधिक कार्यक्षम पद्धतीने शक्य झाल्याने प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेला गती मिळाली आहे.

तुळजाई चॅटबॉट ही प्रणाली नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे. पुरवठा विभाग, संजय गांधी योजना, नैसर्गिक आपत्ती, आपले सरकार सेवा केंद्रावरील सेवा यासंबंधीची माहिती काही क्षणांत उपलब्ध होत आहे. जिल्हा संकेतस्थळाशी संलग्न असलेल्या या सुविधेमुळे नागरिक घरबसल्या आवश्यक कागदपत्रांची माहिती, योजना पात्रता तसेच शंकांचे तात्काळ निरसन करू शकतात. मोबाईल, लॅपटॉप किंवा संगणकावर सहज वापरता येणाऱ्या या प्रणालीमुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचून प्रशासन अधिक गतिमान झाले आहे. कल्पवृक्ष - स्मार्ट जीआर प्रणाली ही शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त ठरली असून शासन निर्णय, कायदे व परिपत्रकांची अद्ययावत माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ, अचूक व जलद झाले आहे. जीवनरेखा प्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व गट नंबर व सर्वे नंबरनिहाय शेत रस्त्यांची नोंद करण्यात आल्याने शेत रस्त्यांबाबतच्या तक्रारी व अर्जांचे प्रभावी निराकरण शक्य झाले असून ग्रामीण विकासाला मोठी चालना मिळत आहे.

यासोबतच ई-ऑफिस प्रणालीचा जास्तीत जास्त वापर केल्यामुळे पेपरलेस कार्यालय ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होत असून शासकीय कामकाजाचा निपटारा जलद व पारदर्शक पद्धतीने होत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल राज्यभरातून कौतुक होत असून पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांचा सत्कार करून जिल्हा प्रशासनाच्या कार्याचे विशेष कौतुक केले. भविष्यात धाराशिव जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी प्रयत्न करण्याच्या शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

या प्रसंगी अपर जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शिरीष यादव, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रविण धरमकर, उपजिल्हाधिकारी (मध्यम प्रकल्प क्र. २) संतोष राऊत, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अरुणा गायकवाड, उपजिल्हाधिकारी (मांजरा प्रकल्प) श्रीकांत पाटील, सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भूम रेवैयाह डोंगरे (भा.प्र.से.), उपविभागीय अधिकारी धाराशिव ओंकार देशमुख, उमरगा दत्तू शेवाळे, कळंब गणेश शिंदे, सर्व तालुका तहसीलदार, महसूल तहसीलदार प्रकाश व्हटकर, सर्व नायब तहसीलदार तसेच जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सांघिक प्रयत्नांचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी विशेष कौतुक केले.